INTRODUCTION

TO THE

HISTORY OF INDIA.

ABRIDGED FROM THE *WORK*

OF

THE HON: MOUNTSTUART ELPHINSTONE

BY

BALL GUNGADHER SHASTREE, ESQ.

BOMBAY

LITHOGRAPHED

AT VIT,HAL SAKHARAM AGNIHOTRI'S

PRESS.

1846.

[illegible] Oriental MSS. Library,
Triplicane P.O., Madras

हिंदुस्थानाचा इतिहास.

मूळपुस्तक

बाळगंगाधरशास्त्री जांभेकर

यांणीं

नामदार एल्फिन्स्टन साहेब यांच्या ग्रंथाचा

संक्षेप करून

केलें.

मुक्काम मुंबई.

इ० स० १८४६.

विठ्ठल सखाराम अग्निहोत्री यांच्या छापखान्यांत छापिलें.

प्रस्तावना.

आपल्या देशांत पूर्वीपासून कोणकोण राजे झाले, त्यांणीं राज्यें कोणत्या प्रकारें केलीं, त्यांचे कारकिर्दीत विशेष वर्त्तमानें कोणतीं झालीं, आणि मोठे नामांकित पुरुष कोण जन्मले, हें समजण्यापासून सर्वांस उपयोग आहे. या गोष्टींचा प्रसंग चवघांमध्यें वारंवार येतो, तश्यासमयीं त्या केवळ ठाऊक नसल्यातर लज्जेस आणि संकोचास कारण होतें. ही गोष्ट कोणास कदाचित् लहान वाटेल, परंतु प्राचीन इतिहास समजल्यापासून दुसरे बहुत उपयोग आहेत. आरंभीं लोकांची स्थिति कशी होती, ती पुढें कसकशी सुधारत चालली, राज्यें कशीं वाढलीं, आणि कोणत्या कारणानीं मोडलीं, या सर्व गोष्टींचा विचार करण्यांत मनास व्यासंग आणि आनंद हीं दोनही होतात; आणि पूर्वीं जे पुरुष होऊन गेले त्यांचे गुण आणि दोष यांचीं उदाहरणें स्पष्टदृष्टीस पडून चांगला मार्ग आचरण्याविषयीं वारंवार बोध प्राप्त होतो. याकरितां बहुतेक देशाचे लोक स्वदेशाच्या इतिहास मोठ्या अगत्यानें पढतात; त्याप्रमाणें या देशांतील मुसलमानांच्या राज्यांची हकीकत जाणूं इच्छिणारांस आजपर्यंत कांहीं साधन नव्हतें, याकरितां हा पुढील संक्षेप ग्रंथ केला आहे.

हा ग्रंथ पढणारानीं राजांचीं नावें, त्यांच्या तारिखा, लढाया, घात, मारामाऱ्या इत्यादि गोष्टींवरच केवळ लक्ष्य

Oriental MSS. Library, Triplicane P.O.

देऊं नये. त्यांच्या वाचण्यांत जीं जीं वर्त्तमानें येतील त्यांविषयीं विचार करीत असावा. हा विचार करण्याचा प्रकार त्यांस समजावा ह्मणोन कारण पाहून कोठे कोठे राजांच्या गुणाविषयीं किंवा त्यांच्या आकृतीं विषयीं जें सहज मनांत येतें तें लिहिलें आहे, आणि मुसलमानांच्या राज्याची वृद्धि आणि क्षय यांविषयीं एक प्रकरण वेगळें करून शेवटीं जोडिलें आहे. अशे जातीचे विचार अधिक लिहिले असते, तर ग्रंथापासून अधिक मनोरंजन आणि बोध जाहला असता, परंतु हा उद्योग मुख्यत्वें मुलांकरितां आहे, त्यांचें लक्ष्य विचारांपेक्षां कथांकडे लवकर लागतें, ह्मणोन झालेल्या गोष्टींचा संग्रह मात्र एथे केला आहे. यावर आणखी विस्तार पुढें व्हावा ही इच्छा आहे.

हिंदुस्थानाचा इतिहास.

देशाचें वर्णन.

१ हिंदुस्थानाचे उत्तरेस हिमालय पर्वत; पूर्वेस ब्रह्मपुत्र नद, त्याच्ये पलीकडेस ब्रह्मदेश; आग्नेयी, दक्षिण, आणि नैर्ऋत्य, या तीन दिशांकडे समुद्र, आणि पश्चिम दिशेस सिंधु, ह्मणजे अटक नदी आहे.

२ काश्मीरापासून कन्याकुमारी पर्यंत या देशाची लांबी १९०० मैल, आणि ब्रह्मपुत्र नदापासून सिंधुनदी पर्यंत रुंदी १५०० मैल आहे.

३ हिंदुस्थानाच्या सुमार मध्यभागीं पूर्वपश्चिम विंध्याद्रिनामें पर्वत आहे; त्याणेंकरून उत्तर हिंदुस्थान, व दक्षिण हिंदुस्थान, असे या देशाचे दोन विभाग जाहले आहेत.

४ उत्तर हिंदुस्थानांत सिंधुनदीच्या कांठचा प्रदेश, भागीरथीच्या कांठचा प्रदेश, सिंधुनदीच्ये पूर्वेकडचा ओसाड वालुकामय प्रदेश, आणि मध्यदेश; असे चार भाग आहेत.

५ सिंधुनदीच्या कांठच्या प्रदेशांतून पांच नद्या वाह-

तात, ह्मणून त्यांस पंजाब असें नाव आहे.

६ या देशाच्या पूर्वेकडील विभाग सपाट आहे, परंतु हा पश्चिम आणि दक्षिण या दिशांकडे उंच सखल आहे. या प्रदेशांतून सतलज, बिया, रावी, चिनाब, आणि जहलम, ह्या पांच नद्या वाहत जाऊन खालीं सिंधुनदीस मिळाल्या आहेत. ह्यां नद्यांचें पाणी प्राशन करणारा प्रदेश मात्र आबाद आहे; त्यावांचून राहिलेला प्रदेश ओसाड आहे.

७ भागीरथीच्या कांठचा सारा देश मैदान, व यांत सकल धान्यें पिकतात, या मध्यें बंगाला प्रांत आहे. ह्या भागीरथी नदीच्या कांठच्या प्रदेशीं पूर्वीपासून हिंदु राहण्याचें स्थान समजावें.

८ सिंधुनदीच्या कांठचा देश उत्तरेस सतलज नदी पासून दक्षिणेस समुद्रपर्यंत एकसारिखा सपाट वालुकामय आहे. त्यास मारवाड असें ह्मणतात. त्या मध्यें जोदपुराजवळ कांहीं प्रांतांत पीक होतें. जसलमीर शहराच्या सभोंवतालचा प्रांत केवळ ओसाड आहे. हा प्रदेश आणि गुजराथ या दोहोंमध्यें कछ प्रांत आहे. याचे पूर्वेस अरवली नामें पर्वत आहे.

९ वर सांगीतलेल्या पर्वताचे पूर्वेस मध्यदेश हा समुद्रापासून सुमारें २००० फूट उंच आहे. हा प्रदेश उंच सखल असून ईशानी कडेस उतरता आहे, या मध्यें माळवा इत्यादि प्रांत आहेत.

१० दक्षिण हिंदुस्थानांत नर्मदानदीचे उत्तर दक्षिण सा-

तपुडा डोंगर आहे. याचे दक्षिणेस तापीनदी वाहती, तिजपासून बाकीचा सर्व देश त्रिकोणाकृति आणि पूर्वपश्चिम दिशांकडे उतरता असा आहे. या दोनही दिशांकडेस सह्याद्रि नामें एक मोठा उंच पर्वत आहे. यांतून पश्चिमे कडचा अधिक उंच आहे, त्यापासून समुद्रपर्यंत प्रदेश अरुंद आणि उंच सखल आहे.

११ दक्षिण हिंदुस्थानांत वर्धानदी पासून गोदावरी नदीपर्यंत एक भाग. आणि गोदावरीचे दक्षिणेस एक भाग, असे दोन भाग आहेत. त्यांतून उत्तर आणि पूर्व भागांत मोठीं घोर अरण्यें आहेत, आणि यांत लागवड आणि वस्ती थोडथोडी व विरळ आहे. दक्षिण आणि पश्चिम या दोन दिशांकडील प्रदेश सपाट व आबाद आहे. दक्षिण हिंदुस्थानांत महाराष्ट्र, कर्नाटक, द्रविड, आणि तेलंगण, हे प्रांत आहेत.

१२ हिंदुस्थानाचा विस्तार १२,८७,४८३ चौरस मैल आहे, यांतील लोकांची संख्या सुमारें १४००००००० आहे –

भाग १.

प्राचीन इतिहास.

प्रकरण १.

मुसलमानांच्या येण्याच्या पूर्वीचा वृत्तांत — उत्तर हिंदुस्थानांतील राज्यें.

१ सर्व हिंदुस्थान देश केव्हांही एका पुरुषाच्या अधिकाराखालीं होता असें दिसत नाहीं. हिंदूंचे सूर्यवंशी आणि सोमवंशी राजे कलियुगास आरंभ होण्याच्या पूर्वीं ह्मणजे पांच साहा हजार वर्षांच्या पूर्वीं होऊन गेले, असें ते मानितात. त्यावेळीं मनुष्यास ईश्वरानें उत्पन्न केलें नव्हतें, असें पश्चिमेकडील लोकांचें मत आहे.

२ हिंदुलोकांच्या पुराणांत लिहिलें आहे कीं कलियुगाच्या आरंभीं पांडव कौरवांचें युद्ध होऊन बहुतेक क्षत्रिय नाशाप्रत पावले, आणि शेष राहिलेल्या कुळांतील राजांनीं १५०० वर्षें पर्यंत हिंदुस्थानांत राज्य केलें. या दीड हजार वर्षांत झालेल्या राजांचीं नावेंही त्या ग्रंथांत आढळतात. शेवटीं चंद्रगुप्त ह्मणोन कोणी शूद्र नंद नामक राजास मारून आपण पाटलिपुत्र नगरांत सिंहासनावर बसला, आणि तेव्हां पासून अभीर, गंधर्व, शक, यवन इत्यादिक लोक बहुत करून सर्वत्र राज्यें क-

रूं लागले असें त्या पुस्तकावरून दिसतें.

३ फार प्राचीन काळामध्यें मिसर देशाचा सेसोस्त्रिस राजा आणि आसिरिआ देशाची सेमिरामिस राणी यांणीं हिंदुस्थानावर स्वाऱ्या केल्या असें पश्चिमेकडील लोकांच्या ग्रंथांत लिहिलेलें आहे; परंतु त्या स्वाऱ्यां विषयींचें खचित वर्तमान माहित नाहीं. इशावी सनाच्या पूर्वीं सुमारें पांचशें वर्षांवर पारसी लोकांचा राजा डारायस हिस्तास्पिस याणें हिंदुस्थानचे उत्तरेकडील कांहीं प्रांत जिंकून घेतला. तो त्याच्या राज्याच्या वीस सुभ्यांपैकीं एक सुभा झाला. तेथे त्याचा सत्रप (छत्रप) राहत असे, तो त्यास खंडणीबद्दल प्रतिवर्षीं हत्ती आणि इतर द्रव्य पाठवीत असे. डारायस याचा मुलगा क्षेर्क्षेस याणें ग्रीस देशावर स्वारी केली ते वेळीं त्याच्या बरोबर हिंदुस्थानचें कांहीं सैन्य होतें, असें ग्रीक ग्रंथांवरून समजण्यांत येतें.

४ मासिदोन देशाचा शिकंदर बादशाह हा पारसी देश जिंकून आला. तो प्रथम ५००० स्वार आणि ६००० पायदळ इतक्या सैन्यासहित सिंधुनदी उतरला. (इ० पू० ३२६). त्यास हैड्रास्पिस ह्मणजे जहलम नदीच्या पश्चिम कांठचा तातक्षिला एथील राजा खंडण्या घेऊन शरण आला. त्या नदीच्या पूर्व तीरीं कोणी एक पोरस (पौरव अथवा पंवार) नामें राजा २०० हत्ती, ३०० रथ, ४००० स्वार आणि ३०००० पायदळ इतकें सैन्य घेऊन त्याच्या पुढें युद्धास उभा राहिला. त्याची आणि शिकंदराची मोठी लढाई होऊन पोरसाचा पराज-

य झाला. शिकंदराची इछा भागीरथी नंदीपर्यंत देश जिंकित आण्याची होती; परंतु तो हैफासिस ह्मणजे बिया नदीच्या कांठीं जेव्हां येऊन पोंचला, तेव्हां त्याची फौज बिथरली. याचें कारण असेंकीं ती युद्धास आणि श्रमास कंटाळली होती. आणि तीतील सर्वलोकांस परत स्वदेशास जाण्याची इछा झाली होती. त्या लोकांनीं आपुला आग्रह सोडण्या विषयीं शिकंदरानें फार प्रकारें प्रयत्न केला; परंतु तो निष्फळ झाला, असें पाहून त्याणें परत स्वदेशास जाण्याचा निश्चय केला. तो बादशाह आपुल्या सैन्यासहित मचव्यांत बसून सिंधुनदींतून खालीं तिच्या मुखाजवळ आला. नंतर हिंदुस्थान आणि इराण यांच्या मध्यें समुद्राचा कांठ कोणत्या प्रकारचा आहे हें समजण्याकरितां त्याणें आपला निआर्कस नामें सरदार थोड्या सैन्यासहित जळमार्गानें पाठविला; आणि आपली बहुतेक फौज घेऊन आपण सिंध आणि मेक्रान या प्रांतांतील वाळवंटाच्ये वाटेनें परत बाबिलन शहरास गेला. पुढें थोड्या दिवसांनीं तो पराक्रमी आणि विख्यात राजा मरण पावला.

५ या शिकंदर बादशाहाचे वेळेस पश्चिम हिंदुस्थानामध्यें अनेक राज्यें होतीं. आणि त्यामध्यें तपश्चर्या करण्याचें व सती जाण्याचे वगैरे सांप्रदाय आतां प्रमाणेंच होते, असें ग्रीक ग्रंथकारांनीं लिहिलें आहे. प्राची लोकांची राजधानी पाटलिपुत्र ह्मणजे पाटणा. एथील राजा चंद्रगुप्त. याजवळ कांहीं ग्रीक फौज होती, आणि

शिकंदराचा सरदार सिरिआ देशाचा राजा जो सिल्यूकस त्याचा वकील मेगास्थिनीस हा त्याच्या दरबारांत बहुत काळ पर्यंत होता.* पुढें ग्रीक लोकांचें एक संस्थान बाक्ट्रिआ देशांत स्थापिलें गेलें, तें १३० वर्षें पर्यंत चालल्यावर स्कुथी लोकांनीं बुडविलें. तेथील राजे आणि हिंदुराजे यांमध्यें अनेक प्रकारें व्यवहार चालत असे, असें मानायास प्राचीन लेखांचीं प्रमाणें आहेत.

६ चंद्रगुप्ताच्या वंशजांनीं मगध ह्मणजे बाहार देशांत दहा पिढ्यां पर्यंत राज्य केलें. पुढें आणखी तीन शूद्र जातीचे राजवंश झाले. त्यांतून शेवटील वंशाचें नाव आंध्र असें होतें. त्या वंशाची समाप्ति सन ४३६ त झाली. त्या काळच्या राजांत चंद्रगुप्तापासून तिसरा राजा अशोक या नावाचा मोठा प्रतापी झाला, तो बौद्ध मतानुसारी होता. त्याच्या स्वाधीन मोठें राज्य होतें, असें जागोजागीं शिलालेख आहेत त्यांवरून समजण्यांत येतें.

७ मगध प्रांतामध्यें बुद्धाचा+ जन्म झाला. त्याणें

---

* हा चंद्रगुप्त आणि नंदास मारून सिंहासनावर बसलेला हिंदूंचा चंद्रगुप्त हा एकच असें मानायास बहुत प्रमाणें आहेत. त्यांत चंद्रगुप्ताचा आणि यवन राजांचा स्नेह होता. आणि त्याजवळ यवनाची फौज होती असे जे हिंदूंच्या ग्रंथांतील लेख हें मोठें प्रबळ आहे.

+ बुद्धाचे अवतार अनेक झाले आहेत असें त्यांचे मतानुसारी मानितात. त्यांतील शेवटचा गोतम हा इ० पू० ५४० वर्षांवर झाला असें समजलें आहे. बुद्धगया एथें एक प्राचीन शिलालेख आहे त्यावरून एका बुद्धाचा जन्म इ० पू० १०१४ त झाला; त्याचेंच नाव शाक्यसिंह असें दिसतें.

जो धर्म प्रवृत्त केला, तो बहुतेक साऱ्या हिंदुस्थानांत प्रबळ झाला, आणि बौद्ध व ब्राह्मण यांमध्यें शेंकडो वर्षें पर्यंत कलह चालला. शेवटीं ब्राह्मणाचा उत्कर्ष झाला, आणि मारवाड वगैरे कांहीं प्रांतांत व सिंहलद्वीपांत मात्र बौद्ध धर्म राहिला. मगधदेशाची भाषा मागधी अथवा पाली ही मध्यें बौद्ध व जैन यांच्या धर्माचे ग्रंथ लिहिले आहेत. तो धर्म हिंदुस्थानांतून चीन, तिबेत, इत्यादि देशांत प्रथम गेला, तो अद्यापि तेथे चालत आहे.

८ बंगाल देशांत पाल या उपनावाचे राजे राज्य करीत होते. त्यानंतर सेन या उपनावाचे राजे झाले, त्यांच्या राज्याची समाप्ति मुसलमानांनीं सन १२०३ च्या सुमारें केली.

९ मंधार नावाचे प्रसिद्ध जे परमार राजे ते प्राचीन काळापासून माळव्यांत राज्य करीत होते, असा निश्चय झाला आहे. त्यांमध्यें विक्रमादित्य इशावी सनाच्या पूर्वी ५६ वर्षांवर शककर्त्ता* जाहला. पुढें त्याच्या वंशांत भोजराजा विद्येची वृद्धि करणारा आणि विद्वानांस आश्रय देणारा असा जाहला. त्याच्या दरबारांतील कालिदास, भवभूति, इत्यादि कवींचे ग्रंथ हिंदूंमध्यें सर्वमान्य आहेत. त्याच्या वंशजांचें राज्य इशावी सनाच्या १२३१ मध्यें मुसलमानांनीं बुडविलें.

* विक्रमापासून गेलेला जो काळ त्यास शक ह्मणण्याचें कारण असें कीं त्याकाळीं शक ह्मणून यवन होते त्यांचा पराजय केल्यावरून विक्रमास शकारी असें नाव प्राप्त झालें. त्याच्या विजयापासून च्या काळास लोक शकारिसंवत्सर याचा संक्षेप करून शक ह्मणों लागले. शालिवाहनानें

१०. गुजराथेमध्यें वलभीपुरांत इ० स० १४४ पासून ५२४ पर्यंत सेन नांवाचे राजे राज्याधिकार चालवीत होते. त्यांच्या मागें चौरे, ह्मणून रजपूत राजे झाले. त्यांणीं इ० स० ७४६ मध्यें अनलवाड नगर, ह्मणजे ज्यास सांप्रत पट्टण ह्मणतात तें शहर, आपली राजधानी केली. त्यांतील शेवटचा राजा स० ९३१ त मरण पावल्यावर त्याचा जांवई, दक्षिणेंतील कल्याण एथील चालुक्यवंशाचा एक राजा, त्याचे गादीवर बसला. या चालुक्य राजांनीं माळवा प्रांत घेतला; आणि महमूद गजनवी याणें जरी त्यांस नम्र करून त्यांपासून खंडणी वसूल केली, तथापि ते सोलंकी अथवा चालुक्य राजे इ० सन १२२८ पर्यंत सिंहासनावर होते. त्यांस पदच्युत करून दुसरा एक राजवंश अधिकारावर आला. त्याची वेळ भरली तेव्हां तो इ० स० १२९७ मध्यें मुसलमानांनीं बुडविला.

११. १ कनोज एथील राज्य इ० स० ४७० त होतें असें समजलें आहे, आणि त्याविषयीं शेवटचा लेख इ० स० ११९३ मधला आहे. २ काशी आणि मिथिला एथेंही प्राचीन काळापासून राज्यें होतीं; त्यांतून प्रथमाची समाप्ति इ० स० ११९२ त आणि दुसऱ्याची इ० स० १३२५ त झाली. ३ दिल्लीचें संस्थान इशावी सनाच्या पूर्वी ५६ वर्षांवर होतें असा लेख

विक्रमास जिंकिला ह्मणोन त्याचें शकारि हें पद त्याणें घेतलें. प्रस्तुत विक्रमाच्या वर्षांस संवत् आणि शालिवाहनाच्या वर्षांस शक ह्मणण्याची रूढि आहे. युरोपिअन जांस सिथिअन अथवा स्कुथी ह्मणतात आणि ज्यांणीं बाक्ट्रिआ एथील ग्रीकांचें राज्य बुडविलें ते आणि हे हिंदूंचे शक लोक एकच असें दिसतें.

आहे. तेथे त्या सनाच्या नवव्या दाहाव्या व अकराव्या शोंकड्यांत रजपुत राजे राज्य करीत होते. त्यांचे वीस पुरुष झाल्यावर इ॰ स॰ १०५० त दिल्लीचें राज्य अजमीरच्या घराण्याच्या हातीं गेलें. त्या वंशांतील पृथुराज अथवा पृथ्वीराय याचे वेळेंस मुसलमानांनीं त्याचा शेवट केला. ४. अजमीर एथे इ॰ स॰ ६९५ त माणिक राय नामें राजा राज्य करीत होता. त्याच्या पूर्वीं सात पिढ्यांपावेतों तें राज्य त्याच्या वंशाकडे होतें असा लेख आहे. या राजाचा वंशज विशाळ याणें वर लिहिलेल्या वर्षीं दिल्लीचें संस्थान घेतलें. त्याची आणि अजमीरच्या राज्याची समाप्ति बरोबरच झाली. ५ मेवाड ह्मणजे उदेपुर, व जसलमीर आणि जयपुर हीं तीन संस्थानें अद्यापि आहेत. यांतून पहिल्या दोहों विषयीं इशावी सनाच्या आठव्या शोंकड्यांतील लेख आहेत. जयपुरा विषयीं इ॰ स॰ ९६७ तील प्रमाण आहे. ६ सिंध हा देश शिकंदर बादशाह याचे वेळीं स्वतंत्र होता, तो मुसलमानांनीं इ॰ स॰ ७११ मध्यें घेतला.

१२ काश्मीर देशाचें वर्त्तमान इशावी सनाच्या पूर्वीं १४०० वर्षांपासून इशावी सनाच्या आरंभानंतर १०१५ वर्षें पर्यंत सविस्तर राजतरंगिणी नामें ग्रथांत लिहिलें आहे. त्याचा आणि हिंदुस्थानाचा संबंध थोडाच आहे. तेथील राजे हिंदुस्थानावर स्वाऱ्या करीत असेंही त्या पुस्तकांत कितिएक जागीं आहे, परंतु त्याविषयीं संशय दिसतो.

प्रकरण २

दक्षिणेंतील प्राचीन राज्यें.

विंध्य पर्वताचे उत्तरेस मोठीं राज्यें होतीं त्याकाळीं त्याचे दक्षिणे कडील देशांत डोंगरी व अज्ञान लोक राहत होते असें संभवतें. त्यांत पुढें राज्यें स्थापिलीं गेलीं त्यांविषयींचें वर्त्तमान समजलें आहे, तें असें.

१ पांड्य ह्मणजे मधुरा आणि तिणवल्ली या प्रांतांतील राज्य. हें इशावी सनाच्या पूर्वीं सुमारें पांचशें वर्षांवर कोणी शूद्र जातीच्या पुरुषानें स्थापिलें. एथील राजाकडून रोमनांचा बादशाह आगस्तस याजकडे वकील गेला होता. या राज्याची राजधानी इशावी सनाच्या आरंभीं मधुरा एथे होती. तेथील राजे आणि चोल राजे यांचे नेहेमी कलह होत असत. ते कधीं चोल राजांस करभार देत, कधीं स्वतंत्र असत. शेवटीं तेथील अधिकारी नायक प्रास अर्काटचा नवाब याणें सन १७३६ मध्यें जिंकून त्या राज्याची समाप्ति केली.

२ चोल देशाच्या राजांची राजधानी कांची नगर होतें. इशावी सनाच्या आरंभीं या राजांची सत्ता साऱ्या द्रविड देशावर चालत होती. पुढें त्या सनाच्या आठव्या शोंकड्यांत त्यांणीं कर्नाटक व तैलंगण या देशांवर अंमल बसविला, आणि नंदिदुर्गाच्या डोंगराच्ये पूर्वेचा सर्व मुलुक गोदावरी नदीपर्यंत घेतला. पुढें बाराव्या शोंकड्यां-

त त्यांस त्यांच्ये जुन्ये हद्दीच्ये आंत हटावें लागलें. याप्रमाणें ते चोलराजे कधीं विजयनगरच्या अधिकाऱ्यास कर देऊन, व कधीं स्वतंत्रपणानें असे होते. पुढें शिवाजी याचा भाऊ जेव्हां त्या प्रांतांत गेला तेव्हां त्याणें त्यांतील शेवटल्या पुरुषास गादीवरून काढून तंजावर एथें नवें संस्थान केलें.

३ चेर यांचें राज्य पश्चिम समुद्र कांठीं होतें. त्यांत सांप्रतचे त्रावणकोर, मलबार, व कोइमत्तूर प्रांत होते. ते मिसर देशचा राजा टालमी याच्या ग्रंथांत लिहिलें आहे. एकवेळ त्याची सत्ता बहुतेक कर्नाटकावर चालूं लागली होती, परंतु इशावी सनाच्या दाहाव्या शेंकड्यांत तें समाप्त होऊन त्याचे प्रांत सभोंवतालच्या संस्थान्यांनीं वांटून घेतले.

४ केरल ह्मणजे कोंकण आणि चेर यांच्या मधल्या देशामध्यें प्राचीन काळापासून ब्राह्मणच अधिकार चालवीत असत. त्यांणीं त्याचे चौसष्ट प्रांत केले होते, आणि तीन वर्षें पर्यंत आपल्यांतून एक ब्राह्मणास मुख्य करून आणि त्यास चार मंत्री करून देऊन ते सर्व कारभार करीत. नवव्या शेंकड्यांत दक्षिणेकडील प्रांताचा अधिकारी हिंदु होता तो मुसलमान झाला. त्यांस झामोरिनांचा राजा असें नाव पडलें. इशावी सनाच्या पंध्राव्या शेंकड्याचे अखेरीस पोर्तुगीस लोकांचा सरदार वास्कोडीगामा जेव्हां कालिकोट एथें येऊन उतरला. तेव्हां तें शहर यारा

जाजवळ होतें. उत्तरेकडील प्रांतांत इशावी सनाच्या आरंभापासून एक पृथक् संस्थान होतें; तें कर्नाटकचे बल्लाळ राजे यांणीं मोडिलें. शेवटीं तो प्रांत विजयनगर एथील अधिकाऱ्यांच्या स्वाधीन झाला.

५. कर्नाटक भाषेची मर्यादा उत्तरेकडेस कोलापुरापासून बेदर पर्यंत आहे. बेदराहून अद्वानी, अनंतपुर, आणि नंदिदुर्ग यांवरून सूत्र टाकून तें पश्चिमेकडे बेंगळूर व पलिकोट यांच्या मध्यें घांटावर आणावें तें पूर्वेकडेस आणि दक्षिणेकडेस मर्यादा होईल. पश्चिमेकडेस गोंवें व समुद्र यां पर्यंत त्या भाषेची अवधि आहे. या सर्व देशांत प्राचीन काळीं एक राज्य होतें असा संभव आहे. परंतु या विषयीं जे फार प्राचीन लेख आहेत, त्यांमध्यें हा पांड्य, चेर, आणि केरल एथील राजांचे सत्तेंत होता असें आहे. पुढें यांत बहुत लहान लहान मांडलिक धनीपणा करूं लागले. शेवटीं इशावी सनाच्या अकराव्या शेंकड्यांत बल्लाळ राजांच्या वंशाजवळ त्या साऱ्या देशाचें आधिपत्य आलें. एके वेळीं त्यांची आज्ञा मलबार व द्रविड देशांवरही चालत होती. शेवटीं इ० स० १३१० च्या सुमारें मुसलमानांनीं त्यांची सत्ता हिरावून घेतली.

६. तैलंगणाचा पूर्वेकडील भाग यादव उपनावाच्या राजांकडे होता; आणि कर्नाटक व महाराष्ट्र यांचे हद्दीवर कल्याण एथें चालुक्य राजे राज्य करीत होते. या चालुक्यांचा अंमल नर्मदे पर्यंत साऱ्या महाराष्ट्र देशावर होता. क

ल्याण एथील शेवटला चालुक्य राजा यास त्याच्या मंत्र्यानें मारिलें. त्या मंत्र्याची वेळ भरली तेव्हां कोणी लिंगायतांनीं त्याचा जीव घेतला. शेवटीं हें राज्य देवगिरीच्या यादवांच्या हातीं गेलें.

७. वरल्या चालुक्य वंशांतील कोणीं पुरुषानें तैलंगणाच्ये पूर्वेस कलिंग देशांत राज्याची स्थापना केली. तें राज्य सुमारें चारशें वर्षें पर्यंत होतें. त्यांतून आंध्रदेशाचे गणपतिराजे यांणीं बरेंच घेतलें. शेवटीं तेराव्या शेंकड्यांत तें ओंढियाच्या राजांनीं समाप्तीस नेलें.

८. आंध्रदेशाच्या राजांची राजधानी वरंगूळ शहर. त्यांच्या वृत्तांतामध्यें प्रथम विक्रम आणि शालिवाहन यांचीं नावें लिहून पुढें इ० स० ५१५ च्या सुमारें कोणीं यवनांनीं राज्य घेतलें. आणि त्यांच्या नऊ पुरुषांनीं ४५८ वर्षें पर्यंत तें भोगिलें, असें ह्मटलें आहे. नंतर ह्मणजे सन ९५३ च्या सुमारें गणपतिराजांचा वंश सिंहासनावर आला. त्यांत अकराव्या शेंकड्याच्ये अखेरीस काकति ह्मणून प्रतापी राजा झाला; त्याच्या नावावरून सार्‍या वंशास काकतीय वंश असें ह्मणतात. या वंशाच्या राज्याची परम सीमा तेराव्या शेंकड्याच्ये अखेरीस झाली, त्यावेळीं गोदावरी पासून दक्षिणेकडचा बहुतेक प्रांत त्याचे सत्ते खालीं होता. सन १३२२ मध्यें त्याची राजधानी मुसलमानांनीं घेतली, आणि त्यास हीनबळ केलें. शेवटीं तें राज्य गोवळकोंड्याच्येबादशाहींत दाखल झालें.

९. ओंढ्या देशांतील राजावळी मध्येंही विक्रम, शालिवाहन यां पासूनच आरंभ आहे. पुढें यवनांनीं समुद्रांतून येऊन त्या देशांत राज्य केलें असें लिहिलें आहे. त्यांतील शेवटच्या यवनांनीं १४६ वर्षें राज्य केल्यावर त्यांस ययाति केसरी राजानें काढून दिलें. इ० स० ११३१ पर्यंत त्यावंशाचे पसतीस पुरुष सिंहासनावर बसले. नंतर गांगवंशाचे राजे झाले; त्यांच्या मागून सूर्यवंशाचे रजपुत गादीवर आले. पंधराव्या शेंकड्यांत त्यांच्या फौजा दक्षिणेस कांची पर्यंत गेल्या होत्या, आणि त्यावेळच्या हिंदुराजांनीं मुसलमानांवर जोकट केला होता, त्यांत मदद करायास तेथील राजा बेदराजवळ आला होता. असे आणीकही किति एक मोठे पराक्रम केल्या नंतर त्यांस जोंवर बंगाल्याकडून आणि पश्चिमेकडून मुसलमानांचे हल्ले येऊं लागले; आणि राज्यांत अव्यवस्था होऊन कोणी एक तैलंग सरदार सत्ता करूं लागला. शेवटीं तें सन १५७८ मध्यें अकबरानें आपल्या राज्यांत दाखल केलें.

१०. महाराष्ट्र देशाविषयींचें वर्त्तमान फार थोडें ठाऊक आहे. त्यांत प्राचीन काळीं तगर ह्मणून शहर गोदावरीच्या तीरीं पैठणाच्ये पूर्वेस होतें असे ग्रीक ग्रंथांत आहे. त्या तगर पुरांत पुढें शिलार नामें रजपुत राजे झाले; त्यांचे आणि मुंबई जवळचें कल्याण व कोल्हापुराजवळचा पन्हाळा एथील राजांचे संबं-

ध अक्राव्या व बाराव्या शेंकड्यामध्यें झालेले होते. शा-
लिवाहनाचें नाव प्रसिद्धच आहे. तो पैठण एथील कुं-
भाराचा मुलगा. त्याणें प्राचीन राजांचा पराजय करू-
न आपली सत्ता व शक हीं नर्मदेचे दक्षिणेस चालू
केलीं अशी कथा आहे. त्याणें उज्जयनीचा राजा वि-
क्रम याचा पराजय केला, असेंही ह्मणतात; पण त्या
दोघांमध्यें १३५ वर्षांचें अंतर आहे. इशावी सना-
च्या बाराव्या शेंकड्यांत यादव कुळांतील कोणी पुरु-
षानें देवगिरी एथे राज्य स्थापिलें. तें सन १३०७
मध्यें मुसलमानांनी समाप्तीस नेलें.

११. वर हिमालया पासून दक्षिण समुद्रा पर्यंत जीं
प्राचीन हिंदुराज्यें लिहिलीं, त्यांचे राजे पांडव कौरवांच्या
युद्धांत होते, असें भारतांत आहे. परंतु तेव्हां पासून
आलीकडच्या काळा पर्यंत राज्यांच्या घडामोडी कश्या
झाल्या हें कांहीं समजत नाहीं. वर लिहिलेलीं मध-
लीं मधलीं राजांचीं नावें, व त्यांविषयींचीं त्रुटित वर्त्त-
मानें हीं मात्र ताम्रपट्ट, शिलालेख, वंशावळी, व पर
देशी लोकांचे ग्रंथ यांवरून समजण्यांत आलीं आहे-
त. परंतु यथार्थ इतिहास लिहिण्याचा संप्रदाय या
देशांत नाहीं; आणि ताम्रपट्ट वगैरे लेखांत अतिश-
योक्ति आणि दुसरे काव्यालंकार फार असतात, ह्म-
णोन त्यांत लिहिल्यापैकीं सत्य कोण तें आणि मिथ्या
कोण तें याचा निर्णय होण्यास फार आयास लागतो;

आणि तो कित्येक जागीं होतच नाहीं.

प्रकरण. ३

हिंदुस्थानांत मुसलमान प्रथम स्वाऱ्या करूं लागले त्यांचें वर्त्तमान.

१. मुसलमान धर्म प्रवृत्त करणारा महंमद इ० स० ५६९
मध्यें जन्मला, आणि त्याच्या वयास ४० वर्षें जाहल्यावर त्या-
णें आरबस्थानांत आपला धर्म प्रकट केला. तो इ० स० ६३२
मध्यें मरण पावला. त्याच्या मागें त्याच्ये गादीवर जे बसले
त्यांस खलीफ ह्मणतात. त्यांमध्यें पांचवा खलीफ मोआवि-
आ हा अधिकारावर असतां मुसलमानांनी सिंधुनदी पर्यंत
देश घेऊन काबुलांतील १२००० लोकांकरवीं इ० स० ६६४ म-
ध्यें आपला धर्म घेवविला. पुढें मोहालिब नामें कोणी शूर
सरदार मुल्तान देश घेण्याकरितां आला, तो तेथे विजय पा-
वला; आणि तो देश स्वाधीन करून घेऊन आणि बहुत लोकां-
स कैद करून परत आपल्या मुलखास नेता झाला.

२. पुढें खलीफ वालिद याच्ये कारकिर्दींत महंमद कासि- इ० स० ७११
म नामें एका सरदारानें इराणांतून सिंधेस येऊन देवळ गांव-
च्या दाहीर राजावर स्वारी केली. त्यावेळीं तो राजा ५०,०००
सैन्य सिद्ध करून लढला. त्यांत त्याचा केवळ पराजय होऊन तो
मरण पावला; आणि त्याचे किल्लेकरी बहुत करून मेले.. बा-
कीचे शत्रूंच्या हातीं सांपडले, त्यांचा त्यांणीं प्राण घेतला. या-

Oriental MSS. Library
Triplicane P.O. – Mad

प्रकारें सर्व मुलतान आणि सिंध, हे दोनही देश मुसलमानांच्या हस्तगत झाल्यावर, ते लोक तेथील रयतेकडून कांहीं वेळ पर्यंत खंडणी घेत होते. परंतु पुढें लवकरच ते प्रांत फिरून हिंदूंच्ये ताबेंत येऊन मुसलमान तेथून परत आपल्या देशीं गेले.

३. ताहीर नामें कोणी मुसलमान, इ० स० ८०० च्या सुमारें खलीफ यांच्या हुकुमांत वागण्याचें सोडून खुरासान आणि त्याचे उत्तरेकडील समर्कंद इत्यादि देशांत स्वतंत्र पणानें सत्ता करूं लागला. त्याच्या वंशजांनीं कितिएक वर्षें पर्यंत राज्य केल्याउपरांत सुफर आणि सामानी या वंशांचे राजे तेथें राज्य करिते जाहले. त्यांतून सामानी राजांच्ये वेळेस त्यांच्या अलप्तगीन नामें कोणी सरदारानें गिजनी एथें एक राज्याची गादी स्थापिली. (इ० स० ९६२). पुढें त्याचा जांवाई सबक्तगीन तेथें राज्य करीत असतां लाहोरच्या जयपाळ नामक राजानें लष्कर जमवून त्यावर स्वारी केली; परंतु वारा वावटळी इत्यादि उत्पात होऊं लागल्यामुळें ईश्वर आपणास अनुकूळ नाहीं असें समजून त्याणें सबक्तगीन यास ५० हत्ती देऊन व आणखी द्रव्य देण्याची कबुलात करून तो परत हिंदुस्थानांत आला. त्याकराराप्रमाणें त्याणें द्रव्य दिलें नाहीं, हा आपला अपमान केला, हें न विसरतां सबक्तगीन लाहोरावर स्वारी करण्यास निघाला. त्येवेळेस दिल्ली, अजमीर, कलंजर, आणि कनोज एथील राजांस मदतीस बोलावून आणि एक लक्ष स्वार बरोबर घेऊन तो जयपाळ पुढें गेला; परंतु त्याचा केवळ प-

राजय करून त्याची छांवणी लुटून सबक्तगीनानें सभोंवतालच्या प्रांतांतून खंडणी घेतली, आणि सिंधुनदी पर्यंत देश जिंकून १००० स्वारांसह वर्तमान एक सरदार पेशावर एथें सुभेदार करून ठेविला.

प्रकरण ४

सुल्तान महमूद याच्या स्वाऱ्यांविषयींचा वृत्तांत.

१. सबक्तगीन याच्या मागें त्याचा वडील मुलगा महमूद हा आपला लहान भाऊ इस्मायल यास जिंकून व कैद करून आपण सन ९९७ मध्यें सिंहासनारूढ जाहला, आणि पुढें दोन वर्षांच्या आंत बुखारा एथील समानी वंशाच्या राजास जो कर वगैरे द्यावा लागत होता, तो बंद करून आपण स्वतंत्र जाहला. त्यास खलीफ याणें वस्त्रें व किताबती पाठवून दिल्या. नंतर लवकरच तो आपणास सुल्तान असें ह्मणवूं लागला. याप्रमाणें आपल्या राज्याचा बंदोबस्त करून त्याणें दहा हजार निवडक स्वारांसहित इ० स० १००१
हिंदुस्थानांत स्वारी केली.

२. त्ये स्वारीमध्यें महमूद हा आपल्या बापाचा शत्रु जयपाळ याचा पराभव करून अतिशय लूट घेऊन लवकरच परत गिजनीस आला. पुढें जयपाळ याणें कांहीं द्रव्य देऊन प्रतिवर्षीं खंडणी देण्याचें कबूल केल्यावर

महमूद याणें त्यास मुक्त केलें, परंतु त्यास ती अप्रतिष्ठा सहन न होऊन त्याणें परत आल्यावर आपला मुलगा अनंगपाळ यास राज्य दिलें, आणि चिता तयार करून तिला आपल्या हातानें अग्नि देऊन तो आपला प्राण देता जाहला.

३. मुलतानाच्ये दक्षिणेकडील भाटिया एथील राजा खंडणी पैकीं आपली वांटणी न देई, यास्तव महमूद याणें दुसऱ्यानें हिंदुस्थानांत स्वारी केली, त्येवेळेस त्या राजाचा पराजय होऊन त्याणें रानांत पळून जाऊन जीव दिला. मुलतानांतील मुसलमान सुभेदार याणें बंड केल्यामुळें महमूद यास तिसऱ्यानें स्वारी करून त्याचा बंदोबस्त करणें प्राप्त जाहलें.

४. ही स्वारी करून परत गेल्यानंतर महमूद याणें मोठा पराक्रम करून तातार देशाच्या राजास जिंकून तें राज्य हस्तगत करून घेतलें. पुढें अनंगपाळानें कांहीं विरोध केल्यामुळें त्याच्या पारिपत्याकरितां त्याणें (इ०स०१००८) चौथ्यानें हिंदुस्थानांत स्वारी करून, उज्जयिनी, ग्वालेर, कलंजर, कनोज, दिल्ली, व अजमीर, एथील राजांचीं एकत्र मिळालेलीं सैन्यें जिंकून नगरकोट ह्मणून ज्वालामुखीचें देवस्थान त्याकाळीं प्रसिद्ध होतें, तेथे जाऊन तें लुटलें. तेथून सोन्याचे दीनार सात लक्ष, व दोनशें मण सोनें, व दोन हजार मण रुपें, व मोत्यें, पोंवळीं, हिरे, माणिकें, वगैरे जवाहीर मिळून वीस मण, इत्यादि अपरिमित द्रव्य घेऊन स्वदेशास जाता जाहला.

५. सन १०१० मध्यें त्याणें पांचव्यानें हिंदुस्थानावर स्वारी करून मुलतान घेतलें. पुढील वर्षी साहाव्ये स्वारींत स्थानेश्वर ह्मणून यमुनेपासून जवळच देवस्थान होतें, तें लुटलें; पुढें दोन स्वाऱ्या काश्मीरावर करून तो प्रांत हस्तगत झाल्यावर, महमूद याणें परत स्वदेशास जाऊन समर्कंद, बुखारा, वगैरे पश्चिमेकडील देश आपल्या राज्यांत मिळविले. नंतर सन १०१७ मध्यें तो एकलक्ष स्वार व वीस हजार पायदळ यांसहित हिमालयाच्या पाहाडांतून कनोज शहरास आला. तेथील राजा सहकुटुंब बाहेर येऊन त्यास शरण झाला, ह्मणोन महमूद त्यास कांहीं उपद्रव नकरितां तेथून मथुरेस गेला. तेथे वीस दिवस पर्यंत त्याच्ये फौजेनें शहर लुटलें, मूर्त्ति फोडिल्या, आणि देवळें बाटविलीं. शेवटीं त्याच्ये धुमाळीमुळें शहरास आग लागली, तीणें करून फार नासाडी झाली. याशिवाय आणखी बहुत शहरें लुटून ओसाड करून व पांच हजार तीनशें हिंदु केदी घेऊन तो महमूद स्वदेशास गेला.

६. नंतर पांच वर्षांनीं त्याणें आणखी दोन वेळ स्वाऱ्या करून पंजाब प्रांतांत आपला कायम अमल बसविला. पुढें सन १०२४ मध्यें मूर्त्तिपूजकांचें पारिपत्य करून आपला धर्म वृद्धिंगत केल्याची कीर्त्ति मागें ठेवावी या हेतूनें महमूदानें गुजराथेंतील सुरटी सोमनाथावर शेवटची ह्मणजे बारावी स्वारी केली. त्येवेळेस त्याच्या बरोबर लष्कर बहुत होतें; केवळ ओझें वाहणारीं उंटें वीस हजार होतीं; आणि रुद्र व पाखंडी जनांचें पारिपत्य केल्याचीं कीर्त्ति मिळावी ह्म-

णून मुसलमान लोक सहस्रशः आले होते.

७. इकडे सोमनाथास लोक इतके मानित होते की त्या देवास राजांनी वगैरे दिलेले गांव दोन हजार होते. त्या देवळाकडे दोन हजार पुजारी. पांचशें कळावंतिणी. व तीनशें गवई असत. देवापुढें घांट होती तिला सोन्याची सांखळी दोनशें मण वजनाची होती; व देवास रोज भागीरथीच्या उदकाचें स्नान घालीत असत, असे लेख आहेत. ह्या मुसलमान ग्रंथकरणारांनी आपल्या राजांची प्रतिष्ठा होण्याकरितां अतिशयोक्ति लिहिल्या असतील; परंतु इतकें खरें की तें देवस्थान मोठें होतें ह्मणून त्याच्या संरक्षणार्थ रजपूत वगैरे फार जमले होते, त्यांणीं महमूद याची स्वारी ज्या दिवशीं येऊन पोंचली, त्या दिवशीं त्याच्या लोकांस मागें हटविलें. दुसऱ्या दिवशींही मुसलमान देवळाच्या तटावर चढूं लागले असतां हिंदुलोकांनी त्यांस खालीं लोटून देऊन त्यांचें कांहीं चालूं दिलें नाहीं. पुढें तिसऱ्या दिवशीं अनलवाड एथील राजा कुमक घेऊन तेथे आला. त्यामुळें पुढें कसें होईल असा मुसलमानांस संशय उत्पन्न झाला. त्यावेळीं महमूद याणें ईश्वराची प्रार्थना करून घोड्यावर बसून आपल्या लोकांस धीर दिला; तेव्हां त्यांणीं एकच आरोळी करून पुढें इतक्या निकरानें हल्ला केला कीं हिंदुलोकांची फळी फुटून त्यांचा देवळांत प्रवेश झाला. त्यावेळीं पांच हजार हिंदु लोक रणांत पडले व चार हजार लोक मचव्यांत बसून

समुद्राच्या मार्गानें पळून गेले.

८. महमूद याणें देवळांत जाऊन मूर्त्ति फोडावयास आरंभ केला, त्यावेळीं ब्राह्मण येऊन बहुत नम्रपणानें ह्मणूं लागले कीं ही मूर्त्ति न फोडल्यास आह्मी बहुत द्रव्य देतों. हें बोलणें महमूदाच्या लोकांतून कित्येकांस आवडलें. परंतु महमूदानें क्षणमात्र विचार करून ह्मटलें, कीं मूर्त्ति विकल्याच्ये कीर्त्तीपेक्षां मूर्त्ति फोडल्याची कीर्त्ति मला पाहिजे. असें ह्मणून त्याणें त्या पाषाणावर सोटा मारतांच बाकीच्यांनींही त्याजवर प्रहार करून त्याचीं शकलें केलीं. त्यांतून जवाहीर वगैरे आठ कोटि रुपयांचें निघालें. त्या पाषाणाच्या शकलांतून एक शकल मक्केस. व दुसरें मदिनेस, व आणखी दोन गजनीस पाठवून दिलीं, तेथें तीं राजवाड्याच्या व मशिदीच्या पायरीस लाविलेलीं शेंकडो वर्षें पर्यंत होतीं. सोमनाथाच्या देवळाचे चंदनी दरवाजे मशिदीस लाविले होते, ते दोन वर्षांपूर्वीं इंग्रेजांच्ये लष्करानें गजनीहून परत आणिले.

९. त्यानंतर गुजराथेंतील अनलवाड्याच्या तक्तावर नवा राजा बसवून, तेथे एक वर्ष राहून महमूद रेतीच्या मैदानाच्या मार्गानें मुलतानांतून परत स्वदेशास गेला. तेथे आपल्या राज्याचा बंदोबस्त करून आणि इराण देश जिंकून सन १०३० सांत एप्रिल महिन्याच्ये २९ वे तारिखेस तो गजनी एथे मृत्यु पावला.

एक काव्य केलें, त्यांत त्याचे वास्तविक दोष लिहिले आहेत. दुसरी महमूदाच्या लोभाची गोष्ट अशी लिहिली आहे कीं, त्याणें मरावयाच्या पूर्वी आपलें सर्व द्रव्य पाहण्याकरितां आणवून पुढें रचून ठेवविलें. त्याकडे एकाग्र चित्तानें पाहत असतां हें सर्व सोडून लोकर आपणास जावें लागेल असा मनांत विचार येऊन त्याच्या डोळ्यांतून अश्रु आले, परंतु त्यांतून आपल्या जवळच्यांस कांहीं न देतां त्याणें प्राण सोडिला.

१४. महमूद स्वभावानें हास्यमुख होता, त्याचें शरीर साधारण उंच होतें, व त्याचा बांधा मजबूत होता, परंतु त्याच्या आंगावर देवीचे व्रण होते, ते लहानपणीं त्यास लांछन वाटून आपल्या कुरूपपणास पराक्रमानें भूषण करण्याकरितां तो प्रथम साहसास प्रवृत्त जाहला असेल असा संभव आहे.

प्रकरण. ५

महमूदाचे वंशज गजनवी राजे यांचें वर्त्तमान.

सन १०३० पासून ११८६ पर्यंत.

१. महमूदाच्या मागें गजनवी वंशांत विशेष वर्णावयाजोगे पराक्रमी राजे जाहले नाहींत. महमूद यास दोघे मुलगे होते, त्यांतील धाकटा महंमद, हा बापानें ठरविल्याप्रमाणें त्याच्या मागें गादीवर बसला. पुढें लोकरच

मसाउदानें परत येऊन सैन्य वश करून घेतलें, त्याचे कुमकेनें त्याणें आपल्या भावास गादीवरून उठवून त्याचे डोळे काढून कैद करून ठेविलें, आणि तो आपण सिंहासनारूढ जाहला. इ० स० १०३०

२. मसाऊद राज्य करूं लागल्यापासून सल्जुकी या नावाचे तातार लोक त्यास उपद्रव देऊं लागले. त्यांचें भय प्रथम चार वर्षें पर्यंत मसाउदास विशेष वाटत नव्हतें, आणि तो मकरान, माजिंदरान, वगैरे इराण देशाच्या प्रांतांमध्यें आपला अंमल बसवीत होता. पुढें सल्जुकी लोकांचें प्राबल्य विशेष होऊन ते आपल्या राज्यांत लूट करूं लागले, असें पाहून त्याणें स्वतां त्यांजवर स्वारी केली, आणि त्याचें व सल्जुकी लोकांचा सरदार तोग्रल बेग याचें युद्ध मर्व शहराजवळ जाहलें. तेवेळीं मसाउदाचे फौजेपैकीं तुर्की लोक त्यास सोडून गेल्यामुळें त्याचा पराजय झाला, आणि तो गजनीमध्यें बखेडा चालला होता तो मोडावयास पुरे इतकी फौज जमा होईना म्हणून तिकडे जाण्याचें टाकून हिंदुस्थानाकडे चालला. त्याचे फौजेनें फितूर होऊन त्याचा खजीना लुटला, आणि त्यास गादीवरून काढून त्याचा आंधळा भाऊ महंमद यास राज्याधिकार दिला. त्याणेंही आपल्या हातून कारभार निभावेना म्हणून सर्व राज्य आपला मुलगा महंमद याच्या स्वाधीन केलें. त्याणें आपला पदच्युत केलेला चुलता मसाऊद याचा जीव घेतला, हा पहिला पराक्रम केला. १०४०

३. मसाउदीनें दहावर्षें राज्य केलें, तितक्यांत मोठमो-
ठाल्या इमारती बांधून आणि विद्वान् लोकांस आश्रय देऊ-
न महमुदाचा योग्यपुत्र अशी कीर्ति संपादन केली.

४. मसाउद मारला गेला तेवेळीं त्याचा मुलगा मोदू-
द, बल्क एथे होता. तेथून त्याणें परत त्वरेनें येऊन आ-
पले प्रतिस्पर्धी यांस मारून राज्य स्वाधीन करून घेतलें.
पुढें त्याच्या भावानें बंड केलें तें मोडून सल्जुकी लोक प-
श्चिमेकडील प्रांत घेत चालले होते, त्याच्या सरदाराच्या
कुळांत सोयरीक करून, त्याणें कांहीं वेळ पर्यंत त्यांचा
स्नेह संपादन केला. परंतु पुढें लौकरच ते त्याजबरोब-
र कलह करूं लागले. त्यांत गुंतल्यामुळें त्यास हिंदु-
स्थानाकडे लक्ष ठेवणें न जाहलें; म्हणून दिल्लीच्या हिं-
दुराजानें, लाहोर शिवाय करून पंजाब प्रांतांतील कां-
हीं प्रदेश घेतला, त्याच्या बंदोबस्ताकरितां मोदूदानें
इ० स० १०४९ तिकडे जावें इतक्यांत तो मोदूद मरण पावला.

५. नंतर त्याचा भाऊ अबुलहसन याणें त्याच्या मु-
लास मारून सिंहासन बळकाविलें, परंतु या गोष्टीस
दोन वर्षें जाहलीं नाहींत, इतक्यांत त्याचा चुलता, अ-
१०५१ बदुलरसीद, हा त्यास पदच्युत करून गादीवर बसला.

६. नव्या बादशाहानें पूर्वीच्या राज्यांत गेलेला पंजा-
ब प्रांत स्वाधीन करून घेतला. नंतर त्याचा सरदार तो-
ग्रल बेग याणें येऊन गजनीमध्यें त्याचा पराजय केला.
तो तोग्रल बेग यास व सीस्तानांतून आपल्या हातीं सां-

पडलेले गजनवी वंशाचे इतर सर्व शाहाजादे यांस मारून आ-
पण राज्य करूं लागला; परंतु चाळीस दिवसांनंतर तो मार-
ला गेला, व गजनवी वंशांतील कोणी सुलतान फरुखजाद इ० स०
हा तक्ताचा अधिपति जाहला. त्याणें सल्जुकी लोकांनीं घे- १०५२
तलेलें राज्य परत हस्तगत करण्याकरितां यत्न केला. तो बरा-
च सिद्धीस गेला होता, इतक्यांत तो बादशाह मरण पावला. १०५८

७. नंतर फरुखजाद याचा भाऊ इब्राहिम राज्य करूं ला-
गला, तो मोठा विरक्त व देवभोळा असे. त्याणें एकतीस वर्षें
पर्यंत राज्य केलें, तितक्यांत विशेष लढाया केल्या नाहींत; स-
ल्जुकी लोकांनीं मागितलेला तो मुलुक त्यांस देऊन त्यांशीं
तह केला, आणि आपलें आयुष्य कुराणाच्या प्रती करण्यां-
त व धर्माचरणांत घालविलें. तो मेला तेवेळीं त्यास चाळीस १०८९
मुलगे व छत्तीस मुली होत्या.

८. इब्राहिम बादशाहाचा मुलगा मसाऊद याचे वेळेस
मुसलमानांनीं पराक्रम करून गंगानदीच्या आलीकडील ती-
रापर्यंत मुलुक घेतला. त्याणें राज्याच्या बंदोबस्ताकरितां कां-
हीं चांगले कायदे केले होते. त्याचे वेळेस दरबार कांहीं वर्षें
पर्यंत लाहोर एथे होतें. १११४

९. मसाऊद मेल्यानंतर त्याचा मुलगा अरसलान हा आ-
पल्या भावास कैद करून राज्य करूं लागला. तेवेळीं त्याचे आ-
ईस संताप येऊन तिणें आपला भाऊ सुल्तान संजर सल्जु-
की याजकरवीं आपला दुसरा मुलगा बहिराम यास गादीव-
र बसविलें. १११८

१०. तो बहिराम बादषाह बराच प्रतापी होता, आणि त्यास
विद्येचें व्यसन फार होतें. त्याच्या दरबारांत निजामी ह्मणून
मोठा कवि होता. त्याणें बहिरामाच्या आश्रयानें कितिएक ग्रं-
थ केले. या बादशाहाचें राज्य बहुत वर्षें पर्यंत निर्वेध चाललें.
पुढें त्याला आंवायी कुतुबुद्दीन गोरी याशीं त्याची कांहीं क-
लागत जाहल्या मुळें त्याणें त्यास बोलावून मारविलें. त्याचा रा-
गानें कुतुबुद्दीनाचा भाऊ सैफुद्दीन हा गजनीवर स्वारी क-
रून बहिराम यास पळवून थोडे दिवस पर्यंत गजनी एथे
आपण गादीवर बसला, परंतु लौकरच दरबारच्या लोकां-
नीं फितुर होऊन बहिराम यास सूचना पाठविल्यावरून
तो परत आला, आणि तो व सैफुद्दीन या उभयतांची लढा-
ई जाहली. तीमध्यें सैफुद्दीनाची फौज सर्व पळाल्यामु-
ळें त्याचा पराजय होऊन तो कैदेंत पडला. नंतर बहिरामा-
नें धिंड काढल्या प्रमाणें त्याची अप्रतिष्ठा व हाल हाल करू-
न त्यास मारिलें, व त्याच्या वजीराचाही प्राण घेतला.

११. हें वर्त्तमान मेलेल्या बादषाहाचा भाऊ अल्लाउद्दी-
न यास कळतांच त्याणें अतिशय क्रुद्ध होऊन गजनीवर
स्वारी केली, आणि तहाचें बोलणें आलें तें न ऐकतां आ-
णि सुलतान बहिराम याची फौज आपल्यापेक्षां फार आ-
हे हें मनांत न आणितां मोठ्या दृढ निश्चयें करून युद्ध के-
लें; आणि बहिरामाचें सैन्य सर्व मारून त्यास एकट्यास
पळण्याचें भास केलें. नंतर सात दिवस पर्यंत गजनी श-
हरामध्यें आग लावून देऊन लुटण्याची व उद्ध्वस्त करण्या-

ची पराकाष्ठा केली. बहुतकरून सय्यद वगैरे संभावित
लोक ठार मारिले; आणि महमूद, व मसाऊद, व इब्राहि-
म, यांशिवाय बाकीच्या सर्व राजांच्या कबरा व दुसऱ्या
मोठ्या मोठ्या इमारती मोडून जमीन दोस्त केल्या. अ-
सा त्या अल्लाउदीनानें क्रोधांध होऊन मोठा प्रळय केला,
त्यामुळें त्याची अपकीर्त्ति सर्वदा राहून इतिहासामध्यें
त्याच्या नावास जहांसोज ह्मणजे पृथ्वीजाळणारा असें
विशेषण जोडलें गेलें.

१२. बहिराम हिंदुस्थानाकडे पळत असतां या अन-
र्थाचें वर्त्तमान समजल्यामुळें व वाटेचे श्रम, आणि विप-
त्ति यांमुळें त्याच्या शक्ति क्षीण होऊन तो मरण पावला. इ० स० ११५२

१३. त्याचा मुलगा खुषरू याणें लाहोरास पोंचल्यावर
तेथील रयतेनें त्याचा जयजयकारपूर्वक मोठा आदर के-
ला, आणि त्याणें त्या ठिकाणींच राजधानी स्थापून सात
वर्षें पर्यंत राज्य केलें. नंतर त्याचा मुलगा खुषरू मलि-
क सिंहासनावर बसला. त्याणें आपल्या राहिलेल्या
प्रांतांमध्यें सत्तावीस वर्षें पर्यंत राज्य केल्यावर शेवटीं
गोरी वंशाच्या मुसलमानांनीं त्याचें राज्य हरण करून
गजनवी वंशाची समाप्ति केली. ११८६

प्रकरण ६

गोरीवंशाच्या राजांचें वर्त्तमान.

सन ११८६ पासून १२०६ पर्यंत.

१. गोरी वंशाचा मूळ पुरुष कोण व त्याची मूळ पीठि-
का कशी याचा निश्चय नाहीं. त्या वंशाचे राजे आणि त्यांच्या
प्रजा हे सर्व अफगाण होते. त्यांचा राजा अल्लाउद्दीन याणें
गजनी एथे फार संहार केला, त्याचा पुतण्या ग्यासुद्दीन
राज्य करीत असतां त्याचा भाऊ महंमद शाहाबुदीन या-
णें इसवी सन ११७६ पासून पंजाब, गुजराथ, व सिंध,
एथे दोन तीन वेळ स्वाऱ्या घातल्या, व खुश्रू मलिक या-
चा पराजय करून त्याच्या मुलास ओलीस घेतला. नंत-
र मलिक याणें फौज जमवून शाहाबुद्दीन याचा एक कि-
ल्ला परत घेतला. त्यावेळीं शाहाबुदीन याणें तह करण्या-
ची इच्छा दाखवून मलिक याचा मुलगा परत पाठविला,
त्यास तो मलिक भेटावयास येत असतां शाहाबुद्दीना-
नें एका एकीं आडवाटेनें निवडक स्वारांनिशीं येऊन
त्यावर हल्ला केला. त्याणें त्यास व त्याच्या कुटुंबांतील माण-
सांस कैद करून आपल्या भावाकडे पाठविलें, तेथे तीं कां-
हीं वर्षांनीं राज्याच्या बखेड्यांत मारलीं जाऊन गजनवी वं-
ई० स० ११८६ शलयास पावला.

२. त्यावेळीं हिंदुस्थानांत दिल्ली एथे तुवार वंशाचे
रजपूत राजे राज्य करीत होते. तसेंच अजमीर एथे च-

व्हाण, कनोज एथे राठोर, आणि गुजराथेंत चालुक्यांच्या
मागून वाघले या नावाचे रजपूत सत्ताधारी होते, आणि दि-
ल्लीचा तुवार राजा याणें मरतेवेळेस आपला नातू अजमीर-
चा पृथुराजा यास राज्याचा अधिकारी केल्यामुळें तुवार आ-
णि चव्हाण, या दोनही वंशांचा मुख्य एकच होता.

३. या पृथुराजावर शाहाबुद्दीन याणें प्रथम हल्ला केला,
त्यावेळीं पाणिपतच्या मैदानांत त्याचा पराजय होऊन त्या- ई० स०
च्ये फौजेची वाताहत जाहली, आणि हिंदूंनीं वीस कोस प- ११९२
र्यंत त्याच्या मागून पाठलाग केला. परंतु शाहाबुद्दीन लढा-
ईतून परत स्वदेशास गेला. तो तेथे फार दिवस न राहतां,
अफगाण लोकांची मोठी फौज घेऊन परत हिंदुस्थानांत
आला, आणि त्याणें मोठें युद्ध केलें. त्यांत बहुत हिंदु सरदा- ११९३
र पडले, आणि पृथुराजा शत्रूंच्या हातीं सांपडून ठार मारि-
ला गेला. नंतर शाहाबुद्दीन निघून परत स्वदेशास गेल्या-
वर त्याचा सरदार कुतुबुद्दीन याणें दिल्ली प्रांत हस्तगत के-
ला. पुढें शाहाबुद्दीन कित्येक वेळा हिंदुस्थानास परत
आला. तो व त्याचे सरदार कुतबुद्दीन व महंमद बखत्या-
र यांणीं कनोज, अयोध्या, बाहार, व बंगाला हे प्रांत अनुक्र-
में जिंकून घेतले. नंतर तो परत स्वदेशास जाऊन आपला
भाऊ ग्यासुद्दीन हा मेल्यावर त्याचे जागीं तक्ताचा अधि-
पति जाहला. शाहाबुद्दीन याणें हिंदुस्थानांतील युद्धा- १२०२
मध्यें कित्येक प्रसंगीं फार निर्दयपणा केला. त्याणें अज-
मीर घेतलें तेवेळीं आपणास अडथळा करणारे शेंकडो लो-

कधरून ठार मारिले, आणि बाकीचे गुलाम केले.

४. शाहाबुद्दीन स्वदेशीं गेला, त्यामुळें व तिकडे त्याचे
फौजेचा नाश जाहल्याचें वर्तमान आल्यामुळें हिंदुस्थानां-
त बंडें जाहलीं होतीं, त्यांचा बंदोबस्त आपला सरदार कुतु-
बुद्दीन याच्या साहाय्यानें करून शाहाबुद्दीन परत स्वदेशा-
स जात असतां सिंधुनदीच्या कांठीं गकर नावाच्या लोकां-
इ० स० १२०६ नीं त्याच्या डेऱ्यांत शिरून त्यास ठार मारिलें. शाहाबुद्दी-
न याच्या मरणसमयीं माळवा व कांहीं जवळचा प्रांत शि-
वाय करून बहुतेक उत्तर हिंदुस्थान त्याचे सत्तेखालीं हो-
तें.

५. त्याचा पुतण्या महंमद यास राज्य आवरेना ह्मणो-
न त्याच्या बापाच्ये वेळचा सरदार कुतुबुद्दीन, जो हिंदुस्था-
नांत स्वतंत्रपणें सत्ता करूं लागला होता, त्यास त्याणें रा-
जा असा किताब पाठवून दिला. नंतर कांहीं दिवसांनीं त्या-
चें सिंधुनदीच्ये पश्चिमेकडील राज्यही गेलें, आणि कोणी
एक युद्ध प्रसंगीं तो मारला जाऊन, गोरीवंशाची समा-
प्ति जाहली. (इ० स० १२१५)

भाग २.

अर्वाचीन इतिहास.

प्रकरण १.

गुलाम राजांचें वर्तमान.

सन १२०६ पासून १२८८ पर्यंत.

१. कुतुबुद्दीन लहानपणीं निशापूर एथे कोणा एकाचा
खरीद केलेला गुलाम होता. तो पुढें योग्यतेस येऊन वर
लिहिल्याप्रकारेंकरून हिंदुस्थानाचें राज्यपद पावला, ह्म-
णून त्याच्या वंशजांस गुलाम असें ह्मणतात. हा कुतुबुद्दी-
न गादीवर बसाच त्याच्या पूर्वीं वीस वर्षें पर्यंत मुलखांत
अमल करीत होता, त्याणें चार वर्षें पर्यंत बादशाहाचा अ-
धिकार करून आपल्ये नीतीची आणि सदाचरणाची अ- इ० स०
क्षय्य कीर्त्ति मागें ठेविली. १२१०

२. त्याचा मुलगा आराम त्याच्या मागें गादीवर बसला,
त्यामध्यें कांहीं मोठे गुण नव्हते. त्यास बारा महिन्यांच्या
आंत त्याचा मेहुणा अल्तमष याणें मारिलें. १२११

३. अल्तमष हा कुतुबुद्दीनानें प्रथम गुलाम खरेदी
केला होता; तो पदवीस चढतां चढतां, शेवटीं त्याचा जां-
वाई होऊन त्याच्या मागें गादीवर बसला.

४. अल्तमष राज्य करीत असतां मोगल लोकांचा स-
रदार जंघिसखान नामक याणें इराण व काबुल या देशांत

येऊन बहुत लोकांचा संहार केला. तो कंदहार एथील रा-
जाचा पाठलाग करीत सिंधुनदीपर्यंत आला होता; परंतु
तेथून परत इराणाकडे गेला. हें हिंदुस्थानच्या लोकांचें
भाग्य ह्मणावें. त्यावेळेचे मोगल लोक मुसलमान नव्ह-
ते, आणि लोकांनीं त्यांचा धर्म घ्यावा ह्मणून ते त्यांस उप-
द्रव करीत असें नाहीं; केवळ मनुष्यांचा नाश करावा आ-
णि त्यांस दुःख द्यावें यांतच ते सुख मानीत असें दिसतें.

५. अल्तमष याणें सिंधुदेश हस्तगत केला. तसा-
च बंगाल, बाहार, व माळवा, या प्रांतांत आपला अ-
मल पुर्त्तेपणें बसविला. त्याचा वजीर व त्याच्या आश्र-
या खालचे विद्वान् लोक मोठे संभावित होते. दिल्लीज-
वळ कुतुब मीनार ह्मणून एकशें साठ हात उंच शोभि-
वंत व नकशीदार मनोरा आहे तो या राजाच्या राज्यां-
त तयार जाहला. त्या मनोऱ्याच्या जवळ एक अपुर्ती
सर्वोत्कृष्ट मशीद आहे. तिच्यावरील लेख पाहतां ती
शाहाबुद्दीन गोरी याच्या वेळीं जाहली असें वाटतें.

६. याबादषाहानंतर त्याचा मुलगा रुक्नुद्दीन गादी
इ० स० १२३६ वर बसला. तो कळावंतिणी, गवई, व छचोर लोक यां-
स मनस्वी पैका देऊं लागला, आणि त्याणें राज्याचा का-
रभार आपले आईचे स्वाधीन केला. तिणें जुलुम व क्रू-
र कर्मे करण्याचा आरंभ केला, त्यामुळें सर्व लोकांनीं
१२३६ त्रासून सात महिन्यांनीं त्यास पदच्युत केलें. व त्याची
बहीण रजिया बेगम इला सिंहासनावर बसविलें. ही

बेगम कांहीं गुणी व विद्वान् होती, आणि आरंभीं एक दोन
बंडें मोडण्यांत तिणें आपलें शौर्य व हुशारी प्रकट केली, परं-
तु पुढें तिणें एका हलक्या मनुष्यावर प्रीति केल्यामुळें अमी-
र लोकांस निजविषयीं तिरस्कार येऊन तिला त्यांणीं धरू-
न कैदेंत ठेविलें. तेथे ती ज्याच्या प्रतिबंधांत होती, त्या अल्-
तूनिआ सरदारास वश करून तिणें त्याशीं लग्न केलें, आणि
राज्य घेण्याकरितां फौज जमविली. नंतर ती आणि मान-
करी यांच्या दोन मोठ्या लढाया झाल्या; आणि ती व ति- इ० स०
चा नवरा या दोघांस कैद करून मानकऱ्यांनीं ठार मारिलें. १२३९

७. पुढें रुक्नुद्दीनाचा भाऊ मवज्जुद्दीन बादषाहा जाह-
ला. त्याणें दोन वर्षें दोन महिने राज्य केल्यावर फौजेनें त्या-
स कैद करून तो मेला. नंतर रुक्नुद्दीन याचा मुलगा अल्ला- १२४१
उद्दीन मसाऊद याणें ही तितकेंच राज्य करून तशीच अव-
स्था करून घेतली. या दोन राजांच्या कारकिर्दीत मोगल लो-
कांनीं पंजाबेवर एक, व बंगाल्यावर एक अशा दोन स्वा-
ऱ्या केल्या, परंतु त्या लोकांचा पराजय विशेष आयास न ला-
गतां जाहला.

८. मसाउदाच्या मागें अल्तमषाचा नातू नासरुद्दीन
महंमद नामें तख्ताधिपति जाहला. त्याणें यमुनेच्या कांठीं
व बुंदेलखंडांत, व मेवात, चितूर, चांदेरी, इत्यादि प्रांतां-
त जेथे पूर्वीं बखेडा जाहला होता, तेथे आपला अंमल ब-
सविला. तसेंच पंजाबेंत मोगलांनीं एक दोन वेळ हल्ले
केले, ते त्याचा सुभेदार शीरखान याणें परत लाविले.

त्यांस गकर वगैरे लोकांनी मदत केली होती, त्यांचें पारिप-
त्य केलें, आणि सिंधवगैरे प्रांतांत बंडें जाहलीं होतीं त्यां-
चा बंदोबस्त केला. या राजाच्या राज्यांत जंघिसखानाचा
नातू होलाखुखान याजकडून वकिलात आली होती.
त्या वकीलांच्या बहुमानार्थ दरबारामध्यें मोठी शोभा के-
ली होती, तिचें व त्यावेळच्या वैभवाचें वर्णन बहुत विस्ता-
इ० स० रेंकरून केलें आहे. या प्रमाणें वीस वर्षें पर्यंत राज्य करू-
१२६६ न नासरुद्दीन मरण पावला.

९. हा नासरुद्दीन बादशाह आपल्या खासगत संसा-
रांत दर्वेषा प्रमाणें वागत असे. इतकें वैभव असतां तो
आपण स्वहस्तेंकरून पुस्तकें लिहून त्याणेंकरून उत्पन्न
जाहलेल्या द्रव्यावर चरितार्थ चालवी. तो इतर राजांप्र-
माणें स्त्रीलंपट नव्हता, त्याची एकच राणी होती, तिज-
कडून तो स्वतः रोज स्वयंपाक करवीत असे. कोणा ए-
कीं दिवशीं तिचा हात भाजून ती तें गान्हाणें सांगायास
आली, आणि आंपणास एक दासीची नेमणूक करून द्या-
वी ह्मणून बोलिली. त्या बोलण्यावर त्याणें उत्तर केलें कीं
मी राज्याचा आमदार आहें, मला निरर्थक खर्च करण्या-
स सत्ता नाहीं. या राजास विद्येचें व्यसन होतें. तबका-
त नासरी ह्मणून इराण देशाची तवारीख त्याच्या दरबा-
रांत जाहलेली प्रसिद्ध आहे. नासरुद्दीन इतका भला अ-
से कीं त्याणें लिहिलेल्या ग्रंथांत कोणी एका अमीरानें कां-
हीं अशुद्धें काढिलीं, तीं त्याणें त्याच्या देखत फिरवून तो

गेल्यानंतर पूर्ववत् होतीं तशीं केलीं. त्याचें कारण त्या-
स विचारिलें तेव्हां तो बोलला कीं तीं अशुद्धें नव्हतीं हें
मला ठाऊक होतें, परंतु त्याच्या अंतःकरणास वाईट वा-
टेल ह्मणून मी त्यावेळेस फिरविलीं.

१०. नासरुद्दीनाच्या मागें ग्यासुद्दीन बल्बन बादशा- इ० स०
ह जाहला. हा लाहानपणीं गुलाम असून अल्तमष या- १२६६
च्या दरबारांत वाढला होता. मागील राज्यांच्या सर्व बखे-
ड्यांत वागून शेवटीं नासरुद्दीनाच्ये वेळेस हा वजीराचा
अधिकार पावला, आणि मध्यें कांहीं वेळ पर्यंत त्याच्ये
इतराजी खालीं येऊन कामांतून दूर जाहला असतां, याला
पुनः आपल्या कामावर बोलावणें बादशाहास प्राप्त पडलें.

११. बुल्बनाच्या राज्यांत आरंभींच मेवातेमध्यें व इ-
तर प्रांतांमध्यें लुटारू लोकांनीं बंडें केलीं त्यांचा त्याणें चां-
गला बंदोबस्त करून, सर्वत्र ठाणीं घातलीं. मेवातेमध्यें
त्याणें एक लक्ष लोक मारिले, आणि तेथील रान तोडून
पूर्वीं चोरांस राहावयाच्या ज्या जागा होत्या तेथे वस्ती
व लागवड व्हावयाजोगें केलें. तसेंच दुसरें बंड बंगाल्यां-
त जाहलें. तें असें कीं, तेथील सुभेदार तोग्रल्खान खं-
डणी पाठवावयाची तीन पाठवितां आपणास बादशा-
ह ह्मणवूं लागला. त्याच्या बंदोबस्ताकरितां पाठविले-
ल्या दोन फौजा त्याणें पळविल्या. तेवेळीं बादशाहानें
स्वतः त्यावर स्वारी करून तो पळूं लागला असतां त्या-
चा पाठलाग बहुत दूर पर्यंत केला. शेवटीं त्याच्ये फौजे-

Oriental MSS. Library.
Triplicane P.O., Mad

चीयातीहत होऊन तो तोग्रलखान नदींतून घोड्यावर बसून पोहत जात असतां बुडून मरण पावला.

१२. बुल्बनाचा मुलगा महंमद मोठा शूर होता. त्याणें इराणचा मोगल बादशाह आर्बुन खान याच्ये फौजेस दोन वेळ हटवून त्यांणीं घेतलेला मुलुख परत हस्तगत केला; परंतु यांतून शेवटल्ये लढाईमध्यें तो शाहाजादा पडला, व अमीर खुस्रु नामाचा बादशाहाच्ये प्रीतींतील कोणी एक कवि धरला गेला. त्याप्रसंगीं सैन्यांतील सर्व लाहान मोठ्या लोकांच्या डोळ्यांतून अश्रु आले, आणि बादशाहास परमदुःख होऊन पुढें तो लौकर
इ० स० १२८६ रच मरण पावला.

१३. हाबुल्बन राजा शूर व मसलतदार होता. त्याच्या दरबारचें वैभव आणि त्याचें औदार्य यांची कीर्ति फार होऊन मोगलांनीं काढून दिलेले राजे पंधा त्याच्या अश्रयास येऊन राहिले होते; आणि त्याचा मुलगा महंमद हा गुणी व विद्येचा अभिमानी होता. त्याच्या पदरीं बहुत कवि होते. परंतु या बादशाहामध्यें क्रौर्य हा मोठा दोष होता. कोणी बंड केलें असतां त्यास व त्याच्या जवळच्या सर्व माणसांस, तो ठार मारीत असे, आणि कोणी सुभेदारानें अपराध केला असतां त्यास आपल्या समक्ष प्राण जाई पर्यंत कोरड्याचा मार देवीत असे. बंगालच्या सुभेदाराचें पारिपत्य करण्याकरितां प्रथम फौज गेली, तिचा जय जाहला नाहीं, म्हणून तिच्या सरदारास त्याणें फांशी दिलें.

१४. महंमद याचा मुलगा कैखुस्रू याणें आपल्या मागें राज्य करावें असें बुल्बनानें ठराविलें असतां तें एकीकडे ठेवून, बकाराखान म्हणून त्याचा जो मुलगा बंगालचा सुभेदार होता, त्याचा मुलगा कैकुबाद, यास दरबारांतील लोकांनीं गादीवर बसविलें. तो अठरा वर्षें वयाचा व ख्याली खुशालींत निमग्न असे, त्यामुळें राज्यांतील सर्व कारभार त्याचा वजीर निजामुद्दीन हा करूं लागला, व त्याणें आपणास राज्य प्राप्त व्हावें या हेतूनें कैखुस्रू यास मारेकरी घालून मारविलें. असें वर्तमान ऐकून बादषाहाचा बाप बंगाल्याहून बंदोबस्ताकरितां आला असतां वजिराच्या सांगण्यावरून युद्धाचे तयारीनें कैकुबाद पुढें गेला; परंतु ज्या वेळीं पितापुत्रांची भेट जाहली, आणि बकाराखान आपल्या पुढें मुजरा करीत आहे आणि अश्रूंनीं त्याचे डोळे भरले आहेत, असें बादषाहानें पाहिलें, त्यावेळीं पूर्वींच्या मसलतींची विस्मृति होऊन त्याणें जाऊन आपल्या बापाच्या गळ्यास मिठी मारिली, आणि पुढें त्याचा फार बहुमान करून त्यास ठेवून घेतलें. परंतु वजीरापुढें आपलें कांहीं चालत नाहीं असें पाहून बकाराखान, परत बंगाल्यास गेला. नंतर बादषाह याणें किंचित् सावध होऊन आपल्या वजीरास विषप्रयोगें करून मरविलें. तो बादषाह विषयासक्तपणामुळें त्यातरुण वयांतच रोगी व अशक्त जाहला. तेव्हां तो राज्यास उपयोगी नाहीं असें ठरवून गिलची फौजेनें त्या-

समारिलें, आणि आपला सरदार जलालुद्दीन यास सिंहा-
सनावर बसविलें.

प्रकरण २

गिलची अथवा खिलजी वंशाच्या राजांचें वर्त्तमान.

सन १२८८ पासून १३२१ पर्यंत.

१. जलालुद्दीन सिंहासनारूढ जाहला ते वेळेस त्याचें व-
इ० स० १२८८ य सत्तर वर्षांचें होतें.

२. या बादशाहानें सात वर्षें पर्यंत राज्य केलें, त्यांत प्र-
थम बुल्लबन याचा पुतण्या मलिक ज्याजु याणें करा एथें सु-
भ्यावर असतां बंड करून दिल्लीवर स्वारी केली. तीमध्यें त्या-
चा पराभव जाहला, परंतु बादशाहानें त्यास कांहीं शिक्षा
न करितां नेमणूक करून देऊन मुलतानास पाठविलें. त्या-
प्रमाणेंच पंजाबेंत मोगलांनीं स्वारी केली होती, त्यांवर
जाऊन त्याणें त्यांचा पराजय केला, परंतु त्यांशीं क्रौर्यानें
न वागतां तह करून घेतला. त्यांतून ३००० लोक त्याच्या
लष्करांत चाकरीस राहिले; आणि पुढें लोकरच मुसलमा-
न झाले. त्यांस त्याणें राहावयास दिल्लीच्या बाहेर जा-
गा नेमून दिली, तीस अद्यापि मोगलपुरा असें नाव प्रसि-
द्ध आहे.

३. माळव्यामध्यें बंदोबस्ता करितां जलालुद्दीनानें
दोन वेळ स्वाऱ्या केल्या. परंतु त्याच्या शांतपणामुळें तेथे

अंमल बसला नाहीं. पुढें त्याचा पुतण्या अल्लाउद्दीन, करा, व
अयोध्या, या प्रांतांचा सुभेदार, मोठा शूर आणि धैर्यवान्
होता, त्याणें ८००० निवडक स्वारांसहित वऱ्हाडांतून जा-
ऊन इलिचपुरापर्यंत बंदोबस्त केला. नंतर पश्चिमेकडे-
स नर्मदा नदी उतरून देवगिरी ह्मणजे दौलताबाद एथी-
ल राजा रामदेव याच्या मुलग्यास पराजित करून त्याज-
कडून इलिचपूर वगैरे प्रांत व बहुत द्रव्य घेऊन परत आ-
पल्या सुभ्यास आला. त्यावेळीं, अल्लाउद्दीन याचें लक्ष्य
आपणास राज्य मिळण्याकडे आहे, असें बादशाहास ब-
हुत लोकांनीं समजाविलें असतां त्यास तें खोटें वाटून तो
अल्लाउद्दीनास भेटावयास थोड्या लोकांसहित भागीर-
थीपलीकडे गेला. त्या उभयतांचे भेटीचे वेळेस बादशा-
ह प्रीतीनें अल्लाउद्दीनाच्या गालावरून हात फिरवितो
आहे, इतक्यांत त्याणें मारेकऱ्यांस खूण केली, त्यां-
णीं तत्क्षणीं बादशाहाचा प्राण घेतला. त्याचें डोकें भा- इ० स० १२९५
ल्यास टोंचून अल्लाउद्दीनानें शहरांत व लष्करांत सर्वत्र
फिरविलें.

४. जलालुद्दीन फार सत्वस्थ व सौम्य होता. त्यास
राज्याधिकार प्राप्त जाहल्यावरही तो आपल्या जुन्या मि-
त्रांस बोलावून त्यांशीं पहिल्याप्रमाणें जेवण खाण वगैरे
व्यवहार ठेवीत असे. तो आपल्या शत्रूंस आणि अपरा-
ध्यांसही क्षमा करीत असे. त्यामुळें राज्यांत बंडें व चोरां-
चा उपद्रव होत चालला होता, तथापि कोणास देहांतद-

ड करावा असें त्याच्या मनांत येईना. या बादशाहानें बुल्लबनाच्या लहान मुलास कैदेंत ठेवून पुढें त्याचा जीव घेतला असे लेख आहेत, परंतु याविषयीं निश्चय नाहीं. याशिवाय जलालुद्दीनाविषयीं दुसरी एक लिहावयाजोगी गोष्ट आहे. शिद्दी मौला ह्मणून एक दर्वेष दिल्लीमध्यें दान धर्म बहुत करीत असे. त्याजवळ परीस आहे, असें वर्त्तमान बादशाहास कळल्यावरून त्याणें त्या दर्वेषास व त्याच्या जवळच्या लोकांस आपले जवळ आणून ठार मारविले, त्यावेळेस त्या दर्वेषानें बादशाहास शाप दिला. त्याप्रमाणें तेंव्हांच वाव्हटळ सुटून बादशाहास चिंता उत्पन्न जाहली. पुढें त्याचा वडील मुलगा मारला, पर्जन्य गेला, व दुष्काळ पडला, नंतर कांहीं दिवसांनीं बादशाहही मारिला गेला. हे अनर्थ दर्वेषाच्या शापानें जाहले, असें लोक बोलूं लागले.

५. अल्लाउद्दीनानें तक्तावर बसतांच मागील बादशाहाचे दोन मुलगे ठार मारिले, व त्याच्ये राणीस कैद करून ठेविलें.

६. पुढें लौकरच बादशाहाचा वजीर नसरत खान व त्याचा भाऊ अलीफ खान यांणीं जाऊन गुजराथ प्रांत घेतला. तेथील राजा बागलाणांत पळून गेला. त्या सरदारांस मिळालेली लूट सरकारास द्यावयाविषयीं जबरी केल्यामुळें लष्करांत मोठा भयंकर बखेडा होऊन बादशाहाचा पुतण्या मारिला गेला. पुढें त्या बंडाचा बंदोबस्त झाला, परंतु त्याच्या संबंधानें बहुत लोक मुलांलेंकरांसुद्धा मारिले गेले. त्यांतून कितिएक रतनभोर एथील राजाच्या आश्रयास जाऊन राहिले. पुढें जेव्हां तीन वर्षांनीं तो किल्ला हस्तगत झाला, तेव्हां अल्लाउद्दीनानें त्या लोकांस तेथील राजा व त्याचें कुटुंब यांसहित ठार मारिलें.

७. रतनभोर एथे बादशाहाची स्वारी होती तेवेळीं, त्याचा पुतण्या याणें एकादिवसीं तो शिकार करीत असतां, कितिएक मोगलांकरवीं त्यास मारण्याचा (ह्मणजे तो जसा आपल्या चुलत्यास मारून गादीवर बसला होता तसे करण्याचा) आपण प्रयत्न केला; परंतु मारेकऱ्यांच्ये बाणवृष्टींतून बादशाह वांचला, आणि तो शाहाजादा व त्याचे मदतगार हे मात्र प्राणांस मुकले. त्याच्या दुसऱ्या दोन पुतण्यांनीं बदायूम एथे बंड केलें, त्यांसही त्याणें धरून प्रथम त्यांचे डोळे काढून मग शिरच्छेद केला. तसाच दिल्लीमध्यें हाजी मौला नामे एका गुलामानें लोक जमवून बंदिवान सोडण्याचा व खजिना वांटण्याचा आरंभ केला होता. इतक्यांत तेथील कामदारानें त्याच्या लोकांस घालवून देऊन त्यास ठार मारिलें. पुढें त्याचा पहिला धनी व त्याच्या कुटुंबाचीं माणसें यांजकडे कांहीं अपराध नसतां तीं सर्व बादशाहाच्या हुकुमावरून मारिलीं गेलीं.

८. या बादशाहाच्या राज्यांत मोगलांनीं बहुतवेळ हल्ले केले. त्यांत एक कुतलुघ खान याणें जो दिल्लीवर केला त्यापासून बादशाहास प्रथम मोठें भय प्राप्त जाहलें होतें, आ-

णि उभय पक्षीं सैन्यही फार जमलें होतें; परंतु शेवटीं तुमुल
युद्ध होऊन बादशाहाचा सरदार जफर खान याच्या पराक्रमाच्या
योगेंकरून बादशाहास जय मिळाला. त्यावेळीं लढायांत
जे मोगल सांपडत त्यांस दिल्लीस पाठवून, सरदारांस ह-
त्तीच्या पायीं बांधीत असत, व इतरांस तोडून त्यांचा प्राण
घेत असत. पुढें बादशाहानें आपल्ये चाकरींतून सर्व मोग-
ल दूर केल्यामुळें त्यांणीं बंड केलें, ते वेळीं त्यांतून १५०००
लोकांची कत्तल करून त्यांचीं मुलें लेंकरें विकून टाकिलीं.

९. अल्लाउद्दीन याणें मेवाडावर स्वारी करून चितूर ना-
में किल्ला घेतला, आणि तेथील राजा हम्मीर, यास कैद क-
रून कांहीं वेळ पर्यंत तेथील अधिकार त्याच्या वडील मुला-
स सांगीतला. पुढें तो किल्ला माळवदेव नामें रजपूताच्या
स्वाधीन केला. याच वेळेस वरंगूळ घेण्याकरितां एक ल-
ष्कर तैलंगणांत रवाना जाहलें, त्याच्या हातून कित्येक
वर्षे पर्यंत कांहीं पराक्रम घडला नाहीं. पुढें मलिक काफू-
इ० स० १३०६ र याणें देवगड जिंकून तैलंगणांत स्वारी केली, आणि वरं-
गूळच्या राजाचा पराजय करून त्याणें खंडणी द्यावी अ-
१३०९ सें ठरविलें.

१०. पुढील वर्षीं काफूर याणें देवगडाच्ये वाटेनें पैठणा
जवळ गोदावरी नदी उतरून कर्नाटकांत स्वारी केली. तो
द्वारसमुद्र नामें राजधानी घेऊन, तेथील बल्लाळ राजाचें रा-
ज्य मल्याळापासून रामेश्वर पर्यंत हस्तगत करून, व ब-
हुत द्रव्य घेऊन परत दिल्लीस आला. नंतर आणखी एक

वेळ दक्षिणेंत स्वारी करून रामदेव जाधवाचा मुलगा देवग-
डचा राजा त्याणें ठार मारिला, व सर्व महाराष्ट्र आणि कर्ना-
टकदेश घेऊन तेथील राजांवर खंडणी बसविली. परंतु पु- इ० स० १३१२
ढें अल्लाउद्दीन वृद्ध आणि अशक्त जाहला यामुळें दरबारां-
त अव्यवस्था जाहली. यास्तव गुजराथेंत बंड जाहलें; रा-
णा हम्मीर याणें चितूर परत घेतलें; आणि रामदेवाचा जां-
वाई हरपाळ याणें दक्षिणेंत मोठा फितूर करून मुसलमा-
न किल्लेदारांस हांकून दिलें. नंतर लौकरच अल्लाउद्दीन
मरण पावला. त्यास काफूर याणें विषप्रयोग केला असें १३१६
वर्तमान ते वेळेस प्रसिद्धींत आलें.

११. अल्लाउद्दीनाचा स्वभाव निर्दय आणि घातकी होता
हें त्याचीं जीं कर्में वर लिहिलीं त्यांवरून स्पष्टच आहे. तो
सिंहासनारूढ होई पर्यंत त्यास लिहितां वाचतां येत नव्हतें,
तथापि माझ्याइतका कोणी शाहणा नाहीं असा अभिमा-
न होता. त्याणें जसें राज्य बहुत मिळविलें तसाच त्याचा
बंदोबस्तही मोठ्ये युक्तीनें राखिला होता. लोकांजवळ
द्रव्य अधिक उणें जाहल्यामुळें शेतकरी यांजवळ असुक
पर्यंत जमीन असावी, व गवळ्यांनीं असुक गुरें बाळगा-
वीं, असा निर्बंध ठरविला; नेमणुकी कमी केल्या; सरका-
र देणें वाढविलें; तसाच कोणी मातबर जाहला असतां त्या-
ची मिळकत जप्त करण्यास आळस केला नाहीं. याच री-
तीनें लोकांच्या कल्याणार्थ सरकार तर्फेनें कोठारें केलीं
होतीं, आणि दाणा मुलुकांत यावा, बाहेर जाऊं नये, व को-

णी एकदम धाऊक खरेदी करूं नये, असा बंदोबस्त राखिला होता.

१२. अल्लाउद्दीनाच्या मागें त्याचा सरदार काफूर याणें त्याच्या दोन वडील मुलांचे डोळे काढून, तिसरा मुलगा सुबारीक याचा जीव घेण्यास मारेकरी पाठविले, परंतु त्यांला दया येऊन त्यांच्या हातून तें काम जाहलें नाहीं. पुढें काफूर यास प्रयत्न करण्यास अवकाश मिळण्याच्या पूर्वीं बादषाही हुजूर पाहाऱ्याच्या लोकांनीं त्यास ठार मा-
इ० स० १३१७ रून सुबारीक यास गादीवर बसविलें.

१३. याबादषाहानें गुजराथेंत अंमल बसविण्याकरितां फौज पाठविली, आणि हरपाळास कैद करून त्याच्या आंगाचें कातडें सोलून काढिलें, तसाच त्याचा वजीर खुसरूखान याणें एक वर्ष पर्यंत युद्ध करून मलबार प्रांत हस्तगत केला, आणि तिकडून बहुत संपत्ति दिल्लीस आणिली.

१४. राज्याच्या आरंभींच सुबारिकानें पूर्वीं जप्त केलेल्या जमिनी सोडिल्या, कर माफ केले, आणि एकदांच १७००० बंदिवान सोडून दिले, परंतु याचां गल्याकृत्यांपेक्षां बहुत अविचार करून आणि कळावंतिणीं बरोबर प्रसिद्धपणें नाचावयाच्या आणि मद्यप्राशन करण्याच्या छंदांत पडून राज्याची काळजी सोडिली; आणि मोठमोठ्या कितिएक अमीर लोकांस ठार मारिलें. तेवेळेस त्याचा वजीर खुसरूयाणें संधिसाधून त्यास व

त्याच्या मुलांमाणसांस मारून मारून आपण गादीवर बसला. {इ० स० १३२१ मार्च ता. २४
परंतु पंजाबचा सुभेदार गाजीखान याणें आपल्या हाताखालचें अनेक युद्ध प्रसंग पाहिलेलें लष्कर बरोबर आणून खुसरूचा पराजय करून त्याचें आयुष्य व त्याचें राज्य यांची एककाळीं समाप्ति केली. (आगस्त ता॥ २२). १३२१

१५. त्यावेळेस प्राचीन राजवंशाचा कोणी गादीवर बसवावा असा गाजीखान याणें आपला अभिप्राय जाहीर केला; परंतु पूर्वींच्या राजवंशांतील कोणी पुरुष जीवंत राहिला नाहीं, असें पाहून सर्वांनीं गाजीखान यासच सिंहासनावर स्थापिलें. त्याणें ग्यासुद्दीन तघलख हा किताब धारण केला.

प्रकरण ३

तघलख वंशाचें वर्त्तमान.

सन १३२१ पासून १४१२ पर्यंत.

१ ग्यासुद्दीन तघलख हा बुलबन याचे दासीचा पुत्र, याणें जसें निर्दोष रीतीनें राज्य मिळविलें, तसाच त्याचा उपभोगही शांतपणानें यथान्याय केला.

२. त्याचा मुलगा यूनाखान याणें प्रथम तैलंगणावर स्वारी केली, तेवेळेस तो उद्योग सिद्धीस न जातां ३००० स्वारां सहित तो परत आला. परंतु दुसरे स्वारींत त्याणें वरंगूळ घेऊन तेथील राजास कैद करून दिल्लीस आणिलें.

३. याबादषाहाच्या बापाचा यजमान, पूर्वींचा कैकुबाद

राजा याचा बाप बकाराखान,हा पहिल्या पासून अजून पर्यंत
बंगाल्याच्या सुभ्याच्या कामावर होता, त्यास बादशाहाची
स्वारी तेथे गेली, तेव्हां त्या अधिकारावर कायम करून राज-
चिन्हें धारण करण्यास मोकळीक दिली, आणि सोनार
गांव ह्मणजे धाका,या प्रांताचा बंदोबस्त करून व तिर्हुत
एथील राजास कैदीक रून बादषाहाची स्वारी मागें फिर-
ली.

४. वाटेंत शाहाजादा घूनाखान याची गांठ पडली. ते-
वेळीं भेटीकरितां जोडेरा दिला होता, तो अकस्मात् खा-
लीं पडून, बादषाह मरण पावला. त्याप्रसंगीं घूनाखान
तेथे नव्हता, आणि बादषाहाच्ये आवडीतला दुसरा मु-
लगा तो बापाबरोबर मेला गेला, या संदर्भावरून पाह-
तां डेरा पाडण्याची युक्ति घूनाखानानें बुध्या केली असे-
ल असें अनुमान होतें.

५. दिल्ली एथील तघलखाबाद गढी, ग्यासुद्दीन याचे
वेळची बांधलेली आहे.

६. घूनाखान सुलतान् महंमद या नावानें सिंहासना-
रूढ जाहल्यानंतर, त्याणें प्रथम तैमुरशिनखान ह्मणून
मोगल लष्करासहित पंजाबेंत शिरला होता त्यास मनस्वी
खंडणी देऊन परत घालविला, आणि दक्षिणे मध्यें आ-
पली सत्ता चालू केली.

७. परंतु पुढें त्याणें फार जुलुम व जबरदस्ती करण्या-
चा आरंभ केला, त्यामुळें लोक पळून जाऊं लागले असतां

त्याणें कनोज वगैरे ठिकाणीं लष्कराचा वेढा देऊन हजारों नि-
रपराधी माणसें पशूंसारिखीं ठार मारिलीं. याकारणास्त-
व राज्यांत अनेक ठिकाणीं बंडें जाहलीं. त्यांपैकीं माळवा ए-
थें बादषाहाच्या पुतण्यानें जें केलें होतें, व पंजाबेंत मलि-
क्बेराम याणें जें केलें होतें, त्या दोहोंचीही शांति लौकरच इ०स०
होऊन त्यांतील मुख्यांस ठार मारिलें. परंतु बंगाल्यांत को- १३३८
णी मुसलमानानें जें बंड केलें होतें व पूर्व समुद्राच्या कांठीं
जें दुसरें एक बंड जाहलें होतें,त्या दोहोंचा बंदोबस्त पुनः क-
धीं जाहला नाहीं. ती अव्यवस्था पाहून कर्नाटकच्या बल्ला- १३४०
ळ राजानें तुंगभद्रेच्या कांठीं विजयनगरांत एक नवी रा-
ज्याची गादी स्थापिली, आणि तैलंगणच्या राजानें वरंगू-
ळ एथील लष्कर हांकून देऊन तेथे आपली राजधानी
केली. १३४४

८. आणखीही दक्षिणेंत व इतर प्रांतांत किति एक मोठ
मोठीं बंडें जाहलीं, त्यांचा बंदोबस्त बादषाहानें करून आप-
ला जांवाई इमादुल्मल्क यास दक्षिणेंतील सुभ्याचें काम सां-
गीतलें. इतक्यांत माळव्यांतील नव्या सुभेदारानें सत्तर मो-
गल अमीर ठार मारल्यामुळें त्यालोकांनीं गुजराथेंतील फौ-
जेस अनुकूळ करून घेऊन त्या प्रांतांत मोठी धुमाळी आरं-
भिली. तिचा बंदोबस्त बादषाहानें स्वतां करून शत्रूंच्या रा-
ज्याप्रमाणें खंबायत,व सुरत,हीं दोनही शहरें लुटलीं. १३४७

९. गुजराथेंतील किति एक बंडवाल्यांस दक्षिणेंतील
मोगल अमीरानीं आश्रय दिल्याचें वर्त्तमान बादषाहास स-

मजून त्याणें त्यांच्या पारिपत्या विषयीं हुकूम केल्यामुळें तेथें मो-
ठें एक बंड होऊन शेवटीं ब्राह्मणी वंशाची बादशाही स्थापिली
गेली.*

१०. यादक्षिणेंतील बंडाच्या पूर्ण बंदोबस्त होण्याच्या पूर्वीं
महंमद बादशाहास गुजराथेंत जाणें प्राप्त पडलें, तेथून बंड-
वाल्यांचा पाठलाग करीत तो पुढें सिंधेमध्यें जात असतां
इ० स० १३५१ त्यास दुखणें घेऊन तो ठठ्ठा शहरांत मरण पावला.

११. हाबादशाह आरबीमध्यें व फारसीमध्यें मोठा नि-
पुण, विद्यांमध्यें व शास्त्रांमध्यें प्रवीण, वैद्यकामध्यें कुश-
ल, युद्धामध्यें शूर. आणि देवसेवेमध्यें नैष्ठिक असा होता.
याणें राज्यामध्यें सर्वत्र धर्मशाळा, व सदावर्त्तें घातली हो-
तीं; आणि मोठ्या मोठ्या नेमणुका करून देऊन विद्वान् ज-
वळ ठेवून घेतले होते. या गुणांच्या योगें त्याचा सर्व लोक
विस्मय करीत होते.

१२. परंतु यामध्यें अविचार हा मोठा दोष होता; त्यामुळें
याणें विलक्षण आणि अशक्य अशीं कार्यें बहुत करावयास
आरंभून तीं सिद्धीस न गेल्यामुळें मागें आपल्या उपहासा-
स मात्र कारण करून ठेविलें. प्रथम इराण घेण्याची मस-
लत करून बहुत फौज जमविली, तिणें त्याचा खजीनास-
पविल्यावर सर्वत्र पसरून मुलुखाचें वाटोळें केलें. दुस-
री १००,००० फौज याणें तयार करून हिमालयाच्या पाहा-
डांतून चीन घेण्यास पाठविली. तिचा चिनई लोकांनीं प-

* याबादशाहीच्या आरंभींचा प्रकार व पुढील कथा हीं मराठ्यांच्या ब-
खरेंत प्रथम प्रकरणीं पाहावीं.

राजय करून तिला मागें हटविलें. ती परत येत असतां पर्ज-
न्यकाळ, अन्नाचा तोटा, इकडे नद्या भरलेल्या व घोर अरण्य,
व मागून शत्रु पाठलाग करीत आहेत, इतक्या अडचणीस्या
लष्करास भोगाव्या लागून शेवटीं सोबत्यांचें वर्त्तमान सां-
गावयास त्यांतून एकही माणूस परत आला नाहीं. कांहीं
लोक किल्ल्यावर त्यांणीं रखवालीस ठेविले होते तेच ती स्वा-
री फसण्याचें कारण ह्मणोन त्यांस जसा दंड करावा, तसें
त्यांस बादशाहानें ठार मारिलें.

१३. चिनामध्यें पैशाच्या ऐवजीं चिठ्या चालतात असें
ऐकून महंमद तघलख याणें रुपयांच्या ठिकाणीं तांब्याचे
तुकडे चालवावयाचा आरंभ केला. तो बेत त्याच्या बला-
त्कारानेंही सिद्धीस गेला नाहीं. परंतु त्यामुळें व्यापारीलो-
कांचें आणि प्रजेचें मोटें नुकसान होऊन शेवटीं त्याचा खजी-
नां रिकामा पडण्याचा प्रसंग आला. त्याच रीतीनें देवग-
डाची जागा त्यास फार चांगली वाटून त्याणें त्यास दौलता-
बाद असें नाव दिलें. पुढें दिल्ली ओसाड पाडून सर्व लोकां-
नीं तेथें जाण्या विषयीं दोन तीन वेळा महत्प्रयास केला,
आणि जे न जातील त्यांस ठार मारावें असें ठरविलें; परंतु
तो बेत सिद्धीस गेला नाहीं. वाटेच्या श्रमामुळें आणि दुष्का-
ळामुळें हजारो लोक मेले, आणि दिल्लीमध्यें कांहीं वेळ प-
र्यंत घुबडें आणि लांडगे यांची वस्ती होण्याजोगें जाहलें.

१४. याबादशाहानें कारभाराचे सोईकरितां मुलकाचे
साठ साठ मैलांचे चौरस विभाग करण्याची तजवीज आ-

रंभिली होती, तसेंच मिसर देशांतील खलीफयाजकडून आ-
पणास वस्त्रें आणवून पूर्वींच्या ज्या राजांस वस्त्रें मिळालीं न-
व्हतीं त्यांचीं नावें राजावळींतून काढण्याविषयीं हुकूम केला,
आणि असे दुसरे अविचार बहुत केले. तो समय विशेषीं अ-
सा स्वच्छंदानें वागत असे कीं, देवगडास जात असतां त्या-
चा एक दांत पडला, तो त्याणें मोठ्या समारंभानें पुरून त्या-
वर कबर बांधिली.

१५. या बादषाहाच्या दरबारांत आफ्रिकेंतील एक वि-
द्वान् आरब इबन भतूता म्हणून कांहीं वर्षें पर्यंत होता, त्या-
णें या राजाची व्यवस्था पाहिली त्याप्रमाणें यथास्थित
वर्णिली आहे.

१६. महंमद तघलख मेल्यावर लष्कराच्या सरदारांनीं
इ० स० १३५१ त्याचा पुतण्या फिरोजुद्दीन यास सिंहासनावर बसविलें.
त्याणें सिंध प्रांताचा बंदोबस्त करून, व मागील राजाच्या
मुलाच्या नावानें बंड जाहलें तें मोडून बंगाल्यावर स्वारी
१३५३ केली; परंतु तो प्रांत हस्तगत जाहला नाहीं, पुढें तिकडू-
न व दक्षिणेंतून तहाचें बोलणें आल्यावरून त्याणें बंगा-
ल्याच्या बादषाहाचा व ब्राह्मणी बादषाहाचा स्वतंत्रप-
१३५६ णा कबूल केला. नंतर लौकरच बंगालच्या बादषाहाचा
मुलगा शिकंदर जो बापाच्या जागीं गादीवर बसला हो-
ता, त्यावर स्वारी केली. तथापि शेवटीं त्याची सुखत्या-
री फिरोज यास कबूल करणें प्राप्त जाहलें. पुढें कांहीं व-
र्षांनीं बंडें मोडण्याकरितां बादषाहास सिंध व गुजरा-

थ प्रांतांत आणखी एक वेळ स्वारी करणें प्राप्त जाहलें. इ० स० १३७२

१७. शेवटीं कांहीं वर्षें पर्यंत बादषाह वृद्ध आणि अश-
क्त जाहल्यामुळें त्याच्या वजीरानें प्रबळ होऊन त्याचा व-
डील मुलगा नासरुद्दीन यास मारण्याची मसलत केली.
तेवेळीं तो शाहाजादा धीटपणानें जनानखान्यांत शिर-
ला, आणि बापाच्या मनांत ममता उत्पन्न करून आपल्या
प्राणाचें रक्षण करिता जाहला. पुढें त्याणें वजीराचें पा-
रिपत्य करून एक वर्ष पर्यंत कारभार केला. नंतर तो
आणि त्याचे दोघे चुलत बंधु यांशीं वांकडें पडून तो सर
मोर एथील पाहाडांकडे पळून गेल्यावर पुढें त्याच्या त्या
प्रतिस्पर्ध्यांनीं बादषाहाचा नातू ग्यासुद्दीन यास गादी-
वर बसविण्याची बादषाहाची मर्जी आहे असें प्रकट
करून त्यास राज्याधिकार दिला. नंतर थोड्या दिवसां-
नीं फिरोज मरण पावला, त्यावेळेस त्याचें वय ९० वर्षां- १३८८
चें होतें. (अक्टोबर).

१८. या बादषाहाची कारभार करण्याची रीति शाहा-
णपणाची होती. त्याणें त्रासदायक कर व शिवाय बा-
बती होत्या त्यांतून बहुतेक सोडून दिल्या; आणि सरका-
री देण्याची शिस्त कायम ठरावून वसूल करणारे काम-
दार यांच्या हातीं जुलुम जास्ती करण्याचें कांहीं ठेविलें
नाहीं. तसेंच कोणाच्या शरीरास इजा देणें किंवा हात
पाय वगैरे तोडणें याची मनाई केली; आणि देहांतदंड-
ही फारसा नव्हावा असा कायदा ठरविला.

... Oriental ... Library ... P.O. ...

१९. त्याणें शेतांची लागवड वगैरे होण्याकरितां नद्यां-
स पंनास बांध घातले, पंनास मशीदी बांधल्या, ३० मक्त-
बा ह्मणजे शाळा चालू केल्या, तशाच १०० धर्मशाळा,
३० तळीं, १०० दवाखाने, १०० हमामखाने ह्मणजे स्ना-
नाच्या जागा, आणि १५० पूल, इतकीं कामें करून त्यां-
ची नेहमी दागदुजी राहण्याकरितां जमिनीच्या नेम-
णुकी करून दिल्या. या बादषाहानें लोकोपकारार्थ केले-
ल्या कामांपैकीं कांहीं अद्यापि आहेत, त्यांतून एक का-
लवा यमुने पासून कर्नाळ, हांशी, व हिसार, या शहरां-
वरून गागर नदीस नेला होता. त्याची बहुत दिवस अव्य-
वस्था जाहली होती, परंतु इंग्रेज सरकारानें आलीकडे
दागदुजी करून तो शेतकीच्या व व्यापाराच्या उपयोगी
पडावया जोगा केला आहे.

२०. ग्यासुद्दीन तघलख याचें आणि तो ज्याच्या आ-
श्रयानें राजा जाहला होता त्यांचें भांडण होऊन पांच महि-
इ० स० १३८९ न्याच्या आंत तो पदच्युत होऊन मारला गेला.

२१. नंतर फिरोज याचा दुसरा मुलगा अबूबिक्र या-
णें एक वर्ष पर्यंत राज्य केलें. इतक्यांत त्याचा वडील
चुलता नासुरुद्दीन याणें परत येऊन कितिएक वेळा
उभयतांचे जयपराजय जाहल्यावर अबूबिक्र यास
१३९० कैद करून नासुरुद्दीन दुसऱ्यानें गादीवर बसला. त्या-
णें चार वर्षें पर्यंत राज्य केलें. इतक्यांत गुजराथे मध्यें
यमुने पलीकडे एक दोन बंडें जाहलीं व तीं मोडलीं गेलीं.

२२. नासुरुद्दीनाचा भाऊ महमूद तघलख हा राज्य करूं ला- इ० स० १३९४
गला. तेव्हां वयानें लहान होता. त्याचा अप्रौढपणा, आणि रा-
ज्यांतील अव्यवस्था; या दोन कारणांमुळें गुजराथ प्रांतांत मु-
जफरखान हा स्वतंत्र राजाप्रमाणें वागूं लागला. तशींच मा-
ळवा, व खानदेश प्रांतांत बंडें जाहलीं, आणि जवानपूर एथे
त्याच्या वजीरानें स्वतंत्र बादशाही स्थापिली.

२३. या बादषाहाचे कारकिर्दींत तैमूरलंग ह्मणून कोणी
एक मोगल सरदार याणें रशियादेशापासून सिंधुनदी पर्यंत
देश जिंकून हिंदुस्थानावर स्वारी केली. त्याणें आपले जाती- १३९८
च्या स्वभावाप्रमाणें तुलंब, अजुदीन, भठणेर, सामान, इत्या-
दि शहरें जीं वाटेनें लागलीं तीं लुटून व जाळून तेथील लोकां-
स ठार मारिलें. याप्रमाणें संहार करीत तो दिल्लीजवळ आ-
ला. तेथे त्याणें १५ वर्षांपेक्षां प्रौढ असे सुमारें एक लक्ष लो-
क ठार मारिले. दिल्लीच्या दरबारांत दुफळी पडून महमूद
बादषाहाचे फौजेचा पराजय जाहला, आणि ती शहरांत
जाऊन राहिली. महमूद गुजराथेंत पळून गेला. त्यावेळेस
तैमूर याणें अभयवचन दिल्यावरून दिल्लीशहर तेथील
किल्लेकऱ्यांनीं स्वाधीन केलें, आणि तैमूर याणें प्रसिद्धपणें
हिंदुस्थानचा बादषाह हें पद धारण केलें. पुढें बादषाहा-
च्या मनांत विश्वासघात करण्याचें असो, किंवा फौजेम-
ध्यें बेकैद झाल्यामुळें असो, परंतु शहरामध्यें लूट आणि
बलात्कारही चालू झाली. त्यांचा प्रतिबंध करण्यास लो-
कांनीं शस्त्रें घेतलीं, त्यापासून मोठी कत्तल चालली. र-

त्यांत प्रेतांच्या राशी पडल्यामुळें जाण्यास मार्ग नाहींअसा
झाला, आणि दरवाजे फोडून सर्व मोगल फौज आंत शिर-
ली. तिणेंजो अनर्थ केला तो विस्तारें लिहिल्यावांचूनही ध्या-
नांत येईल.

२४. पांच दिवस पर्यंत शहर जळत होतें व लूट होत होती,
ती तैमूर याणें स्वस्थपणानें पाहिली. मग फौज जेव्हां म-
नुष्यांचा जीव घेतां घेतां कंटाळली, आणि लुटायास कांहींरा-
हिलें नाहीं, तेव्हां त्याणें परत जाण्यास आज्ञा केली. तो जाण्या-
च्या दिवशीं यमुनेच्या कांठीं फिरूजशा याचे काश्मिरी दग-
डाच्ये मशिदींत निमाज पढला, आणि तेथून असंख्य द्रव्य
आणि अगणित दासदासी घेऊन निघाला. तो भागीरथी
उतरून पलीकडे पाहाडांतून जात असतां हिंदुलोकांशीं
त्याला कित्येक वेळ लढायी करणें प्राप्त जाहलें. तेवेळे-
स तैमूर याचें वय ६३ वर्षांचें असतां तो त्यालढायांत फा-
र शौर्य करून आणि आपण जातीनें पराकाष्ठेचे श्रम सह-
न करून शेवटीं आलेले वाटेनें तातार देशास निघून गेला.

२५. तैमूर गेल्यावर दिल्लीमध्यें दोन महिने पर्यंत केवळ
अंधाधुंदी होऊन शेवटीं महमूद गुजराथेंतून परत आ-
इ० स० ल्यावर तो आणि कोणी एक एकबाल नामें सरदार या-
१४०५ चा कांहीं वेळ कलह जाहला. पुढें तो सरदार मेल्यावर बा-
दशाहाच्या स्वाधीन पुनः राज्य जाहलें, तें त्याणें मरे पर्यंत
१४१२ अनुभविलें.

२६. महमूदाच्या मागें दौलतखान लोदी याणें १५ महि-

ने पर्यंत राज्य केल्यावर त्यास पंजाबचा सुभेदार खिजर-
खान याणें राज्यपदावरून काढून दिलें.

प्रकरण ४.

सय्यद व लोदी वंश.

सन १४१२ पासून १५२६ पर्यंत.

१. तघलख वंशाचे समाप्तीनंतर ३६ वर्षें पर्यंत सा-
ऱ्या देशावर अधिकार चालायाजोगा राज्याचा बंदोबस्त न-
व्हता. खिजरखान याणें सात वर्षें पर्यंत तैमूर हा धनी व इ० स०
आपण त्याचा सेवक अशा प्रकारानें राज्य केलें. त्यास दि- १४१४
ल्ली घेते वेळेस कांहीं ज्याजती मुलुक मिळाला नाहीं आणि
मुळींच पंजाब देशांत बंड जाहलें, तें, त्याच्या मागून सय्य-
द मुबारक, सय्यद महंमद, आणि सय्यद अल्लाउद्दीन, ना-
मेंजे बादशाह झाले, त्या तिघांच्याही राज्यांत केवळ मोड-
लें नाहीं. शेवटीं बादशाहाचा हुकूम राजधानी शहराच्या
तटापासून पांच साहा कोशांबाहेर न चाले असें होऊन
अल्लाउद्दीन यास अधिकार सोडून बुदायून एथें जाण्या
चें प्राप्त पडलें. त्यावेळेस बहिलोल खान लोदी नामें को-
णी एक सरदार राजपद धारण करिता झाला. १४५०

२. बहिलोल लोदी याणें पंजाबेंत बखेडा जाहला हो-
ता तेथे अमल बसवून, मुलतान प्रांतांतही स्वतंत्र अधि-
कार चालू जाहला होता, त्याचा बंदोबस्त करण्याचें आ-

रंभिलें. इतक्यांत जवानपुर एथील मुसलमान राजानें दि-
ल्लीवर हल्ला केल्यामुळें त्याशीं युद्धाचा आरंभ करणें प्राप्त
इ० स० १४५२ जाहलें. तें युद्ध २६ वर्षें पर्यंत चालून शेवटीं जवानपूर
१४७८ बादषाहाच्या स्वाधीन झालें. नंतर दाहा वर्षें पर्यंत रा-
ज्य करून बहिलोल मरण पावला. त्यावेळीं पूर्वेस का-
शी, दक्षिणेस बुंदेल खंड, आणि उत्तरेस हिमालय, एथ
पर्यंत राज्याची सरहद्द होती.

३. बहिलोल खान याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा
शिकंदर हा गादीवर बसला. त्याच्या अधिकाराविषयीं
विवाद करणारे त्याचे बंधु वगैरे कितिएक होते, त्यांस त्या-
णें क्षमा करून त्यांवर पहिल्या प्रमाणें प्रीति ठेविली, आ-
णि राज्याचा बंदोबस्त न्यायानें आणि सावधपणानें रा-
खिला, तसेंच पूर्वेसही बंगाल्या पर्यंत, व दक्षिणेस बुंदे-
ल खंडां पलीकडे कांहीं प्रदेश पर्यंत, राज्य घेतलें. परंतु
या बादषाहास धर्माभिमान बहुत होता, त्यामुळें त्याणें
हिंदूंचीं बहुत देवालयें मोडून नदी तीरीं त्यालोकांस स्ना-
न संध्यादिक कर्में करण्यास प्रतिबंध केला होता. कोणा
एका प्रसंगीं एक ब्राह्मण कोणताही धर्म मनापासून
आचरिला असतां ईश्वरास मान्य होतो असें प्रसिद्ध
पणानें बोलतो, हें वर्तमान समजल्यावरून बादषाहा-
नें त्यास बोलावून आणून बारा विद्वान् काजी यांकरवीं
त्याजबरोबर वाद करविला. शेवटीं तो आपलें ह्मणणें
न सोडी असें पाहून त्यास ठार मारिलें.

४. शिकंदर हा विद्वानांचा पक्षपाती व ज्यास्त्याक कवि होता. इ० स०
तो २८ वर्षें राज्य करून आग्रा एथें मृत्यु पावला. १५१६

५. शिकंदर याचा मुलगा इब्राहिम याणें गादीवर बसतां-
च आपल्याशीं विरोध करणारे असे जे प्रांतांतील सुभेदार,
आणि इतर संभावित मनुष्य होते, त्यांस ठार मारिलें. किति
एकांस केवळ संशया मुळें कैदेंत ठेविलें, आणि आपल्या भा-
वांतून एकाचा प्राण घेतला. बाकीच्यांस प्रतिबंधांत ठेवि-
लें. अशा क्रूर कर्मामुळें इब्राहिम हा सर्वांच्या मनांतून उतर-
ला.

६. त्यावेळीं तैमूर याचा वंशज, बाबर, काबुल एथें रा-
ज्य करीत होता. त्याणें पूर्वीं एक वेळ पंजाब प्रांतावर स्वारी के-
लीच होती. त्यास दौलत खान ह्मणून लाहोरचा सुभेदार
याणें आपलें संरक्षण व्हावया करितां पुनः पंजाबेंत येण्या-
विषयीं सांगून पाठविलें. तेवेळीं बाबर याणें हिंदुस्थानांत
येऊन लाहोरच्या लोकांचा पराजय केला, आणि तें शहर
जाळून भस्म केलें. बाबर यास दौलत खानाविषयीं संश-
य उत्पन्न जाहला असतांही त्याणें त्यास व त्याच्या मुला-
स जाहागीर दिली. तथापि त्याणें हा उपकार न स्मरून बा-
बर याचा ठेवणाईत पंजाबचा सुभेदार अल्लाउद्दीन या-
स नौकरच काढून दिलें. पुढें नौकरच अल्लाउद्दीन बाब-
राच्या आज्ञेनें ४०,००० फौज घेऊन परत हिंदुस्थानांत
आला. आणि मागून बाबर याणेंहीं १२००० लोकांसहित
स्वारी केली. तेव्हां दौलत खान शरण आला. पुढें बाबर या-

वर १००,००० फ़ौज व हजार हत्ती इतक्यांसहित इब्राहिम गे-
ला असतां उभयतांची पाणिपताजवळ लढाई होऊन इब्राहि-
म याच्ये फौजेंतील पंधरा सोळा हजार लोक मरण पावले,
व इब्राहिम हाही समरांगणीं पडला. नंतर बाबर हा दिल्ली
आणि आग्रा हीं शहरें हस्तगत करून राज्याधिकारी जाह-
ला.

प्रकरण ५.

मोगल* वंश.

सन १५२६ पासून १५३० पर्यंत.

१. बाबर हा तैमूरलंग या पासून साहावा पुरुष. हा ल-
हानपणीं अनेक अडचणी भोगून व अनेक वेळ जय परा-
जय अनुभवून शेवटीं (इ० स० १५११) समरकंद, व बुखा-
रा. या प्रांतांचें स्वामित्व पावला, परंतु पुढें तीन वर्षांनी त्या-
चें तें राज्य सर्व जाऊन बल्क प्रांत मात्र राहिला. (इ० स० १५१४)

२. वर लिहिल्याप्रमाणें हिंदुस्थानाचें राजपद त्यास मि-
ळाल्यावर एक वर्षाच्या आंत धोळपूर, व ग्वाल्हेरी, वगैरे
प्रांत त्याच्या स्वाधीन जाहले. जवानपूर एथील संस्थान त्या-
चा मुलगा हुमायूं याणें घेतलें; आणि मारवाड, व जयपूर,

* मुसलमान वास्तविक ज्यांस मोगल ह्मणत त्यांचा बाबर त्यास
फार तिरस्कार असे, आणि तो तुर्की भाषा बोलत असे. परंतु त्याचे पू-
र्वज मोगल होते, आणि हिंदुस्थानचे लोक इराणाकडील सर्व मुसलमा-
नांस मोगल ह्मणतात, ह्मणोन बाबराच्या वंशास मोगल वंश असें नाव प-
डलें.

एथील रजपूत राजांचा मुख्य, मेवाडचा राजा, संग, यावर
स्वारी करून बाबर त्याचा पराजय करिता जाहला. त्यावेळे- इ० स० १५२७
स नेवातचा राजा हसनखान व दुसरे मोठे सरदार पडले.
पुढील वर्षी बाबरानें चांदेरी एथील रजपूत संस्थानी मेदि-
नीराय यावर स्वारी करून चांदेरी घेतली. ते वेळीं किल्ले- १५२८
करी आपल्या सर्व बायकांस ठार मारून मोठ्या आवेशानें
बाहेर येऊन तटावरून मुसलमान चढत होते त्यांस काढू-
न देऊन युद्ध करित होत्साते शौर्यानें मरण पावले. तसे-
च आंत दोन तीनशें लोक जे मेदिनी रायाच्या घराच्या रख-
वालीकरितां राहिले होते, तेही, मी पूर्वी मरेन, मी पूर्वी मरे-
न, असें ह्मणत ह्मणत, किति एक आपल्या हातानें, किति
एक परस्परांच्या हातानें असे मरण पावले. अशीं शौर्या-
चीं उदाहरणें रजपुतांच्या इतिहासांत बहुत आहेत.

३. नंतर बाबर याणें भागीरथीच्ये दक्षिणेकडील बाहा-
र प्रांत सर्व जिंकिला; आणि बंगाल्यावर स्वारी करून ते-
थील राजा अनुकूळ करून घेतला. पुढें किति एक महिने पर्यं-
त त्याची प्रकृति क्षीण होत चालली. आणि शेवटीं त्याचा
वजीर खलीफा, याणें आपल्या जांवयास पुढें राज्याधिका-
र देण्याच्या मतलबानें बादशाहाजवळ कोणी जाऊं येऊं न-
ये. असा बंदोबस्त केला. त्यास फार दिवस न जाहले इतक्यां-
त बाबर आग्रा एथे मरण पावला. त्यावेळेस त्याच्या वया- { १५३० डिसेंबर २६
स ५० वर्षे होतीं. त्याचें प्रेत त्याणें सांगून ठेविल्याप्रमाणें
काबुल एथे नेऊन पुरलें. तेथे त्याच्ये कबरेच्या दर्शनास

गांवचे लोक सणावाराच्या दिवसीं अद्यापि जात असतात.

४. बाबर याणें प्रथम दिल्ली प्रांत घेतला, त्यांत बहुत लोक मेले गेले खरे; आणि त्याची त्यावेळेस फौज कमी होती त्यामुळें त्यास समय विशेषीं कठोरपणा करावा लागे, परंतु त्याच्या मुळचा स्वभाव निर्दय नव्हता. त्याणें आपल्या जन्मकर्माचा वृत्तांत तुर्की भाषेंत आपण लिहिला आहे. त्या ग्रंथाची शैली सुबोध आणि सरळ असून त्यामध्यें त्याणें जेजे देश किंवा लोक किंवा पदार्थ पाहिले त्यांच्या स्थितिरीति यांचें यथा तथ्य निरूपण केलें आहे. त्यावरून पाहिलें असतां शेवट पर्यंत त्याची प्रीति मुळच्या त्याचा देश व त्याचीं कुटुंबाचीं माणसें आणि स्नेही यांजवर पहिल्या प्रमाणें होती, आणि राज्याच्या मोठ्या घडामोडींमध्येंही त्यांजकडे त्याचें लक्ष होतें, असें दिसतें.

५. त्याचें सर्व आयुष्य युद्धाचे खटपटीमध्यें गेलें, त्यामुळें त्यास कधींही विश्रांति जाहली नाहीं. ती इतकी कीं त्याणें ११ वर्षांपासून रमजानाचीं दोन उपोषणें कधीं एका ठिकाणीं केलीं नाहीं. युद्धाच्ये खटपटींतून सांपडलेल्या अवकाशामध्यें तो शिकारीचा वगैरे उद्योग करीत असे. त्याचें शरीर इतकें सुदृढ होतें कीं त्याची प्रकृति क्षीण होऊं लागल्यावर ही तो एक वेळ काल्पीहून आग्र्यास ह्मणजे सुमारें ८० कोश घाड्यावर बसून दोन दिवसांत गेला, आणि वाटेनें भागीरथी पोंहून उतरला. शरीराप्रमाणें त्याचें मनही सर्वकाळ

व्यासंगांत गुंतलें असे. पाण्याचे नळ, तळाव, वगैरे बांधणें, दूरदेशींचीं झाडें व पदार्थ उत्पन्न करणें, इत्यादिकांकडे नेहेमी त्याचें लक्ष असे. आणि इतकेंही करून त्यास फारसी व तुर्की या भाषेंत काव्यें करण्यास वेळ मिळत असे.

प्रकरण ६.

हुमायूं.

सन १५३० पासून १५५६ पर्यंत.

१. बाबर यास मुलगे चार होते. त्यांचीं नावें; हुमायूं, कामरान, हिंदाल, आणि मिर्झा अस्करी. यांतून कामरानयाकडे काबुल व कंदहार, या सुभ्यांचें काम होतें, तेच प्रांत हुमायूं याणें त्याचे स्वाधीन केले. संबळचा सुभा हिंदाल यास सांगीतला, आणि मेवात प्रांत मिर्झा अस्करी याच्या स्वाधीन करून बाकीचें राज्य हुमायूं आपण करूं लागला. इ० स० १५३०

२. जवानपूर एथे अफगाण लोकांनीं बंड केलें होतें, तें मोडून आणि शीरखान नामें करून एक सरदार चुनार गड किल्ला घेऊन बसला होता, त्यास वश करून, गुजराथचा अधिकारी बाहादुरशाहा याजवर हुमायूं स्वारी करिता झाला.

३. ही स्वारी करण्याचें कारण असें कीं हुमायूं याचा एक फितूरखोर मेहुणा बाहादुरषाह याच्या आश्रयास जाऊन राहिला होता. त्यास तो स्वाधीन करीना, आणि खानदेश, वराड, व नगर, एथील राज्यांवर आपला श्रेष्ठपणा

स्थापून पूर्वीच्या राजवंशांतील अल्लाउद्दीन लोदी, यास आप-
लें राज्य परत घेण्याकरितां द्रव्य आणि फौज याची त्याणें कु-
मक केली होती.

४. वर सांगीतलेला लोदी याचे फौजेचा पराजय आग्रा
इ० स० १५३३ एथे करून हुमायूं दक्षिणेकडेस आला. त्यावेळेस बाहा-
दुरषाह मंडलेश्वर एथे त्याशीं युद्ध करण्याकरितां छाव-
णींत सिद्ध होता, त्या छावणी सभोंवता खंदक होता. परं-
तु अन्नपाण्याचा तोटा पडल्यामुळें त्याचा उपाय चालेना
असें होऊन तो फार थोड्या लोकांसहित रात्रीस पळून गेला,
तो चंपानेराचे वाटेनें खंबायतेस येऊन दिव एथे निघून
गेला. तो पळतांच त्याचे फौजेची दाणादाण झाली, आणि
पुढें हुमायूं याणें चंपानेर किल्ला घेऊन साऱ्या गुजराथ प्रां-
तांत आपला अंमल बसविला. नंतर तेथे आपला भाऊ मि-
र्झा अस्करी यास अधिकारी करून ठेवून हुमायूं परत आ-
ग्रा शहरास गेला.

५. पुढें लौकरच त्याणें ठेविलेल्या लोकांत अव्यवस्था
होऊन बाहादुरषाह यास गुजराथ, व माळवा, हे प्रांत प-
१५३६ रत घेण्यास संधि सांपडली.

६. हुमायूं आग्र्यास फार दिवस न राहतां, बंगाल, व बाहा-
र, हे प्रांत शीरखान नामें कोणी सरदार घेऊन बसला होता,
त्याच्या पारिपत्याकरितां निघाला; तो चुनारचा किल्ला घे-
ऊन गौड शहर पर्यंत मुलुक हस्तगत करीत गेला; परंतु
पर्जन्यकाळामुळें लढाई तहकूब होऊन त्याची फौज त्या-

स सोडून देऊं लागली. त्याचा भाऊ हिंदाल, ह्या बाहार प्रांता-
च्ये उत्तरेस कामावर होता, तो तेथून निघून गेला. नंतर शी-
रखान याणें कनोज पर्यंत ठाणीं बसविलीं असें पाहून हु-
मायूं परत आग्र्यास येत असतां शत्रूच्ये फौजेनें मोनगी-
र एथे त्याचा पराजय केला. पुढें जवानपूर एथून शीरखा-
नानें एकाएकीं येऊन बक्सर एथे त्यास गांठलें. तेव्हां-
पासून सुमारें दोन महिने पर्यंत त्या दोघांचीं सैन्यें गंगेच्या
समोरासमोरच्या दोन कांठांनीं जात होतीं. शेवटीं एके
रात्रीस शीरखान याणें अकस्मात् बादषाहाचे फौजेवर ह-
ल्ला करून ती सर्व अस्ताव्यस्त केली. त्यावेळीं हुमायूं एक-
टा घोड्यावर बसून मोठ्या आयासानें नदींतून पोहत जा-
त असतां त्याचा घोडा बुडून तो मोठ्या संकटानें एका परवा-
लजीच्ये मदतीनें जीवंत निघाला. तो कितिएक थोड्या लो-
कांसहित कालपीस जाऊन तेथून आग्र्यास जाता जाहला.
त्या गडबडींत त्याची राणी शत्रूंच्या हातीं सांपडली, परं-
तु शीरखान याणें तिचा बहुमान करून तिला लौकर नि-
र्भय स्थानीं नेऊन पोंचविलें. हा अनर्थ सन १५३९ जून म-
हिन्याचे २६ वे तारिखेस जाहला. त्याच्या पूर्वींच शीरखा-
न आपल्यास बादषाह ह्मणावावयास लागला होता.

७. अशी अडचणीच्ये संधीस बादषाहाचा भाऊ हिंदा-
ल याणें एक बंड माजिवलें, व त्याचा दुसरा भाऊ कामरा-
न हाही आपला मतलब साधण्याकरितां काबुलाहून
आला. परंतु बादषाह परत आल्यावर त्या तिघां भावांचें

एक मत होऊन तो शत्रूवर पुनः जाण्याकरितां तयारीच्या उद्योगास लागला.

८. ही तयारी होण्यास आठ नऊ महिने लागले. शेवटीं कामरान याणें लाहोरास आते वेळेस ३००० लोक बादशाहाच्ये कुमकेस दिले, ते घेऊन बादशाहाची स्वारी निघाली. त्याची आणि शेरशाह याची कनोज शहराजवळ
इ० स० १५४० माहे मे ता॥ १६ गांठ पडली. तेवेळीं आपल्या फौजेंतील सरदार शत्रूकडे निघून जाऊं लागले, असें पाहून बादशाहानें नावांच्या पुलावरून उतरून युद्ध प्रसंग केला. त्यामध्यें बादशाहाचा केवळ मोड जाहला, आणि तो एकटा हत्तीवर बसून नदी उतरला, आणि पलीकडल्या कांठीं दोघे शिपाई होते, त्यांणीं पागोट्याचा एक पदर त्याजकडे टाकून दिला, तो धरून मोठ्या प्रयासानें तिकडच्या तीरास उतरला. पुढें त्याचे बंधु हिंदाल, व अस्करी, हे दोघे कांहीं थोड्या सैन्यासहित येऊन त्यास मिळाले. त्यांस व कांहीं खजिना व बायका यांस घेऊन तो दिल्लीच्या मार्गानें लाहोरास गेला, परंतु तेथे त्याचा भाऊ कामरान हा त्यास कांहीं आश्रय न देतां उलटा शत्रूशीं तह करून त्यास पंजाब प्रांत देऊन आपण काबुलास निघोन गेला.

९. याप्रकारें सर्व आशा कुंठित जाहल्यावर बादशाह याणें दीड वर्ष पर्यंत सिंध घेण्यासाठीं प्रयत्न केला. तो निष्फळ गेल्यावर तो ओदपूर एथील राजाचा आश्रय मिळविण्याकरितां तेथे गेला. परंतु त्या राजाचें लक्ष्य

आपणाविषयीं प्रतिकूळ आपून तेथून अन्नपाणी मिळण्यास परम संकट अशा वाटेनें किति एक दिवस पर्यंत मजला करून फार श्रम पावून शेवटीं तो अमरकोटास पोंचला. तेथील राजा राणा प्रसाद, याच्ये मदतीनें पंधरा हजार फौजेसहित त्याणें सिंधेवर दुसऱ्यानें हल्ला केला. परंतु तोही सिद्धीस न जातां त्यास तेथून चाळीस पंनास लोकांसहित कंदहाराच्ये वाटेनें इराणास पोंचण्यास मोठा प्रयास पडला. इ० स० १५४३

१०. हुमायूं दुसऱ्येलढाई करितां सिंध प्रांताकडे निघाल्यावर मागें दुसऱ्या दिवसीं त्याची राणी, हमीदा, ही अकबर नामें पुत्र प्रसवली. तें वर्तमान बादशाहास समजलें, तेवेळीं आपणाजवळ दुसरें कांहीं द्यावयास नाहीं, असें पाहून त्याणें एक कस्तूरीची कुपी उघडून जवळच्ये मंडळीस वांटली, आणि म्हटलें कीं या मुलाची कीर्ति या कस्तूरीच्या सुगंधाप्रमाणें प्रसृत होऊ.

११. हा मुलगा आणि त्याची आई हीं उभयतां पुढें लौकरच कंदहार एथील अधिकारी मिर्झा अस्करी याच्या हातीं सांपडलीं, त्यांला त्याणें प्रतिबंधांत ठेविलें. त्याचा बेत हुमायूं पास धरावयाचा होता, परंतु तो साधला नाहीं.

१२. हुमायूं राज्य सोडून गेल्यावर त्याचा शत्रु शेरशाह याणें सर्व राज्य लागलेंच हस्तगत केलें, आणि दुसऱ्या वर्षी माळवा प्रांत घेतला. नंतर त्याणें ८०,००० सैन्य बरोबर घेऊन १५४२
ओदपूरच्या राजा, माळवदेव यावर हल्ला केला. परंतु त्या राजावर याचा पराक्रम व फितूर यांचा उपाय चालला नाहीं. ते

थून परत आल्यावर त्याणें चितूर घेतलें, व कलिंजरास वेढा
दिला. तेथें तो मोर्चे बांधण्याच्ये तयारीत असतां एका दि-
वसीं त्याच्या दारुखान्यावर तोफेचा गोळा पडून त्याचें आं-
इ.स. १५४५ मे ता॥ २२ ग भाजलें; आणि त्याणें करून तो कांहीं वेळानें मरण पावला.

१३. हा शीरषाह शाहणा आणि पराक्रमी होता. त्याणें बंगा-
ल्यापासून सिंधुनदीपर्यंत मोठा रस्ता केला; आणि त्यावर जा-
गोजागीं धर्मशाळा व विहिरी बांधिल्या; झाडें लाविलीं; व
अन्नसत्रें घातलीं. परंतु लोभापुढें तो समय विशेषीं न्याय
अन्याय पाहत नसे. रायसिन एथील किल्लेकरी लोकांस त्या-
णें सुरक्षित जाऊं द्यावें अशा करारानें शस्त्रें ठेवून ते बाहेर नि-
घाले असतां त्याणें विश्वासघात करून निष्कारण त्यांचा प्रा-
ण घेतला.

१४. या बादशाहाची कबर सहसिरामं एथें एक तलावा-
च्या मध्यभागीं आहे.

१५. शीरषाह मेल्यानंतर त्याचा वडील मुलगा अदि-
लखान यास राज्य करण्याचें सामर्थ्य नाहीं असें पाहून स-
रदार लोकांनीं त्याचा धाकटा भाऊ अलालुद्दीन यास सिलि-
मषाह असा किताब देऊन राज्यावर बसविलें. त्याच्या व-
डील भावास परत आणण्याविषयीं एक दोन बंडें जाहलीं,
तीं मोडण्याचें व त्या बंडांत सामील होते त्या लोकांचें पारि-
पत्य करण्याचें त्यास प्राप्त जाहलें. हा राजा नऊ वर्षें राज्य
करून मरण पावला. याणें दिल्लीचा राजमाहाल वगैरे इमा-
रती बांधल्या. या बादशाहाचे वेळेस कोणी एक शेख अ-

ल्लाई ह्मणून नवीन मतप्रवर्त्तक जाहला. सर्व दुराचारी लोकां-
स ठार मारण्यास आपणास अधिकार आहे असें त्याचे शि-
ष्य प्रसिद्धपणें बोलूं लागले, त्याकाळीं आपल्या दरबारां-
तील मुल्लयांच्या आग्रहामुळें त्या शेखास मरे पर्यंत कोर-
ड्यांचा मार देण्यास बादशाहानें आज्ञा केली. त्यांत तिस-
ऱ्या कोरड्यास त्याचा प्राण गेला.

१६. सिलिमषाह मेला तेवेळीं त्याचा मुलगा बारा वर्षां-
चा होता, त्यास सिलिम याचा भाऊ महंमद षाह सूर आदि-
ली याणें मारून आपण तीन वर्षें राज्य केलें. त्यामध्यें अ-
तिशय उधळेपणा करून खज़िना रिकामा केला, आणि
मोठमोठ्या सरदारांच्या जाहागिरी परत घेऊन आपल्ये
प्रीतींतील अयोग्य जनास देण्यास आरंभ केला. त्यामुळें
सर्वत्र बंडें होऊन दिल्ली व आग्रा प्रांत हे प्रथम त्याच्या घ-
राण्यांतील इब्राहिम याणें हस्तगत करून घेतले. नंतर त्या-
पासून त्याचा चुलत बंधु शिकंदर याणें ते घेतल्यामुळें म-
हंमद षाह पूर्वेकडील प्रांतांत जाऊन राहिला होता, त्याव-
र इब्राहिम याणें स्वारी केली. तेथें बादषाहाचा वजीर हे-
मू याणें त्याचा पराजय केला. इतक्यामध्यें बंगाल्यांत व
माळव्यांत बंडें जाहलीं, त्यांचा बंदोबस्त जाहला नाहीं,
तों हुमायूं याणें परत येऊन दिल्ली व आग्रा हीं हस्तगत
करून घेतलीं. त्याजवर हेमू स्वारी करीत असतां हुमा-
यूं बादषाह मृत्यु पावला, आणि अकबर गादीवर बस-
ला. त्यासंधीस हेमू याणें आग्रा व दिल्ली हीं परत घेऊन

अकबराच्या लष्करावर स्वारी केली. त्याची आणि अकबराचा
वजीर बहिरामखान या उभयतांची पाणिपत एथे लढाई
होऊन हेमू याचा पराजय जाहला, आणि तो कैदेंत सांप-
इ० स० १५५६ नोवेंबर ५ डला. पुढें लौकरच महंमद आदिली हा बंगाल्यांतील ए-
का बंडखोराशीं युद्ध करीत असतां लढाईंत पडून मृत्यु
पावला.

१७. हुमायूं इराणांत पळून गेला ह्मणून वर सांगितलें;
तेथे तो दोन तीन वर्षें पर्यंत राहिला. तेथील बादशाह तम-
स्प, याणें चौदा हजार स्वार त्याच्या स्वाधीन केले, त्यांस-
हित कंदहारावर स्वारी करून तें शहर त्याणें आपला
भाऊ मिर्झा अस्करी याजपासून घेतलें, आणि तें कबू-
ल केल्याप्रमाणें इराणच्या बादषाहाच्या मुलगा मुराद
मिर्झा यास कांहीं वेळ पर्यंत दिल्यासारिखें केलें. शेव-
टीं तो मेल्यावर हुमायूं याणें इराणी लोकांतून बहुतांस
मारिलें. व बाकीच्यांस परत त्यांच्या देशीं जाऊं दिलें. नंत-
र त्याचा भाऊ कामरान याच्या स्वाधीन काबुल प्रांत व त्या-
चीं मुलें माणसें होतीं, त्यांशीं सुमारें साहा वर्षें पर्यंत युद्ध
करून कितिएक वेळ काबुल प्रांत हस्तगत करून व
कितिएक वेळ तो गमावून शेवटीं त्याणें कामरान यास
धरून त्याचे डोळे काढिले. नंतर तो कामरान मक्केचे
यात्रेस गेला, तेथे तो लौकरच मरण पावला. इकडे हु-
मायूं पंधरा हजार स्वारांसहित जाऊन पंजाब, दिल्ली,
व आग्रा हे प्रांत हस्तगत करून पुढें उद्योग चालवीत

आहे, इतक्यांत जिन्यावरून पडून मरण पावला. तो राज्यांतून
१६ वर्षें पर्यंत परागंदा होता. त्यासुद्धां त्याणें २६ वर्षें राज्य केलें.

प्रकरण ७.

अकबर याचे वेळेस हिंदुस्थानांत स्वतंत्र राज्यें होतीं, त्यां विषयींचें वर्त्तमान.

१. महंमद तघलख याचे वेळेस हसन गंगू याणें दक्षिणेंत
ब्राह्मणी राज्य स्थापिलें, तें तेरा पिढ्या पावेतों ह्मणजे १७१
वर्षें पावतों त्याच्या वंशांत चाललें. पुढें त्या राज्यांतील सरदा-
र युसुफ आदिल याणें विजापूर एथे अदिल शाही नामें राज्य इ० स० १४८९
स्थापिलें. तसाच अहंमदनगर एथे अहंमद निजामषाह या-
णें निजामशाहीचा पाया घातला; कुतुबषाह याणें गोवळ
कोंडे एथे कुतुबषाही राज्य स्थापिलें; आणि अमीर बरीद हा
बेदर एथे राजा असें पद धारण करून बरीदषाहीचा मूळपु-
रुष जाहला. यांतून विजापुरच्या मुसलमान राजांनीं ताळि-
कोटाजवळ कृष्णेच्या कांठीं मोठ्या लढाईमध्यें विजयनगर-
च्या रामराजाचे फौजेचा पराजय करून त्याला धरून ठार
मारिलें; परंतु तुंगभद्रेचे दक्षिणेचा बहुतकरून सर्व मुलु-
क त्याच्या राज्याखालीं होता, तो मुसलमानांचे परस्पर स्प-
र्धेमुळें विजापुरकरांस प्राप्त जाहला नाहीं. तेथे लहान ल-
हान जमीदार व पाळेगार लोक सत्ता करूं लागले. गोवळ

कोंड्याच्या बादषाहानें वरंगूळ हस्तगत करून घेऊन तैलंगण व पेनार नदी पर्यंत कर्नाटक इतका मुलुक जिंकिला.

२. गुजराथेंतील बादषाही ही अहंमद तघलख याचे वेळेसच स्थापिली गेली. या राज्यांतील मुलुक लहान असून त्याच्या सभोंवार डोंगर आणि रानें होतीं, आणि त्यांत लुटारू लोकांची वस्ती होती. गुजराथच्या राजांत जे मोठे पराक्रमी जाहले, त्यांणीं मेवाडच्या रजपुत संस्थान्यांचा कितिएक वेळ पराजय करून त्यांची राजधानी चितूर हें घेतलें; खानदेश, अहंमदनगर, व वराड, एथील राज्यांवर खंडणी बसविली; एक दोन वेळ सिंधुनदीच्ये पलीकडेस आपली फौज नेली; पोर्टुगीज लोकांशीं समुद्रामध्यें युद्धें केलीं; आणि माळव्याच्या राजांचा एकदोन वेळ पराजय करून शेवटीं तें राज्य घेतलें.

३. याशिवाय खानदेश, बंगाल, जवानपुर, सिंध, व मुलतान प्रांतांत मुसलमानांचीं स्वतंत्र वेगळीं वेगळीं राज्यें होतीं.

४. तसेंच त्यावेळेस राजस्थानामध्यें रजपुत संस्थानी राज्य करीत होते. त्यांचीं नावें. १. उदेपुरचा राणा; याच्या वंशाचा मूळ पुरुष राम. या वंशांतील कोणी अयोध्येहून येऊन गुजराथेंत राहिला, अशी दंतकथा आहे. पुढें गुजराथेंतून निघून ईदर एथे प्रथम कांहीं काळपर्यंत राज्य करून, पुढें या वंशांतील राजे चितूरास आपली राजधानी स्थापून, सन १३०० पासून विशेष प्रख्यात होऊं लागले. या वंशांतील राजांनीं अल्लाउद्दीन, व बाबर, यांच्ये वेळेस पराक्रम केले.

तेव्हां जरी त्यांचा पराजय जाहला, आणि ते दिल्लीच्या बादषाहास कर देऊं लागले, तथापि अकबर राज्य करूं लागला तेवेळीं ते स्वतंत्रपणानें वागत होते. या वंशास पूर्वीं घेलोटी असें ह्मणत असत; पुढें सेसोदी असें ह्मणूं लागले. २. दुसरा रजपुत वंश राहटोरी या नावेंकरून जोदपुर एथे राज्य करीत होता. यांतील पुरुष पूर्वीं कनोज एथे राज्य करीत असतां इ॰स॰ ११९४ च्या वर्षीं शाहाबुद्दीन याणें तें राज्य जिंकून घेतलें. तेवेळीं राजकुळांतील कोणी एक मनुष्य मारवाडांत येऊन तेथील जुने राहणार जाट लोक यांस वश करून घेऊन तेथे राज्य करूं लागला. जोदपुरचा राजा माळवदेव याणें पूर्वीं शीरषाह याजबरोबर युद्ध केलें ह्मणून लिहिलें, तो माळवदेव, अकबर सिंहासनारूढ जाहला तेवेळीं जीवंत होता. ३. याच राहटोर वंशांतील कोणी एका पुरुषानें इ॰स॰ १४५९ मध्यें बिकानीर एथे स्वतंत्र राज्य स्थापिलें. ४. भाटी या नावाचा तिसरा रजपुत वंश जसलमीर एथे राज्य करीत होता. या वंशाची उत्पत्ति कृष्णापासून असें राजावळींत आहे; परंतु इ॰स॰ ७३१ च्या सुमारें हे राजे सिंधुनदीच्या जवळ तानोत एथे राज्य करूं लागले, तेव्हांपासून मात्र त्यांची सर्व वंशावळी सविस्तर लिहिली आहे. त्यांणीं इ॰स॰ ११५६ त आपली राजधानी जसलमीर एथे नेली. त्यांचा आणि मुसलमानांचा युद्धप्रसंग अकबराच्ये कारकिर्दीच्या पूर्वीं कधीं विशेष जाहला नाहीं. ५. जयपूर एथील कच्छ वंशाचे राजे पूर्वीं अजमीरा खालचे मांड-

लिक असे वागत होते. त्यांच्या वंशांतील राजाच्ये मुलीशीं अकबरानें लग्न करी पर्यंत तो वंश प्रख्यात नव्हता.

६. हारावती एथील हार वंशाचे राजेही पूर्वी अजमीराखालचे मांडलिक. त्यांणीं सन १३४२ मध्यें बुंदी हें शहर आपली राजधानी केली. हे राजे उदेपुरच्या दरबारास कांहीं कर वगैरे देत असत. त्यांस हुमायूंच्ये कार किर्दीत रनन बोर हा किल्ला मिळाल्यापासून ते योग्यतेस पावले. ७. शिवाय, पार्कर एथील चव्हाण, व अमरकोटचे सोदराजे, हे मारवाडच्या वैराण प्रांतापलीकडे असल्यामुळें त्यास कोणी मुसलमान उपद्रव करीत नसत; परंतु शिरोही, झालोर, वगैरे संस्थानें अजमीर व गुजराथ यांच्या मध्येंहोतीं, याकारणामुळें त्यावर ते वारंवार हल्ले करून खंडणी घेत असत. ८. तसेंच पूर्वेकडील मेवात, ग्वालेर, नारवाड, चंदेरी, इत्यादि आगच्या राजांस बाबर व शीरषाह यांचे वेळेपासून दिल्लीच्या दरबाराकडेस खंडणी द्यावी लागत असे, परंतु काश्मीरापासून बंगाल सरहद्दीपावेतों हिमालयांतील संस्थानें पूर्वी पासून स्वतंत्र होतीं.

प्रकरण ८.

अकबर बादषाह.

सन १५५६ पासून १५९२ पर्यंत.

१. अकबराचा बाप मेला त्यावेळीं तो तेरा वर्षे चार महिन्यांचा होता. असें असतां, पूर्वी सांगितल्या प्रमाणें सुलतान आदिली याचा सरदार हेमू यास जिंकून कैदी करून जेव्हां त्याच्या पुढें आणिलें, आणि त्याचा वजीर बहिराम खान याणें हा धर्मबाह्य आपला शत्रु यास स्वहस्तानें मारून गाजी असा किताब मिळवावया करितां त्यास आग्रह केला, तेव्हां युद्धांत जखमी जाहलेल्या शत्रूवर मी प्रहार करणार नाहीं, असें अकबर धैर्यानें ह्मणाला. तेवेळीं बहिरामानें संतापून स्वतः हेमूचा शिरछेद केला.

२. पूर्वीच्या राजवंशांतील शिकंदर सूर हा कांहीं दिवस पर्यंत मानकोट एथे ठाणें घालून होता. पुढें उपाय चालेना असें जाहल्या मुळें बादषाहास शरण जाऊन बंगाल्यांत निघून गेला, आणि दिल्लीच्या सभोंवताला प्रांत व पंजाब हे दोनही बादषाहाच्या स्वाधीन जाहले. परंतु राज्याचा सर्व अधिकार बहिरामखान हा चालवीत असे, व तो त्याचा वारंवार अपमान करीत असे. त्याणें बाबराचा सोबती व हुमायूं यास मोठा उपयोगी पडलेला असा तारती बेग, दिल्लीचा माजी सुभेदार, याणें तेथील ठाणें शत्रूंच्या हातीं लागूं दिलें, असें त्यावर निमित्त ठेवून, बादषाहास न कळ-

वितां त्यास मारिलें. दुसऱ्या एका मानकऱ्यास कांहीं लहान-
श्या अपराधावरून तीच शिक्षा केली. बादशाहाचा गुरु पी-
र महंमद यास ती शिक्षा माफ करून त्याणें मक्केच्ये यात्रेच्या
निमित्तानें बाहेर काढून दिलें. आणखीही बहुत प्रकारें अ-
कबरास्सा अपमान केला, आणि तो त्याचा हुकूम कांहीं चा-
लूं देईना. या कारणास्तव अकबरानें शिकारीस गेल्याचें
निमित्त करून अकस्मात् परत येऊन जाहीरनामा लाविला
कीं, आजपासून माझा मी राज्य करणार, प्रजांनीं माझ्या-
वांचून कोणाची आज्ञा मानूं नये.

३. तेव्हां बहिरामाचे डोळे उघडून बादशाह याची कृ-
पा आपणास पुनः प्राप्त होत नाहीं असा त्याचा निश्चय जा-
हल्यावर तो मक्केचे यात्रेच्या मिषानें गुजराथे कडेस गेला,
आणि नागोराहून बावटे, नगारे, वगैरे सर्व राजचिन्हें बा-
दषाहाकडे पाठवून एकदा पुढें चालिला; परंतु पुनः त्याची
बुद्धि फिरली, आणि त्याणें मोठें सैन्य जमवून पंजाबेवर
हल्ला केला. त्यापासून कांहीं निष्पन्न न होतां अकबरानें पा-
ठविलेले एके टोळीनें त्याचा पराजय करून त्यास धरून हु-
जूर आणिलें. तेवेळीं त्याणें पूर्वीं आपल्या बापावर केलेले
उपकार न विसरतां, अकबरानें तो येऊन पायां पडला त्या-
काळीं त्यास आपल्या हातानें वर उठवून पोषाक देऊन को-
णत्या एका सुभ्याचें काम करावें, किंवा दरबारांत मोठ्या
अधिकारावर रहावें, किंवा मक्केस जावें, या तिहींतून जें
उचित वाटेल तें करण्यास परवानगी दिली. त्या प्रमाणें

तो निघून गुजराथेकडे जात असतां त्याणें पूर्वीं लढाईंत मा-
रलेल्या कोणी एका अफगाणाच्या मुलानें येऊन त्याचा इ० स० १५६०
प्राण घेतला.

४. वर लिहिलेल्या चार वर्षांच्या आंत, अजमीर, व ग्वा-
लेर, हीं राज्यें युद्धावांचून अकबराच्या स्वाधीन जाहलीं,
आणि त्याणें लखनौ एथून व भागीरथीच्या कांठावरील
प्रांतांतून अफगाण लोकांस काढून देऊन जवानपुरापर्यं-
त घालविलें.

५. पुढें खानजमान ह्मणून कोणी सरदारानें बंड केलें,
आणि माळवा प्रांतांत पूर्वींचा अफगाण अधिकारी बाजबा-
हादुर, याच्या बंदोबस्ता करितां पाठविलेला अबदुल्लाखा-
न, हा निघून जाऊन गुजराथच्या बादषाहापाशीं राहिला,
व त्याच्या पक्षास मिळालेले, आणखी किति एक सरदार
हुकूम न मानीत असे जाहले. त्यांणीं अयोध्या व प्रयाग
हे प्रांत घेतले; त्यांचें पारिपत्य करण्याच्या उद्योगांत सु-
मारें दोन वर्षें मोडलीं. शेवटीं अकबरानें पावसामध्यें
त्यांजवर स्वारी करून त्यांस भागीरथीच्ये पलीकडे हांकून
लाविलें. तेथे ते निर्भय असतां एका दिवशीं मोठी मज-
ल करून दोन हजार माणसें व घोडे हत्ती यांसुद्धा गंगे-
च्या पूरांतून पोंहून जाऊन बंडवाले यांचा पराजय करू-
न त्यांची वाताहत केली. त्या लढाईंत खानजमान पड-
ला, तेव्हां पासून तें बंड मोडून गेलें.

६. अकबराचा भाऊ शाहाजादा हाकिम पाजवळ

[illegible] Oriental MSS. Library
[illegible] P.O. [illegible]

काबुल प्रांताचा अधिकार बाप मेल्यापासून होता. त्याणें
इ० स० १५६६ येऊन पंजाब मुलुक घेतला, परंतु त्यास लोकरच बादषाहा-
नें हांकून दिलें. त्याच वर्षी संबल, एथें सुलतान मिर्झाना-
में एका सरदाराचे चार मुलगे हुकुम न मानीत असे जाह-
ले; त्यांचें पारिपत्य लोकरच बादषाहानें केलें; परंतु ते
पळून जाऊन गुजराथेंतील बादषाहाच्या आश्रयास राहिले.

७. जयपुरचा राजा बाहार मल्ल याच्ये मुलीशीं अक-
बरानें लग्न केलें. आणि तो व त्याचा मुलगा भगवानदास
यांस लष्करामध्यें मोठे अधिकार दिले. या राणी शिवाय
त्याची रजपूत राजाच्या वंशांतील राणी होती, आणि
त्याच्या वडील मुलाचें जयपुरचे एके राजकन्येशीं ल-
ग्न जाहलें होतें. याप्रमाणें ते वेळेस बादषाहाच्या कु-
ळांत मुलगी देण्यापासून स्वार्थ पाहून रजपुत राजे त्यां-
त प्रतिष्ठा मानूं लागले.

८. राणासंग याचा मुलगा चितूरचा राजा उदयशिं-
ग यावर अकबरानें स्वारी केली, तेवेळीं तो निघून गुज-
राथेंत गेला. त्याचा जयमल्ल नामें कोणी सरदार चितू-
र किल्यावर बळकट फौजेसहित होता, त्यामुळें अक-
बरास बाहेर खंदक वगैरे खणून सुरंग पाडून एका ए-
कीं किल्ला घेण्याचा उपाय करणें प्राप्त झालें. सुरंग उडाले,
तेणेंकरून बादषाहाचेच लोक किति एक मेले, त्यामुळें तो
प्रयत्न सिद्धीस गेला नाहीं. पुढें रात्रीस जयमल्ल आपल्या
मोरच्यां जवळ मशालीच्या उजेडानें कांहीं हुकुम देत अ-

हे असें पाहून अकबरानें आपल्या हातानें त्यावर गोळी मारिली
ती बिनचुक त्यास लागून तो मेला. त्यावेळीं किल्लेकरी हतवीर्य
होऊन त्या जयमल्लाचें प्रेत व किल्ल्यांतील सर्व बायका यांस ए-
कदांच जाळून आपण बाहेर आले. त्यांतून ८००० हुशार लोक
मुसलमानांच्या हातानें मरण पावून किल्ला त्यांच्या स्वाधीन जाह-
ला. परंतु तेथील राजा याणें शरण न येतां किति एक वर्षे अरण्यां- इ० स० १५६८
त काढिलीं. पुढें त्याचा मुलगा राणा प्रताप याणें युक्तीनें प्रयत्न क-
रून अकबर मरावयाच्या पूर्वी आपलें बहुत करून सर्व राज्य परत
घेतलें, आणि उदेपूर ही नवी राजधानी वसविली. या उदेपूर घ-
राण्यांतील राजांनीं मुसलमानांशीं कधीं शरीरसंबंध केला ना-
हीं, यास्तव ते आपणास इतर सर्व रजपुतां पेक्षां श्रेष्ठ मानितात.

९. अकबरानें दुसऱ्या वर्षी रतनबोर, व कलंजर हीं घेतलीं.
पुढें एका प्रसंगीं तो जोदपुर सरहद्दीवर पोंचला असतां तेथी-
ल राजानें आपण भेटीस न येतां आपल्या दुसऱ्या मुलग्यास पा-
ठविलें. म्हणून अकबराचा त्यावर प्रथम क्रोध जाहला. परंतु
पुढें राजा मेल्यावर त्याचा मुलगा शरण गेला तेव्हां अकबरानें
त्याचा बहुमान करून त्यावर कृपा केली.

१०. गुजराथेंतील राज्यांत किति एक वर्षे पर्यंत फार बखेडा
जाहला. शेवटीं तेथील कारभारी ऐतिमाद खान याणें त्या रा-
ज्याचा कारभार करावयास लागून कलह मोडण्या विषयीं अ-
कबरास लिहून पाठविलें. त्याप्रमाणें बादषाहाची स्वारी पट्ट-
णास गेली असतां गुजराथचा बादषाह तिसरा मुजफर याणें
आपलें तक्त त्याच्या स्वाधीन केलें. नंतर त्या प्रांतांतील सरदा- १५७२

रांस जिंकून बादषाह परत आग्र्यास गेला. पुनः एकवेळ मि-
र्झा हुसेन नामें कोणी एका सरदारानें गुजराथेंत बंड केल्याचें
वर्त्तमान ऐकून बादषाह त्यावेळेस पर्जन्यकाळ असतां मोठ
मोठ्या मजला करून नऊ दिवसांत तेथें जाऊन पोंचला. आ-
णि त्या बंडाचा बंदोबस्त करून व त्या बंडवाल्यांस मारून पर-
त राजधानीस आला. या दोनही प्रसंगीं अकबरास युद्धाम-
ध्यें थोड्या लोकांसहित मोठ्या फौजेवर जाण्याचा प्रसंग
पडला, आणि एकवेळ त्याचा प्राण कसा वांचेल याविषयीं
ही भ्रांति उत्पन्न जाहली; परंतु त्याचें शौर्य आणि जयपुर-
चा राजा भगवान शिंग वगैरे त्याचे रजपुत सरदार यांचे प्र-
यत्न यांहींकरून त्याच्या जिवास धक्का नलागतां जय प्राप्त
जाहला.

११. बंगल्यामध्यें दाउद खान ह्मणून कोणी एक बादषा-
इ० स० १५७५ ह राज्य करीत होता, त्यावर अकबरानें स्वारी करून बाहार
पर्यंत मुलुक घेतला. तेथून तो आपण परत गेला. पुढें तोडर
मल्ल वगैरे त्याचे सरदार आणि दाउद यांशीं किति एक वेळ
युद्धप्रसंग होऊन शेवटीं तह ठरला. पुनः कलह होऊन पु-
ढील वर्षीं दाउद याचा पराजय होऊन तो मृत्यु पावला, आणि
१५७५ बंगाल व बाहार हे प्रांत हस्तगत जाहले. पुढें बादषाहाची
फौज त्या प्रांतांत होती तिजमध्यें फितुर होउन आणखी
एकवेळ ते प्रांत गेले, आणि बंडवाल्यांचे तीस हजार लोक
जमा जाहले, परंतु अकबरानें प्रथम तोडरमल्ल व त्याच्या
मागून आणखीं किति एक सरदार त्यांवर पाठवून किति ए-

कांस लांच देऊन व किति एकांस जाहगिरी देऊन तें बंड मो-
डिलें. त्या प्रांतांत कुतूनामें कोणी अफगाण सरदारानें फि-
रून बंड केलें. (इ. स. १५९०) आणि तें कांहीं वर्षें पर्यंत चा-
ललें. शेवटीं अकबराचा सरदार मान शिंग याणें जाहागि-
री वगैरे देऊन त्याचा बंदोबस्त केला. तरी फिरून इ० सनं
१५९२ त एक व पुनः १६०० या वर्षीं एक, अशीं दोन बंडें जा-
हलीं, त्यांचा बंदोबस्त जाहल्यावर पुनः तिकडे कोणी बंड-
वाल्यानें सत्ता केली नाहीं.

१२. वर लिहिल्या प्रमाणें बंगालचा बंदोबस्त सरदार
लोक करीत असतां, अकबराचा भाऊ काबुल एथील अधि-
कारी मिर्झा हकीम याणें पंजाबेवर हल्ला करून तेथील सु-
भेदार मान शिंग यास पळविलें. त्यावर अकबरानें स्वारी इ० स०
करून त्याचा पराजय केला, आणि सिंधुनदीच्ये पलीकडे १५८१
जाऊन काबुलही घेतलें. पुढें कांहीं वेळानें मिर्झा हकीम
हा शरण आल्यावर त्यास तो सुभा परत देऊन पंजाब ए-
थील कामावर जयपुरचा राजा भगवानदास यास ठेवून
आपण परत आग्र्यास येता जाहला. या स्वारींत त्याणें
सिंधुनदीच्या कांठावर किल्ला बांधला, तो अटक या ना-
वानें अद्यापि प्रसिद्ध आहे.

१३. वर लिहिलेला गुजराथचा मुजफरषाह कांहीं
दिवस पर्यंत प्रतिबंधांत राहिल्यावर बादषाहानें दिले-
ल्ये जाहागिरीचा उपभोग करून (१५७३ पासून १५८१
पर्यंत) होता; नंतर गुजराथेंतील बंडवाल्यांच्या बोल-

ण्यावर तो तिकडे निघून गेला, आणि बखेडा करूं लाग-
ला. त्याच्या बंदोबस्ताकरितां बहिरामखान याचा मुल-
गा मिर्झा खान हा त्या प्रांतीं गेला. त्याणें एक वेळ त्यास हां-
कून देऊन गुजराथ हस्तगत केली. परंतु मुजफर याणें कि-
ति एक वर्षे दक्षिणेंतील राजाचा आश्रय करून (इ॰ सन
१५८९ मध्यें) एक मोठी लढाई केली. पुढें चार वर्षांनीं तो
धरला गेला, आणि आग्र्यास जात असतां आपला गळा
वस्त्र्यानें कापून घेऊन प्राण देता जाहला.

१४. काश्मीर प्रांतांत पूर्वींपासून बहुत करून हिंदु व
मध्यें कांहीं मुसलमान, राज्य करीत असत. तेथे कोणी ए-
क आगंतुक मुसलमान सरदार राज्य करीत असतां मि-
र्झा हकीम मेल्यामुळें काबुल घेण्यास अकबराची स्वारी
इ॰स॰ १५८५ अटक एथे गेली. तेथून आपला मेहुणा जयपुरकर भ-
गवानदास व मिर्झा सुलेमान याचा मुलगा शाहरोख मिर्झा
या दोन सरदारांस मोठ्या सरंजामासहित त्याणें काश्मीर प्रां-
त घेण्यास पाठविलें. ते पहिल्या वर्षी हिंव व अन्न पाण्या-
चा तोटा, या कारणांमुळें तेथील राजाकडून अकबराचें स्वा-
मित्व मात्र कबूल करवून तह ठरवून परत आले. परंतु दु-
सऱ्या वर्षी त्याणें फौज पाठविली त्यावेळीं तेथील फौज
परस्पर कलहामुळें कांहीं इकडे मिळाली व कांहीं निघू-
न गेली. नंतर लोकरच राजा शरण आला; त्याचें नाव
बादशाहानें दिल्लीच्या मानकऱ्यांच्या यादींत घालून त्या-
स बाहार प्रांतांत जाहागिरी दिली.

१५. काबुल प्रांताच्या लगत ईशानीकडेस अफगाण लोक र-
हत असत. त्यांमध्यें बायजीद नामें कोणी पैगंबर म्हणविणा-
रा होऊन त्याणें एक नवें मत प्रवृत्त केलें, आणि आपले शि-
ष्य रोषनये (म्हणजे ज्ञानें करून प्रकाशित जाहलेले) यांस स-
र्व पृथ्वीचें राज्य प्राप्त होईल म्हणून वर देऊन पाहिजे त्यांचें
राज्य घ्यावें असी परवानगी दिली होती. या लोकांचा जलाल
नामें कोणी एक सरदार काबुलच्या सरहद्दीवर उपद्रव करूं ला-
गल्यामुळें, बादशाहानें आपला दुध भाऊ जैनखान, व राजा
बिर्बल, यांस सैन्य देऊन तिकडे पाठविलें. त्यांचा त्या पाहाडी इ॰स॰ १५८६
मुलुकांत प्रथम कांहीं उपाय चालेना, आणि पुढें बादशाहा क-
डून आणखी कुमक आल्यावर लष्कर पुढें जात असतां एका घां-
टामध्यें कोणा एका प्रसंगीं अफगाण लोकांची गांठ पडून तु-
मुल युद्ध जाहलें. त्यांत बादशाहाच्या फौजेस पळ सुटला ते वे-
ळीं बिर्बल हा मारला गेला, आणि जैनखान याचे छावणीवर
रात्रीं छापा घेऊन त्याचे ही बहुत करून लोक धरिले, व मारिले
गेले, आणि तो मात्र एकटा काळोखांतून पायीं निघून अटके-
स आला. त्याची भेट बादशाहानें घेतली नाहीं, व बिर्बल या-
च्या मरणाचें वर्त्तमान ऐकून तो फार खेद पावला. पुढें राजा
मानशिंग व तोडरमल्ल यांस जलाल याच्या बंदोबस्ता करितां
पाठविलें, त्यांचे व जलाल याचे वर्षदोन वर्ष पर्यंत युद्ध प्रसं-
ग होऊन शेवटीं जलाल याचा केवळ पराजय जाहला. परंतु
पुढें बहुत वर्षें पर्यंत तो बखेडा करीतच होता. शेवटीं सन
१६०० मध्यें त्याणें एकवेळ गजनी घेतल्यावर त्याचा पराज-

य होऊन तो पळत असतां वाटेमध्यें तो सांपडून ठार मारिला
गेला. परंतु त्या युसुफजई अफगाण लोकांचा पुरता बंदोबस्त
न होतां ते स्वतंत्र राहिले ते अद्यापि तसेच आहेत.

१६. सिंध प्रांतांत कोणी मुसलमान वंशाचा राजा राज्य क-
इ० स० रीत होता. त्यावर अकबरानें दोन वेळ फौज पाठवून शेवटीं
१५९२ त्यापासून तो प्रांत जिंकून घेतला; व आपल्या संप्रदायाप्रमा-
णें त्या राजास मानकरी मंडळींत ठेवून घेतलें. पोर्तुगीज लोकां-
चे शिपाई आणि फिरंग्यांसारखे पोषाक केलेले २०० काळे
शिपाई व कांहीं आरबलोक या राजाच्या चाकरींत होते असें
अकबर नाम्यांत लिहिलें आहे, हा कवाईत वाले शिपाई यां-
विषयीं बखरेंत पहिला लेख पाहण्यांत येतो.

१७. या राज्याच्या आरंभीं कंदहार इराणी लोकांनीं घेत-
लें होतें, तेथें त्यांमध्यें आंतल्या आंत कलह होऊन तें शहर व
तो प्रांत हीं दोनही आपोआप अकबराच्या स्वाधीन जाहलीं.

प्रकरण ९.

अकबर बादशाह.

सन १५९२ पासून १६०५ पर्यंत.

१. वर लिहिल्याप्रमाणें नर्मदेचे उत्तरेकडील बहुत करू-
न सर्व प्रांतांत सत्ता चालूं लागल्यावर अकबरानें दक्षिणेक-
डील राज्याचे व्यवस्थेकडे मन घातलें. अहंमदनगरच्या चौ-
था राजा बुर्हानजा निजामशाह हा मेल्यावर त्याचा भाऊ बु-

र्‍हाण हा कांहीं दिवस अकबराच्या आश्रयानें राहून शेवटीं
इ. स. १५९२ यांत तेथील गादीवर बसला; परंतु तो पुढें
तीन वर्षांनीं मेला. नंतर अहंमदनगर एथील दरबारांत
चार फळ्या पडल्या, आणि त्यांतून अधिक प्रबळ पक्षाक-
डून बोलावणें आल्यावरून अकबराचा मुलगा मुराद हा
गुजराथेंतून सैन्य घेऊन तिकडे गेला. इतक्यांत तेथे उल-
ट पालट होऊन बाहादुर निजामशाह म्हणून मुलगा गादी-
वर बसला, आणि राज्याचा कारभार त्याची आत चांदबि-
बी करूं लागली. तिणें विजापुरकर राजाशीं स्नेह करू-
न तिकडील कोणी नेहंग नामें हपशी सरदाराची कुमक
घेऊन शाहाजाद्याच्या लष्कराचा प्रयत्न निष्फळ होई अ-
सी खटपट आरंभिली. इकडे मुराद यानें शहरास वेढा
देऊन खालून दोन सुरंग पाडिले. इतक्यांत आंतून लोक
सुरंग पाडिताहेत, व चांद बिबी आपण काम करवीत आ-
हे, असें त्यांच्या दृष्टीस पडलें. नंतर आंतील लोकांकड-
चा पुरा बंदोबस्त होण्याच्या पूर्वी एक सुरंग पेटून आं-
तील सुरंग उडाले. ते वेळीं किल्लेकरी लोक पळण्याचा प्र-
संग पाहून चांद बिबी आंगांत चिलखत घालून तोंडाव-
र बुरखा व हातांत नागवी तरवार घेऊन तट फुटला हो-
ता तेथे आली. त्यामुळें पुनः लोकांची जमाजम होऊन
आंतून बाण, तोफांचे गोळे, व दगड इत्यादिजें काय सां-
पडलें त्याची बाहेरच्या लोकांवर वृष्टी करून संध्याकाळ
पावेतों किल्लेकऱ्यांनीं शत्रूंचें कांहीं चालूं दिलें नाहीं; आ-

णि रात्रीं तट नीट करण्याचें काम इतकें आकारास आणिलें कीं दुसऱ्या दिवशीं किल्ल्यांत प्रवेश होण्यास नवे सुरंग पाडल्यावांचून उपाय नाहीं, असें पाहून मुराद याणें तिशीं तह केला. त्यांत अहंमद नगरच्या राजांनीं वराड प्रांत आलीकडे जिंकून घेतला होता. तो अकबरास द्यावा असें ठरलें. परंतु पुढें लौकरच वराड प्रांताच्या सरहद्दीविषयीं तंटा पडला. व चांद बिबी इचा पेशवा महंमद खान याणें कपट करून तिच्या नाशाकरितां मुराद यास बोलावणें पाठविलें. त्यावरून तो येऊन गोदावरीच्या कांठीं मोठी लढाई जाहली. त्यांत मुराद याचे कुमकेस खानदेशचा बादशाह होता, व गोंवळकोंडें आणि विजापूर एथील बादशाह हे चांद बिबीच्या पक्षास होते. यां उभयतांचा युद्धप्रसंग मोठा होऊन मुराद याचा जय झाला. परंतु तो शाहाजादा व खान खानान या दोघां मध्यें वैमनस्य पडल्यामुळें पुढें उद्योग चालला नाहीं.

त्या कामावर अकबरानें आपला वजीर अबुल फजल यास सरदार करून पाठविलें. त्याच्या हातूनही कांहीं जाहलें नाहीं. शेवटीं अकबर बादशाह स्वतः पंजाबेंतून दक्षिणेंत आला. तो येण्याच्या पूर्वींच त्याच्या लष्करानें दौलताबाद वगैरे किल्ले घेतले होते. बादशाह बऱ्हाण पुरास पोंचल्यावर तेथून त्याणें आपला मुलगा दानियाल अहंमद नगरावर पाठविला. त्याणें त्या किल्ल्यास वेढा घातला. तेंव्हें सहपत्री नेहंग व दुसरे सरदार व चांद बि-

बी यांचा कलह होऊन युद्ध करण्याचा उपयोग दिसेना, ह्मणून बिबी तहाचें बोलणें करीत असतां कितिएक फितुर शिपायांनीं तिच्या महालांत जाऊन तिला ठार मारिलें. पुढें थोड्या दिवसांनीं किल्ला घेऊन बादशाही लोकांनीं आंतील किल्लेकरांची कत्तल करून टाकिली. आणि राजा कैद करून ग्वाल्हेरच्या किल्ल्यावर पाठविला. पुढें दुसरा एक नामधारी राजा गादीवर बसला. त्याची व राज्याची समाप्ति शाहाजहां याचे कारकिर्दींत इ. स. १६३७ जाहली.

२. अहंमद नगर घेतल्यानंतर कांहीं दिवसांनीं आशीरगडही जिंकून घेऊन बादशाहानें खानदेशच्या राज्याची समाप्ति केली. आणि आपला मुलगा दानियाल यास तो प्रांत व वराड या दोहोंचा सुभेदार नेमून त्याजवळ मसलत सांगण्यास खान खानान यास ठेविलें; नंतर विजापूर, आणि गोंवळ कोंडें एथील राजांकडून नजराणे घेऊन त्यांचे वकील आले होते त्यांच्या द्वारें त्या राजांशीं स्नेह करून आपण हिंदुस्थानांत परत गेला.

३. बादशाह दक्षिणेंतून परत जाण्याचें मुख्य कारण असें जाहलें कीं त्याचा वडील मुलगा सिलीम हा कांहीं शाहाणा असतां अफू व मद्य या दोहोंच्या व्यसनामुळें किंचित् धंदट जाहला होता. त्याचे मर्जीखेरीज व त्याच्या इतराजीतील अबुल फजल यास बादशाहानें दक्षिणेंत पाठविलें असतां, व आपल्यामागें त्याणें राज्य करावें असें ठरविलें असतां, द्वेष विशेष वाढून बादशाह दक्षिणेंत होता त्याकाळीं त्याणें प्रयाग, अयोध्या, व

बाहार प्रांत घेतले, आणि तेथील खजिन्यापैकीं सुमारें तीस लक्ष रुपये हस्तगत करून तो आपणांस राजा ह्मणवूं लागला.

४. आपल्या पुत्रानें वर लिहिल्या प्रमाणें वर्तणूक केलेली ऐकून अकबरास परम दुःख जाहलें. तथापि त्याणें त्यास प्रीतीनें उपदेशाचें पत्र पाठविलें. नंतर हिंदुस्थानांत गेला तेव्हां युक्तीनें त्याची समजूत घालून त्यास बंगाल व उडिया हे प्रांत द्यावे व त्याणें आपले आज्ञेंत वागावें असें ठरविलें. परंतु सिलीम याच्या मनांतील कपट गेलें नाहीं, आणि अबुलफजल दक्षिणेंतून येत असतां बुंदेलखंडांतील कोणी नरशिंगदेव राजा याणें सिलीम याच्या सांगण्यावरून त्यावर छापा घालून त्याच्या सर्व लोकांस त्यासुद्धा ठार मारिलें, व अबुल फजल याचें डोकें षाहाजादा [illegible]जकडे पाठविलें. हें ऐकल्यावर बादषाहानें परम खिन्न होऊन दोन दिवस पर्यंन अन्न व झोंप सोडून त्यासाठीं शोक केला, आणि आपला नेहेमींचा दयालु स्वभाव सोडून नरशिंग देव यावर फौज पाठवून त्याचें कुटुंब व राज्य यांचा नाश करविला. परंतु आपल्या मुलाचें अंग अबुल फजल यास मारण्यांत होतें हें बादषाहास कळलें नाहीं, ह्मणून त्याणें सिलीम याजवळ आपल्ये राणीस मध्यस्थ घालून त्याची व आपली एकी केली.

५. नंतर सिलीम यावर विशेष प्रीतीचें लक्षण दाखविण्याकरितां अकबरानें त्यास राजचिन्हें धारण करण्याची आज्ञा देऊन मोठ्या सैन्यासहित उदेपुरच्या राण्यावर स्वारीस पाठविण्याचा निश्चय केला. परंतु तिकडे जाण्याची

त्याची इछा नाहीं असें पाहून त्यास प्रयागास जाऊन स्वतंत्रपणें राहण्याची मोकळीक दिली. त्या ठिकाणीं असतां सिलीम हा अतिशय व्यसनाक्रांत होऊन तो व त्याचा वडील मुलगा खुषरू या उभयतांमध्यें कलह उत्पन्न जाहला. त्यामुळें मानशिंग याची बहीण खुषरू याची आई इला वाईट वाटून तिणें विष खाऊन आपला प्राण दिला. यावरून सिलीम यास बुद्धिभ्रंश जाहल्या प्रमाणें होऊन तो फार क्रौर्य आणि अविचार करूं लागला.

६. हें वर्तमान ऐकल्यावरून अकबर प्रयागास जाण्याकरितां निघाला, परंतु आपले आईची अस्वस्था आहे असें समजल्यावरून तो परत आग्र्यास गेला. तेथें त्याची आणि तिची दृष्टिभेट होऊन ती मरण पावली. पुढें सिलीम आपणच दरबारास आला, तेथें कांहीं दिवस त्यास प्रतिबंधांत ठेवून औषधी उपचार करून बादषाहानें त्यावर कृपा केली. तथापि तो व त्याचा मुलगा खुषरू या उभयतांमध्यें कलह जाहला, आणि सिलीम याचा तिसरा मुलगा खरम यावर त्याची व अकबराची फार प्रीति होती, ह्मणून खुषरू यास विशेष वाईट वाटावयास कारण जाहलें.

७. याच्या पूर्वीं कितिएक वर्षांवर अकबराचा दुसरा मुलगा मुराद हा वारला होता; आणि त्याचा तिसरा मुलगा दानियाल यासही मद्याचें व्यसन अतिशय लागलें होतें, त्यापुढें कांहीं उपाय न चालतां तो मरण पावला. तो अकबरास मोठा शोक जाहला, व आणखी कितिएक जिवल-

ग मित्र मेले त्यांचें दुःख त्यास सहन करणें प्राप्त झालें. याका-
रणामुळें त्याची प्रकृति उत्तरोत्तर क्षीण होत चालली.

८. शेवटीं अकबराचा जठराग्नि केवळ मंद होऊन त्या-
चा अंतकाळ समीप आला, असें दिसूं लागलें. तो दाहा दि-
इ० स० १६०५ वस बिछान्यावर पडून राहिला. इतक्यांत सिलीम यास
एकीकडे ठेवून त्याचा मुलगा खुषरू यास गादीवर बसवि-
ण्याची मसलत कित्येक सरदारांनीं केल्यामुळें याड्यामध्यें
ध्यें कांहीं बखेडा जाहला, आणि सिलीम हा बादशाहास
भेटावयास येण्याविशीं अनमान करूं लागला, परंतु आ-
पल्या मागें सिलीम याणें राज्य करावें या विषयीं अकबरा-
चा दृढ निश्चय होता. आणि त्यासच बहुत करून सर्व सर
दार अनुकूळ होते त्यावरून सिलीमु याची खात्री होऊ-
न तो त्याचे भेटीस गेला. तेव्हां आपले सर्व उमराव यां-
स जवळ बोलावून अकबरानें सिलीम यास आपल्यास-
रदारांशीं स्नेहानें वागण्याविषयीं व बायका व आश्रित व
जुने स्नेही यांस अंतर नदेण्याविषयीं अनेक प्रकारें बोध के-
ला. आणि आपली आवडती तरवार आपल्यासमक्ष त्या-
च्ये कमरेस बांधविली. इतकें केल्यावर त्याणें एका मु-
ल्लयास बोलावणें पाठविलें. आणि त्याच्या समक्ष निमा-
ज पढून तो खऱ्या मुसलमाना प्रमाणें मरण पावला.
(अकटोबर ता. १३).

९. अकबर शरीरानें सुदृढ. स्वरूपानें सुंदर, आ-
णि स्वभावानें शूर. उद्योगी आणि मनमिळाऊ होता.

लहानपणीं त्याचें लक्ष्य शरीरसुख व मद्यादि विषय यांजकडे हो-
तें, परंतु पुढें लौकरच तो त्यांपासून विरक्त जाहला. त्याणें मांस
भक्षण अमुक अमुक दिवसीं करूं नये असा नेम केला होता. ते
दिवस मिळून वर्षांत सुमारें तीन महिने होत असत. त्यास झों-
प फार नव्हती, आणि विद्यादिकांविषयींच्या वादाची त्याला
अतिशय आवड होती. त्यांत तो केव्हां केव्हां रात्रीच्या रात्री घा-
लवीत असे. त्यास इतका युद्धाचा उद्योग असतां आणि राज्य
कारभार संबंधें मोठ मोठ्या मसलती करावयाच्या असतांही
तो आपल्या वेळाची इतकी व्यवस्था राखीत असे कीं, विद्येच्या
व्यासंगाकडे व करमणुकीकडे खर्चण्यास त्यास वेळ मिळत असे.
त्यास हत्ती वाघ इत्यादिकांच्ये शिकारीची मोठी आवड होती, आणि
शरीरास श्रम व संकटांशीं अभ्यास हीं व्हावीं इतक्याच हेतूनें तो
केव्हां केव्हां मोठ मोठ्या मजला करीत असे. एकवेळ तो अज-
मीराहून आग्र्यास ह्मणजे ११० कोश घोड्यावरून दोन दिवसां-
त गेला, आणि समय विशेषीं पायीं पंधरा वीस कोश जात अ-
से. इतकेंही असून त्यास युद्धाचा मोठा उत्साह होता असें ना-
हीं. कारण पडेल तेव्हां तो युद्ध प्रसंग करी, परंतु आपला अभि-
प्राय सिद्धीस गेला ह्मणजे शत्रूंचा अधिक नाश करीत नसे. दि-
ल्लीच्या सभोंवताल्या प्रांतांशिवाय बाकीच्या राज्यावर त्याच्या
सारिखा अंमल पूर्वींच्या राजांतून कोणाचा बसला नव्हता, ह्म-
णून सर्व हिंदुस्थानचा बादशाह हें पद प्रथम त्यासच योग्य हो-
य.

१०. विद्या आणि धर्म यांविषयीं अकबर निष्पक्षपात होता.

त्याच्या संग्रहीं त्याचा वजीर अबुल फजल याचा भाऊ फैजी ना-
में विद्वान् पुरुष होता; त्याणें आणिखी कितिएक विद्वानांच्ये
मदतीनें वेद, भारत, रामायण, लीलावती, बीज, इत्यादि संस्कृ-
त ग्रंथांचे तरजुमे फारसी भाषेमध्यें केले. तसाच कोणी एक
विद्वान् क्रिस्ती पाद्री गोंव्याहून नेऊन त्याकरवीं अकबरानें कि-
तिएक मुलांस विद्याभ्यास करविला, आणि त्याकडून पुढें ग्री-
क भाषेंतून फारसींत ग्रंथ करण्याचा उद्योग केला. क्रिस्ती
बैबल याचा तर्जुमा करण्याचें काम त्याणें अबुल फजलास स-
सांगितलें होतें. त्याच्या दरबारांत बहुत विद्वान् मंडली होती.
आणि त्याचे सरदार अजीज़, व खानखानान वगैरे हे सुद्धा-
च्या कामांत इतके प्रवीण असून ग्रंथ करणारे होऊन गेले.
त्याच्ये वेळचा तानसेन गवई याचें नांव तर प्रसिद्धच आहे.

११. अकबर याचा विश्वास मुसलमान धर्मावर नव्हता,
व त्याला आपल्या लोकांचे बहुत संप्रदाय आवडत नव्ह-
तें. त्याणें शाक व महिने यांचीं नावें फिरविलीं, सलाम अले-
कुम ह्मणणें, मणिधारण करणें, व दाढी वाढविणें, वगैरे सां-
प्रदाय मोडण्या विषयीं प्रयत्न आरंभिला, आणि धर्माविष-
यीं सरकारची जबरी होती ती कमी केली. ज्याच्या मनास
जसें येईल तसें त्याणें वागावें आणि कोणी मुलाचें वय बारा
वर्षांचें होऊन त्यास समजूं लागे तों पर्यंत त्याची सुंता करूं
नये, इत्यादि प्रतिबंध केले. याच रीतीनें हिंदूमध्यें दिव्य
व होमाकरितां पशुवध हीं करण्याची मनाई केली, आणि
सती जाणें झाल्यास खुषी असल्याविना जाऊं नये असा बं-

दोबस्त केला. या बादशाहास कोणत्याच धर्माचा अभिमान न-
व्हता, ह्मणून तो फौजेवरील व राज्यांतील दुसरे अधिकार भे-
द न करितां हिंदु व मुसलमान यांस सांगत असे; आणि कोण-
त्येही रीतीनें देवास भजण्याविषयीं कोणास प्रतिबंध करूं
नये असा त्याचा अभिप्राय होता, ह्मणून पूर्वी हिंदुलोकांपा-
सून जजिया नामें जो कर घेत असत, तो व यात्रेकऱ्यांवरचें
देणें हे त्याणें आपल्या राज्याच्या आरंभींच मना केलें.

१२. अकबराच्ये कारकिर्दीच्या पूर्वी सुमारें शंभर वर्षां-
पासून कबीर पंथी मत प्रवृत्तीस आलें होतें, त्यांतील सिद्धां-
तांप्रमाणें त्याचा सिध्दांत होता. तो असा कीं पैगंबर ह्मणू-
न कोणी आज पर्यंत जाहला नाहीं, व ईश्वरेच्छा समजणेंती म-
नुष्यास आपले बुद्धीच्या योगें समजती. अकबर याच्या अ-
शा मतामुळें आणि त्याणें मुसलमान धर्मास सरकारी मदत
देण्याचें मना केल्यामुळें मुसलमान त्यास नास्तिक ह्मणून
त्याची अद्यापि निंदा करितात.

१३. अकबर बादशाहानें देशाचे एक कोटि दाम ह्मणजे अ-
डीच लक्ष रुपये वसुलाचे तालुके केले. तसेच एकंदर स्वा-
धीन जाहलेल्या मुलकाचे मोठे पंधरा सरसुभे ठरवून एके-
कास्रुभ्यावर सिपाह सालार, या नावाचा एकेक सुभेदार
ठेविला. साऱ्या प्रांतांमध्यें पाहणी करून जमीनीच्या प्र-
ती लावून उत्पन्नाच्ये तिजाईच्या सुमारें रोकड सरकार देणें
ठरविलें; आणि तालुक्यांचे मक्ते देण्याची पहिली चाल हो-
ती ती मोडून तहशीलदार यांणीं जमीदार वगैरे लोकांचा

संबंध नठेवितां श्यतेशींच काय ठराव करणें तो करावा, असे हुकूम केले. ऐन जिनसाच्या पैका आकारणें तो एकुणीस वर्षांच्या आजार निरखांची सरासरी करून त्यादरानें आकारावा असें ठरविलें, आणि यादेण्याशिवाय कर, पट्ट्या, व कामदारांच्या बाबती होत्या, त्या बहुतेक माफ केल्या. हा राज्याच्या जमाबंदीच्या बंदोबस्त करण्यांत अकबरास तोडर मल्ल नामें कोणी निर्लोभी आणि मोठा शाहाणा पुरुष मसलत सांगणारा होता. त्याणें केलेल्या बंदोबस्ताविषयीं तपशील वार सर्व हकीकत अईन अकबरी नामें ग्रंथांत आहे. याशिवाय अकबर याणें कामदारांस केलेले हुकुमही आहेत, त्यांत शाहाण पणा व प्रजांच्या कल्याणाची इच्छा हींच बहुधा दृष्टीस येतात.

१४. प्रतिप्रांतांतील चोरांच्या वगैरे बंदोबस्त करणारे व मुलकी शिबंदीची व्यवस्था राखणारे लष्करी सरदार फौजदार नामें होते. न्याय मनसुबी करण्याचें काम काजी व मीर अद्दल नामें सरकारी कामदार यांजकडेस होतें; आणि गांवगंनाचा बंदोबस्त करणारे कोतवाल होते. त्यांणीं खोड्यांत घालण्यापासून देहांत दंड करण्यास त्यांस मोकळीक होती.

१५ फौजेमध्यें दाहा स्वारांपासून दाहा हजार स्वारां पर्यंत मनसबदार नामें सरदार होते. त्यांतून ५००० स्वारांपेक्षां अधिक स्वारांची सरदारी शाहाजादे व रजपुत राजे यांजकडेस मात्र असे. हे मोठे सरदार सुमारें ३० होते. यां शिवाय दोनशें स्वारां पर्यंत सरदार सुमारें ४५० होते.

आणि त्यांतून एकेका सरदारानें स्वारांच्या निमे पायदळ ठेवावें, आणि त्या पायदळाच्या लोकांमध्यें एक चतुर्थांश लोक बंदूक वाले व बाकीचे तीरंदाज असावे, अशी व्यवस्था होती. याशिवाय अहदी ह्मणजे एकांडे चाकरी करणारे स्वार होते, त्यांतून सिंधुनदीच्या पलीकडच्यांस दरमहा रुपये २५ व हिंदुस्थानांतील लोकांस २०, बंदूक वाल्यांस ६, तीरंदाजांस २॥; अशयानें मणुका होत्या. असें सर्व लोक मिळून एकंदर फौज किती होती हें समजत नाहीं, परंतु मुलकी शिबंदी ४४००,००० होती असें अबुल फजल याणें लिहिलें आहे. पुढें अवरंगजेबाच्या राज्यांत सरकार पगारदार स्वार २००,००० होते.

१६. अकबर याणें अटकेचा किल्ला बांधिला ह्मणून वर लिहिलें. याशिवाय त्याणें गोपूर शिकरी नामें शहर वसविलें, आणि आग्रा व प्रयाग एथे किल्ले, तट, खंदक, घुमट, वगैरे मोठ्या मोठ्या इमारतींचीं कामें केलीं.

१७. त्याच्या स्वारांमध्यें डेरे, राहुट्या, कनाती वगैरे यांची शोभा अद्वितीय होती, आणि नवरोजचा सण, व त्याचा जन्म दिवस इत्यादि प्रसंगीं मोठा उत्साह होत असे. तेवेळेस मखमली बैठका व रेशमी किनखापी पडदे यांहींकरून सुशोभित अश्या दिवाणखान्यामध्यें सिंहासनावर बादशाह बसत असे; सभोंवते रत्नखचित शिरपेंच लावलेले मानकरी उभे असत; आणि राजवाड्यापुढें माणकांनीं व पाचांनीं जडीत पिंपळ वणें बांधलेले हत्ती, व त्यांच्या मागून मोत्यांच्या कलग्या लावलेले घोडे, व त्यांवर भरगच्ची पोषाखांचे स्वार यांच्या रांगा चालत. बादशा-

हद्रव्याच्या तुळा करून तें गरीबांस वांटी, आणि सोन्यारुप्याचीं केलेलीं बदामें व दुसरीं फळें आपल्या हातानें उडवी.

१८. इतकेंही वैभव असतां अकबराचा साधेपणा वर्णावया जोगा असे. त्याच्या दरबारची व्यवस्था दोघां इंग्रेजांनीं डोळ्यांनीं पाहिली, त्यांणीं लिहिलें आहे कीं, "तो इतर राजांप्रमाणें डौल न करितां इनसाफ करण्यास सिंहासनाच्या खालीं बसतो; सर्वांशीं बोलतो; आणि तेजस्वी असून समयीं दया करितो, समयीं कठोरपणा करितो. त्यास बंदुका व तोफा करण्याचें काम समजतें, तो मित भोजन करितो, सार्‍या दिवसांत प्रहर भर निजतो, सर्वकाळ उद्योग करितो, कोणी गरीब माणूस कांहीं नजर घेऊन आला असतां त्याशीं बोलून तो त्याचा बहुमान करितो, त्याच्या प्रजा त्यावर प्रीति करून त्याची दहशतही बाळगितात, आणि शत्रु त्यास थरथर कांपतात."

प्रकरण १०.

जहांगीर बादशाह.

सन १६०५ पासून १६२७ पर्यंत.

१. अकबराच्या मरणानंतर लागलाच सिलीम हा जहांगीर म्हणजे पृथ्वी जिंकणारा असा किताब धारण करून सिंहासनावर बसला. (इ० स० १६०५ अकटोबर) तो प्रथम कांहीं काळ पर्यंत आपला पूर्वींचा दुष्टस्वभाव सोडून न्यायानें व शांतपणानें कारभार करूं लागला. कोणी फिर्यादी आला असतां त्याची दाद लौकर ला-

गावी म्हणून वाड्याचे भिंतीस त्याणें एक सांखळ लाविली होती; ती फिर्यादी लोकांनीं हालविली म्हणजे आंत घांट वाजून त्यास कळत असे.

२. जहांगीर गादीवर बसल्यावर चार महिन्याच्या सुमारें त्याचा मुलगा खुषरू याणें प्रतिबंधांतून सुटून आग्रा आणि दिल्ली यांच्ये वाटेनें पंजाबेंत जाऊन १०,००० लोक जमविले; परंतु लाहोर शहर फितुरानें घेऊन तो तेथील किल्ला हस्तगत करण्याच्या उद्योगांत असतां बादशाहाच्ये फौजेनें जाऊन त्याचा पराजय केला. नंतर तो होडींतून पळत जात असतां त्यास धरून बादशाहापाशीं आणिलें, व त्याचे ७०० लोक कैद केले. या लोकांस ओळीनें उभे करून त्यांचे हाल हाल करून त्यांस सुळीं दिलें, आणि खुषरू याची अप्रतिष्ठा करून त्यास कैद करून ठेविलें.

३. दक्षिणेंत अहंमद नगरचें राज्य पूर्वीं अगदीं मोडकळीस येऊन तें बहुतेक दिल्लीच्या सरदारांनीं हस्तगत केलें होतें. परंतु तेथे जमाबंदीच्ये शिस्तीविषयीं ज्याचें चातुर्य प्रसिद्ध, असा जो मलिकंबर नामें सरदार, त्याणें सांप्रतच्या अवरंगाबाद शहरच्या जागीं नवी राजधानी वसवून अहंमद नगर परत घेतलें, आणि जहांगिराचा सरदार खान खानान याचा पराजय केला; त्यास सैन्य सहित बऱ्हाणपुरीं जाणें प्राप्त जाहलें. पुढें जहांगीर याणें आपला मुलगा परवीज, व खान जाहान लोदी, व राजा मानशिंग, यांणीं मलिकंबरावर खानदेश व वराड या प्रांतांकडून हल्ला करा-

Government Oriental MSS. Library, Triplicane P.O.

वा, व अबदुल्लाखान गुजराथचा सभेदार याणें आपल्ये बा-
जूकडून स्यावर आवें असा हुकूम केला. स्यांतून अबदुल्लाखा-
न पूर्वीं जाऊन पोंचला. स्यास दाणावैरणीचा तोटा पडूनस्या-
ची छावणी वारंवार लुटून मलिकंबरानें इतकें हैराण केलें
कीं स्याचे पिछाडीचे लोक सगळे मारिले गेले; आणि बाग-
लाणांतील जंगलाच्ये वाटेनें गुजराथेंत जाऊन पोंचण्याचें
स्यास मोठें संकट पडलें. ही स्याची अवस्था पाहून बाकीचे स-
इ० स० १६१२ रदारही बऱ्हाण पूर एथे छावणी करून राहिले.

५. या राज्याच्या आरंभींच शाहाजादा परवीज याणें उदे-
पुरच्या राण्याशीं तह ठरविला होता, परंतु पुनः स्याशीं इ.
स. १६०७ तांत लढाई चालू होऊन बादशाह याणें मोहबत
खान यास सैन्य देऊन उदेपुरावर रवाना केलें. स्याणें एकवे-
ळ राण्याचा पराजय केला, आणि पुढें अबदुल्लाखान याणें
ही एकवेळ जय मिळविला. नंतर बादशाहाचा तिसरा मु-
लगा खुरम, याणें २०००० सैन्यासहित तेथे जाऊन तो
राणा हीनबल केला. आणि तो शरण आल्यावर स्याचा बहु-
मान करून स्याचीं शस्त्रें स्यास परत देऊन सर्व राज्य स्याच्या
स्वाधीन केलें. स्याच्या मुलग्यासही बादशाहानें सरदारीचा
१६१४ मोठा अधिकार दिला. या पराक्रमेंकरून बादशाह खुरमा-
वर बहुत संतोष पावला, आणि सर्व लोकांत स्याची कीर्त्ति
जाहली. पुढें कांहीं वर्षांनीं बादशाहानें स्यास शाहाजहां
असा किताब दिला, आणि तिघां मुलांत तो सर्वांपेक्षां ल-
हान असतां आपल्यामागें तो राज्याधिकारी ठरविला.

५. वर दोन कलमांत लिहिलेलीं युद्धें होत असतां राजा मानशिं-
ग दक्षिणेंत मरण पावला. काबुल एथे राशानये लोक यांणीं (इ.
स. १६११) बंड केलें होतें, स्यांतील मुख्य अहदाद, हा मरून, तें स-
माप्तीस गेलें. अबदुल्लाखान गुजराथचा सभेदार याजवर बाद-
शाहाची गैरमर्जी होऊन स्यास धरून हुजूर पाठवावें ह्मणूनबा-
दशाहाचा हुकूम जाहला होता, तो पांयीं येऊन शरण जाहला.
स्याविषयीं शाहाजहां याणें रदबदली केल्यावरून बादशाहा-
नें स्यावर पुनः कृपा केली.

६. पुढें शाहाजहां याणें अजमीराहून दक्षिणेंत स्वारीकरू-
न विजापुरच्या बादशाहास वश करून तो मलिकंबर याच्या स्नेहां-
तून फोडिला; स्यामुळें आणि आपल्या हाताखालच्या सरदारां-
शीं वैमनस्य पडल्यामुळें मलिकंबर हा आपला नावाचा धनी
जो निजाम षाह स्याच्ये तर्फेनें बादशाहास शरण गेला, आणि न-
गरचा किल्ला व स भोंवताला प्रांत जो स्याणें पूर्वीं परत घेतला इ० स०
होता तो सोडून देता जाहला. हा जय संपादन करून शाहाज- १६१७
हां आपला बाप मांदु एथे होता स्याच्ये भेटीस गेला. उभयतां
एक वर्ष पर्यंत गुजराथेंत राहून नंतर बादशाह शाहाजहां या-
जकडे गुजराथेचें काम सांगून, परत पंजाबेस गेला; व तेथे ए- १६१८
क बंड जाहलें होतें तें मोडून काश्मीरास गेला.

७. स्या प्रांतांत बादशाह असतां मलिकंबर याणें आपल्या
सरदारांस हटवून बऱ्हाण पुरांत घालविलें असें स्यास वर्तमा-
न कळलें. स्यावरून शाहाजहां यास मोठें सैन्य व बहुत द्रव्य दे- १६२१
ऊन स्याणें दक्षिणेंत पाठविलें. तो यऊन पोंचण्याच्या पूर्वीं मलि-

कंबर याणें नर्मदा उतरून मांडु शहर जाळलें होतें, आणि तो येत असतां त्याच्या लष्करावर छापे घालण्याचा व दाणा वैरणीचा तोटा पाडण्याचा उपाय केला होता; परंतु शाहाजहां याणें शेवटीं लढाई जुंफली तेवेळीं मलिकंबराचा पराजय केला, आणि पुढें त्यापासून द्रव्य व मुलुक घेण्याचा करार ठरवून त्याशीं तह केला.

८. याच वर्षी बादशाहास श्वासाचा उपद्रव होऊन तो फार दिवस वांचणार नाहीं असें भय पडलें. त्याच्या मरणाची संधि साधण्याकरितां त्याचा मुलगा परवीज हा दरबारास गेला होता, परंतु बादशाहानें त्याजवर रागें भरून त्यास परत पाठविलें. शाहाजहां हा तिकडे गेला तर नाहीं, परंतु त्याचे कैदेंत त्याचा वडील भाऊ खुषरू हा होता तो त्याच संधीस मेला. तो त्याणें मारविला असेल असा संशय उत्पन्न जाहला. शाहाजहां याणें तर जन्मांत असें क्रूर कर्म केलें नाहीं, यावरून पाहतां तो संशय खोटा असें दिसतें.

९. शाहाजहां याच्या पराक्रमामुळें जहांगीर याची त्यावर फार प्रीति होती, आणि त्याची राणी नूरजहां इचा भाऊ असफखान याचे मुलीशीं त्याणें लग्न केलें होतें; त्यामुळें तिचेंही लक्ष्य त्याकडे असून त्याचे मतलब सिद्धीस आण्याकरितां ती बादशाहाजवळ भीड खर्चीत असे. त्यामुळें शाहाजहां याची उत्तरोत्तर बढती होत चालिली होती; परंतु त्या राणीची पहिल्या नवऱ्या पासून झालेली मुलगी कोणी एक शहरयार नामें सरदारास दिली होती, याजवळच्या सं-

बंधामुळें तिची प्रीति त्यावर शाहाजहां पेक्षां अधिक बसली. पुढें शाहाजहांचें वर्चस्व दिवसानुदिवस अधिक होत गेलें असतां आपुलें व बादशाहाचें चालणार नाहीं, असें मनांत आणून तिणें शाहाजहां याच्या मानभंगाविषयीं उद्योग करण्याचा आरंभ केला.

१०. नंतर लौकरच, कंदहार इराणी लोकांनीं हस्तगत केलें होतें तें जिंकून परत घेण्याकरितां शाहाजहां यास तिकडे स्वारी करण्याविषयीं बादशाहाचा हुकूम जाहला, आणि त्याप्रमाणें तो दक्षिणेंतून मांडु किल्ल्यापर्यंत गेला, परंतु दक्षिणेंत आपला अंमल चांगला बसलेला पाहून बादशाहानें आपणास तेथून बाहेर पाठविण्याची मसलत आरंभिली आहे, असें जाणून, फौज तयार नाहीं, याकरितां माझें जाणें होत नाहीं, ह्मणून त्याणें बादशाहास लिहून पाठविलें. त्यावरून शहरयार याकडे कंदहार घेण्याचें काम सोंपून शाहाजहां याणें आपली फौज त्याकडे पाठवून द्यावी, असा बादशाहानें हुकूम केला, आणि शाहाजहां याच्या हिंदुस्थानांतील जाहागिरी जप्त करून त्याणें तितका प्रांत दक्षिणेंत लावून घ्यावा अशी युक्ति केली. बादशाहाच्या या करण्यावरून शाहाजहांस राग आला; परंतु मध्यस्थ पाठवून सामोपचाराचा कांहीं उपयोग नाहीं असा त्याचा निश्चय जाहल्यावर तो सैन्य घेऊन आग्र्याकडे निघाला. इकडे बादशाहही काश्मीरास गेला होता, तो लाहोरच्यें वाटेनें परत येऊन या बंडवाल्यांच्ये फौजेवर स्वारी करिता आ-

हला.

११. पुढें उभय पक्षींच्या सैन्याची लढाई मेवात प्रांतांतील जंगलांत होऊन शाहाजहां मागेंहटून बऱ्हाणपुरास आला. त्याच्या मागून शाहाजादा परवीज, व मोहबतखान, व खानखानान्, या सरदारांनीं येऊन त्याचीं ठाणीं घेतलीं, आणि त्याचा निरुपाय केला. ते वेळीं पर्जन्य अतिशय असतां तो शाहाजहां बऱ्हाणपुराहून निघून तेलंगणाच्या मार्गानें बंगाल्यास गेला. तेथे त्याणें राजमाहाल शहरांत बंगालच्या सुभेदाराचा पराजय करून बंगाल, आणि बाहार, हे प्रांत हस्तगत केले; आणि जयपूरच्या राण्याचा भाऊ भीमसिंग याच्या स्वाधीन फौजेची एक टोळी करून तो प्रयागचा किल्ला घेण्यास पाठविला.

१२. इतक्यांत परवीज व मोहबतखान, हे बऱ्हाणपुराहून प्रयागाकडेस जाण्यास निघाले; बादशाहही भागीरथी उतरून पलीकडेस गेला; आणि बाहार प्रांतांतील लोक शाहाजहां यास दाणा वैरण मिळूं देईनात. अशा अडचणी पाहून शाहाजहां दक्षिणेंत परत आला, आणि मलिकंबरास मिळून कांहीं दिवस पर्यंत त्याणें युद्ध चालविलें. पुढें बादशाहाच्या सरदारांनीं त्यास हैराण केलें, आणि बहुत फौज आपणास सोडून गेली असें पाहून तो बादशाहास शरण जाहला. त्याणें बादशाहाचे आज्ञेप्रमाणें रोटास व आशीरगड हे किल्ले स्वाधीन करून पुढील चांगले वर्तणुकी विषयीं खातरी करितां दारा व औरंग-

जेब हे दोघे मुलगे ओलीस पाठविले. इ० स० १६२५

१३. इतक्यांत बादशाह व नूरजहां या उभयतांची मोहबतखान याजवर गैरमर्जी होऊन त्याणें बंगाल्यांत असतां कांहीं लबाडी केली, असा आरोप ठेवून त्याचा जाब पुसण्याकरितां त्यास दरबारास बोलावूं पाठविलें. त्यामुळें, व त्याच्या जांवयाची बादशाहानें कारणावांचून फार अप्रतिष्ठा केली होती यामुळें, त्याच्या मनांत कपट येऊन त्याणें बादशाहाची स्वारी जेहलम नदीच्या कांठीं असतां त्यास युक्तीनें एकाएकीं डेऱ्यांत जाऊन कैद करून आपल्या राहुटींत नेलें. तेव्हां नूरजहां इणें मोठ्या धैर्यें करून लढाई केली. तीमध्यें तिच्या हौद्याच्या आसमंतात् शस्त्रांची वृष्टि होऊन तिचे मांडीवर तिची लहान नात बसली होती तिला बार लागला, आणि तिचा माहुत मरण पावून हत्तीच्या सोंडेस जखम लागली. त्याकाळीं तो हत्ती नदींत उडी टाकून कित्येक वेळा बुडून शेवटीं पलीकडील तीरास गेला. याप्रमाणें तिचा पराजय होऊन ती पुढें बादशाहाजवळ जाऊन राहिली, आणि कांहीं दिवसांनीं युक्तीनें थोडथोडी फौज जमवून शेवटीं आपल्या चातुर्याच्या बळें करून काबुल एथें बादशाहास प्रतिबंधांतून मुक्त करिती जाहली.

१४. जहांगीर याच्या हातीं पुनः सत्ता येतांच मोहबतखान त्यास शरण आला. बादशाहानें लागलेंच त्यास शाहाजहां यावर पाठविलें, आणि मागून त्यास धरून आणण्याकरितां फौज रवाना केली. तेव्हां तो व शाहाजहां हे उभयतां समदुःखी होऊन एकमेकास मिळाले. आणि एक विचारें वागूं लागले. शा-

हाजहां याचा भाऊ परवीज हाही याच संधींत मृत्यु पावला.

१५. नंतर जहांगीर हा लाहोराहून काश्मीरास गेला होता, तेथे त्यास दम्याचा उपद्रव होऊन तो परत लाहोरास येत असतां

इ० स० १६२७ त्याच रोगानें मरण पावला. (अकुटोबर ता. ॥२८)

१६. त्याच्या पूर्वी कांहीं वेळ अजीज व खानखानान हे दिल्लीचे सरदार व मलिकंबर हे तिघे मरण पावले.

१७. जहांगीर बादषाह मद्यपी व विषयी होता, त्यामुळें तो केव्हां केव्हां कारभारामध्यें बेसावध होत असे. त्याणें नूरजहांही आपणास मिळावी ह्मणून तिच्या नवऱ्यास मारविलें, व आणखी कितिएक दुष्टकर्में केलीं. या शिवाय कांहीं स्वच्छंदपणाही त्यामध्यें होता. तथापि तो भला व उदार असे असें सरटामसरो नामें इंग्लिश बादषाहाचा वकील त्याच्या दरबारांत कांहीं दिवस होता त्याणें लिहिलें आहे. या बादषाहानें आपल्या राज्याची बखर लिहिली आहे, तीमध्यें आपल्या करण्याविषयीं व स्वभावाविषयीं बहुत चमत्कारिक गोष्टी लिहिल्या आहेत.

प्रकरण ११.

शाहाजहां बादषाहाची कारकिर्द.

सन १६२७ पासून १६५८ पर्यंत.

१. जहांगीर मेल्यानंतर असफखान याणें नूरजहांइला प्रतिबंधांत ठेवून शाहाजहां यास दक्षिणेंतून बोलावणें पाठविलें. शाहाजहां लागलाच आऊन आग्रा एथे तक्तावर बसला. त्याच्या पूर्वी खुषरू याचा मुलगा दावर यास असफखान याणें आपल्या मतलबाकरितां उगाच गादीचा अधिकारी केला होता तो युक्तीनें इराणांत पळून गेला. शहरयार आणि शाहाजादा दानिआल याचे मुलगे यांणीं मिळून लाहोरचा खजिना स्वाधीन करून बंडावा आरंभिला होता, त्यांचा बंदोबस्त असफखान याणें करून त्यांस कैदेंत घालून ठेविलें होते, त्यांस बादषाहाच्या हुकुमावरून देहांतदंड झाला.

२. शाहाजहां याणें अधिकारावर येतांच असफखान व मोहोबतखान या सरदारांनीं आपणास मदत केली होती, ह्मणून त्यांचा मोठा बहुमान केला. राजापुढें साष्टांग नमस्कार वगैरे घालण्याचे संप्रदाय पडले होते ते शाहाजहां याणें मोडून मुसलमान धर्मास कांहीं अनुकूळ अशा चाली पुनः प्रवृत्तींत आणिल्या. तशाच त्याणें मुख्य मुख्य शहरांमध्यें थोर थोर इमारती बांधिल्या, आणि मोठे मोठे समारंभ करण्याचें आरंभिलें. त्यांतून तो गादीवर बसलेला दिवस दुसऱ्या वर्षीं जेव्हां आला, तेव्हां स्वर्णाच्या तुळा व रत्नाभिषेक व बक्षिसें पोषाक वगैरे मिळून एक कोटि साठ लक्ष रुपये खर्च जाहला असें लिहिलें आहे.

३. काबुल एथे ऊसबेक लोकांनीं कांहीं बंड केलें होतें त्याचा बंदोबस्त करण्यांत, व खानजहां लोदी नामें कोणी सरदार फितूर होऊन विजापुरचा महंमद अदिलषाह, व नगरचा मुर्तिजा निजामषाह, यांच्या दरबारांचा आश्रय करितां-

हीं दिवस फिरत होता त्याचें पारिपत्य करण्यांत, बादशाहाचीं
सुमारें तीन वर्षे गेलीं. शेवटीं बुंदेल खंडांत त्याचा पराजय हो-
ऊन कोणी एका रजपुतानें त्याचें डोकें भाल्यास लावून बादशा-
इ० स० १६३० हाकडे नजर पाठविलें.

४. अहंमद नगर एथे मलिकंबराचा मुलगा फत्तेखान या-
णें मुर्तिजा निजामषाह यास मारून एक लहान बाळक गादी-
वर बसविला होता. आणि तो कांहीं वेळ पर्यंत शाहाजहां या-
चे ताबेदारीनें वागत होता. परंतु पुढें मोहबतखान याणें त्या-
स दौलताबाद एथे वेढिलें; आणि पुढें त्याणें निरुपाय होऊन
दिल्लीच्या सरकारची चाकरी पतकरिली, तेव्हां त्याणें बसवि-
लेला बाळराजा यास कैद करून मोगलांनीं ग्वाल्हेरच्या कि-
१६३३ ल्ल्यावर नेऊन ठेविलें. पुढें शाहाजी भोंसला याणें दौलता-
बाद व आणखी कांहीं प्रांत परत घेऊन दुसरा एक बादशा-
ह गादीवर बसविला होता, परंतु शाहाजहां याची स्वारी द-
क्षिणेंत येऊन विजापुरास वेढा देऊन शेवटीं तेथील बाद-
षाहानें वर्षास वीस लक्ष रुपये खंडणी द्यावी, व त्यास नि-
जामषाही राज्या पैकीं कांहीं प्रांत द्यावे असा करार ठरवू-
१६३६ न घेतला. हें पाहून शाहाजीही शाहाजहांच्या संमता-
नें विजापुरकरांच्या एथे चाकरीस राहिला. आणि नगर-
१६३७ च्या बादषाहीची समाप्ति जाहली. याच्या कांहीं वेळ पूर्वीं गों-
वळकोंड्याच्या राजानें निजामामध्यें इराणच्या बादषाहाचें
नाव उच्चारूं नये, व दरसाल दिल्लीच्या सरकारास खंडणी
द्यावी, असा करार ठरला होता.

५. कंदहार एथील इराणी लोकांचा सुभेदार अलीमर्दानखा-
न याणें आपल्या राजास त्रासून तो प्रांत शाहाजहां याच्या स्वाधी-
न केला. ह्मणून बादषाहानें त्याचा मोठा सन्मान करून त्यास दर-
बारांत ठेवून घेतलें, आणि त्यास मोठमोठीं सुभ्याचीं कामें सांगी-
तलीं. त्याणें दिल्लीस असतांनां कितिएक उपयोगी कामें करवि-
लीं, त्यापैकीं यमुनेचा एक कालवा त्याच्या नावानें अद्यापि प्र-
सिद्ध आहे.

६. बल्क प्रांतांत नजर महंमद याचा मुलगा अबदुल अ-
जीझ याणें बंड केल्याची संधि पाहून शाहाजहां याणें अलीम-
र्दान खानास तिकडे सैन्य देऊन पाठविलें. त्याणें तो प्रांत लुट- इ० स० १६४४
ला, परंतु तेथील थंडीनें त्यास तो हस्तगत नहोतां परत येणें
प्राप्त पडलें. दुसऱ्या वर्षीं जगतसिंग नामें सरदार १४००० र-
जपूत देऊन त्या मोहिमेवर पाठविला, आणि त्याच्या मागून
आपणही काबुलास गेला. तेथून आपला मुलगा मुराद व अ-
लीमर्दानखान यांसही तिकडे रवाना केलें. त्याकाळीं नजरमं- १६४५
हंमद यास इराणांत पळून जाणें प्राप्त जाहलें, आणि तो प्रांत
राज्यांत दाखल करण्याविषयीं बादषाहानें जाहिरनामा ला-
विला, पुढें लोकरच अबदुल अजीज, याणें सिंधुनदीच्चे पली- १६४६
कडून लुटारू लोक पाठवून तो मुलुक उजाड करण्याचें आरं-
भिलें. त्याच्या पारिपत्याकरितां औरंगजेब तिकडे गेला, त्या- १६४७
चा प्रथम कांहीं जय होऊन तो बल्क शहरामध्यें कोंडला गेला.
अशा प्रसंगीं आपला केवळ अपमान नहोतां पुढें इच्यांचा व
माणसांचा नाश नव्हावा यास्तव बादषाहानें अशी मसलत

केली कीं आपल्या दरबारांत नजर महंमद येऊन राहिला होता
त्यास तेथील राज्याचा अधिकार परत दिला. नंतर औरंगजे-
ब तेथून काबुलास परत आला, त्यास वाटेनें उज्बेक लोकांनीं
फार उपद्रव दिला, आणि त्याच्या लष्करांतील सर्व बुणगें व
इ० स० १६४७ घोडे हिराचून घेतले.

७. इराणी बादशाह सफी, याच्या कारकिर्दींत अथवा त्याचा
मुलगा शाहआबास हा लहान असतां कंदहार परत घेण्याचा
उद्योग इराणी लोकांकडून जाहला नाहीं. पुढें शाहआबास या-
णें मोठी फौज घेऊन हिवाळ्यामध्यें कंदहारावर स्वारी केली,
आणि अडीच महिने पर्यंत त्याला वेढा देऊन तें शहर घेतलें.
त्यावेळेस त्या शहराच्या संरक्षणार्थ बादशाहाचा वजीर सा-
अदुल्ला, व औरंगजेब हे निघाले होते, त्यांचें पोंचणें तेथें जा-
हलें नाहीं. पुढें त्या उभयतांनीं चार महिने पर्यंत मोठ्या कौ-
शल्यानें किल्ला घेण्याविषयीं पराकाष्ठा केली; परंतु इराणी
लोकांनीं बाहेरून दाणावैरणीचा तोटा पडला, आणि किल्ले-
दारांनीं आंतून मोठ्या निकरानें किल्ला रक्षण करण्याविष-
यीं मेहनत फार केली. यामुळें त्यांचा निरुपाय होऊन ते उ-
१६४९ भयतां वेढा उठवून परत आले. नंतर दोन वर्षांनीं बादशाहा-
नें त्याच उभयतांस मोठें सैन्य स्वाधीन करून त्याच कामाव-
१६५२ र पाठविलें, परंतु कांहीं उपयोग जाहला नाहीं. पुढें बादशा-
हाचा पहिला मुलगा दाराशेखो याणें कीर्त्ति व जय संपाद-
न करण्याकरितां कंदहारावर स्वारी केली; आणि बाहेर तो-
फा लागू करून सुरंग वगैरे करण्याचा मोठा प्रयत्न केला. ए-

कवेळा एकाएकीं तटावर चढण्याचाही धीर केला; परंतु कां-
हीं फळ न होतां त्याची फौज मात्र नाश पावून त्यास परत का-
बुलास येणें प्राप्त पडलें. इ० स० १६५३

८. यानंतर दोन वर्षें शाहाजहां याचीं स्वस्थपणांत गेलीं.
तितक्यांत सार्‍या मुलकाची नवी पाहणी जी पूर्वीं वीस वर्षां
पासून चालली होती, ती संपून तोडरमल्ल याची शिरस्त सर्व
ठिकाणीं चालू झाली. याच वर्षीं त्याचा वजीर साअदुल्लाखा-
न मरण पावला. तो मोठा चतुर आणि प्रमाणिक मनुष्य
होता.

९. दक्षिणेंतील सुभ्याचें काम शाहाजहां याणें औरंग
जेबास सांगीतलें. त्याणें हैदराबादच्या बादशाहाचा वजी-
र मीरजुमला, यास अनुकूळ करून घेऊन त्याच्या मसलती-
नें आपल्या मुलाच्या लग्नाकरितां बंगाल्यास जाण्याचें मि-
ष करून एकाएकीं तेथील बादशाह अबदुल्ला यास कपटें
करून वेढिलें. तेव्हां त्याचा निरुपाय होऊन तो शरण आला,
आणि त्याणें आपली मुलगी औरंगजेबाचा मुलगा सुलता-
न महंमद यास द्यावी, व दरवर्षास दिल्लीच्या सरकारास ए-
क कोटि रुपये द्यावे वगैरे नम्रतेचे करार करून दिले. या-
प्रमाणेंच विजापुरचा महंमद अदिलशाह मेल्यावर त्याचा
मुलगा अल्ली हा तेथे राज्य करीत होता, त्यावरही अवरंग
जेबानें कारणावांचून हल्ला केला, आणि बेदर वगैरे कांहीं
प्रांत औरंगजेबाचे हस्तगत झाल्यामुळें तो शरण आला.*

* या लढायांचें सविस्तर वर्त्तमान मराठ्यांच्या बखरेंत चौथ्या
भागीं पाहावें. पृष्ठ ३६ — ३९ पर्यंत.

१०. इतक्यांत शाहाजहां दुखण्यांत पडला. तेव्हां दारा हा सर्व राज्य कारभार करूं लागला, असें वर्तमान ऐकतांच औरंगजेबाचें चित्त व्यग्र जाहलें. नंतर त्याचा भाऊ मुराद गुजराथच्या सुभ्याच्या कामावर होता, त्यास गादीवर बसविण्याची भुलथाप देऊन ते दोघे मिळून हिंदुस्थानांत जाण्यास निघाले. त्या उभयतांची गांठ माळव्यांत पडून शिप्रा नदीच्या कांठीं त्यांची आणि दारा याचा सरदार राजा जसवंतसिंग याची मोठी लढाई होऊन उभयतां शाहाजादे जय पावले.

इ० स० १६५८

११. याच्या पूर्वींच शाहाजहांचा दुसरा मुलगा बंगालचा सुभेदार शुजा हा ही काशी पर्यंत आला होता; परंतु दारा याचा मुलगा सुलेमान याणें त्याचा पराजय केल्या मुळें त्यास परत बंगाल्यांत जाणें प्राप्त जाहलें. नंतर औरंगजेब व मुराद हे युक्तीनें चंबळा नदी उतरून आग्र्या पासून एके मजलेवर जाऊन पोंचले असतां दारा याणें समगड एथे त्यांशीं युद्ध प्रसंग केला. त्यांत अवरंगजेबाकडे सुमारें तीस पस्तीस हजार स्वार होते, व दारा याच्या पक्षाचें तितकेंच सैन्य होतें. शिवाय बहुत हत्ती व तोफा होत्या.

१२. या युद्धांत अवरंगजेब मध्यभागीं होता, आणि त्याच्या पुढें तोफांची हार लाविली होती. ती फोडण्याकरितां दारा याणें दोन वेळ हल्ला केला असतां कांहीं उपाय चालला नाहीं. इतक्यांत मुराद याजवर ३००० उजबेक लोकांनीं मोठ्या वेगानें बाणाची वृष्टि चालविली; ती सहन क-

रून तो कांहींसा सावध होतो आहे, इतक्यांत रजपुतांचे एके टोळीनें त्यावर हल्ला केला, आणि त्यांचा राजा रामसिंग हा केशरी पोषाख व मोत्यांचा तुरा लावून लढत होता त्याणें पुढें होऊन, आपली बर्ची मुरादावर फेंकली. ती त्याणें ढालेवर संभाळून एका तीरानें त्यास मारून खालीं पाडला. तें पाहून रजपुत लोक संतापून फार निकरानें लढले, आणि त्यांच्या राशी मुराद याच्या हत्तीच्या सभोंवत्या पडल्या. पुढें दारा याणें आपल्या सैन्याचे संख्येच्या योगानें मुरादाच्या सैन्याची फळी फोडून त्याची कांहीं शी दाणादाण केली. इकडे औरंगजेब आपल्या जागीं कायम राहून जेथे जेथे भय दृष्टीस पडेल तेथे तेथे आपला हत्ती नेऊन आपल्या सैन्यास ईश्वरावर भरंवसा ठेवून लढण्या विषयीं धीर देत होता. त्यावेळीं युद्धाची मोठी गर्दी चालली असतां, राजा रूपसिंग याणें घोड्यावरून उडी टाकून औरंगजेब याच्या हत्तीचा तंग कापण्याचा उद्योग आरंभिला. त्याचा धीटपणा पाहून औरंगजेब संतुष्ट होऊन त्यास मारूं नको ह्मणून त्ये गर्दींत ही बोलला; परंतु त्याचा शब्द ऐकूं येण्याच्या पूर्वीं त्याचे तुकडे तुकडे होऊन तो पडला. पुढें लौकरच दारा याच्या हत्तीस बाण लागल्या मुळें तो खालीं उतरून घोड्यावर बसला. तेव्हां तो पडला असा लष्करांत पुकारा होऊन धांदल जाहली, आणि शेवटीं लष्करांत पळ सुटला. तो संध्या काळीं दोन हजार स्वारांसहित परत आग्र्यास जाऊन पोंचला. त्याचे फौजेंतून इतकेच बाकी राहिले, त्यांतही बहुत करून जखमी जाहले होते.

१३. इकडे युद्ध संपल्यावर औरंगजेब मुरादाजवळ गेला.

याचा हौदा तीरांनीं चहूंकडून फुललेला होता. त्याच्या तोंडाचें रक्त पुसून त्यास राज्य प्राप्त जाहलें ह्मणून औरंगजेबानें आपणास मोठा संतोष जाहला असें दाखविलें. पुढें तीन दिवसांनंतर ते उभयतां आग्र्यास पोंचले. नंतर कांहीं दिवसांनीं आपला बाप यास प्रतिबंधांत ठेवून त्याजवळ कोणाचा प्रवेश होऊं नये असा बंदोबस्त केल्यावर एके रात्रीस औरंगजेबानें मुराद यास पुष्कळ दारू पाजून तो उन्मत्त झाला असतां त्याचीं शस्त्रें काढून घेऊन त्यास हत्तीवर बसवून दिल्लीच्या किल्ल्यावर पाठवून दिला. नंतर लौकर आपण बादशाह जाहल्याची दवंडी पिटविली, आणि पुढें एक वर्षानें आपल्या नावाचा
इ० स० १६५९ शिक्का पाडून तक्तावर बसण्याचा समारंभ केला.

१४. यारीतीनें शाहाजहां याचें राज्य समाप्तीस गेल्यानंतर तो सात वर्षें पर्यंत प्रतिबंधांत जीवंत होता. त्याणें लहानपणीं बापाशीं विरोध केला होता, आणि त्यास ऐष आरामाची आवड होती, यामुळें तो गुणी पुरुष नव्हता असें वाचणारास कदाचित् वाटेल; परंतु राज्याच्या बंदोबस्तांत चांगले कामदार ठेवून त्यांजवर जरब राखण्यांत व प्रजेस सुख देण्यांत त्याची बरोबरी अकबरासही नाहीं असें निष्पक्षपात तवारीक लिहिणारांनीं ह्मटलें आहे. कोणी द्रव्यवान जाहला ह्मणून त्याचें द्रव्य सरकारांत लुटून आणिलें असें इतर राजांच्ये कारकिर्दीप्रमाणें शाहाजहांच्ये वेळेस कधीं घडलें नाहीं, आणि तो सर्व प्रजेला पुत्रवत् मानी असें कोणी युरोपियन ग्रंथकारानें लिहिलें आहे.

१५. शाहाजहांयास मोठमोठ्या इमारती बांधण्याची व शोभेची फार आवड होती. त्याणें दिल्ली एथे पूर्वींच्या शहरापेक्षां शोभायमान असा एक पुरा वसविला, त्यांत मोठ्यामोठ्या संगमरवरी दगडांच्या व सोनेरी घुमटांच्या अश्याहवेल्या बांधल्या होत्या, आणि रस्ते बांधून त्यांच्या कांठानें झाडें लावून बाजार वसविले होते. या इमारतींतील मोठी भव्य अशी एक मशीद त्याणें बांधलेली अद्यापि आहे; आणि आग्रा एथे त्याणें संगमरवरी पाषाणाचा बांधलेला जो ताज माहाल नामें वाडा आहे, तो बांधण्याचा खर्च किंवा त्याची शोभा किंवा कारागिरी यांचा विचार केला असतां त्या माहालाचे बरोबरीची इमारत पृथ्वींत कोठेही नाहीं, असें ह्मणण्यास चिंता नाहीं.

१६. शाहाजहां याणें माणिकें, पाचा, हिरे, नीळ, इत्यादि रत्नें करून खचित असें एक मयूरासन केलें होतें; तें पाहतांच त्याच्या दरबारांत नव्यानें जाणाराचे डोळे दिपत असत. त्यास सुमारानें साडेसाहा कोटि रुपये लागले असतील असें कोणी युरोपियन जवाहिऱ्यानें पाहून लिहिलें आहे. याशिवाय शाहाजहांचा लवाजमा व देणग्या व दरबारचा खर्च या प्रमाणेंच अतिशय असतां, व कंदहार व बल्क या स्वाऱ्यांचा खर्च बहुत जाहला असतां, व पगारदार दोन लक्ष स्वार नेहेमी चाकरीस असतां, त्याच्या राज्याचे अखेरीस चोवीस कोटि+ रुपये व सोनें वरु-

+ शाहाजहांच्या राज्याचा वसूल बत्तीस कोटि रुपये येत होता ह्मणजे इंग्रेजांच्या राज्यापेक्षां दाहा कोटि रुपये अधिक येत होते.

पें व जवाहीर हीं खजिन्यांत मनस्वी शिलक होतीं.

१७. शाहाजहां स्वभावानें भला व किंचित् भोळा असे. त्याणें आपल्या मुलांवर फार विश्वास ठेविल्यामुळें तो फसला गेला. त्याणें ३० वर्षें राज्य केलें. तो पदच्युत जाहला तेव्हां त्याच्या वयास ६७ वर्षें होतीं.

प्रकरण १२.

औरंगजेब बादषाह.

सन १६५८ पासून १७०७ पर्यंत.

१. औरंगजेब गादीवर बसल्यानंतर तो चार वर्षें पर्यंत त्याच्या भावांचा बंदोबस्त करण्याच्या उद्योगांत होता. त्याचा वडील भाऊ दारा हा लाहोराहून मुलतानाच्या वाटेनें गुजराथेंत जाऊन, तेथे आपणास बादषाह ह्मणवूं लागला, परंतु औरंगजेबानें जयपुराजवळ त्याचा पराजय केल्यामुळें तो गुजराथेंतून पळून सिंधेंत गेला. तेथील जुनच्या राजानें त्यास कैद करून औरंगजेबाकडे पाठविलें. त्यास पुढें लौकरच कैदेंत मारून त्याचें प्रेत शहरांतून हिंडविलें. त्याचा दुसरा भाऊ स्रुजा हा पंचवीस हजार स्वार व कांहीं तोफा घेऊन दिल्लीवर स्वारी करीत असतां, प्रयागाजवळ औरंगजेबानें त्याचा पराजय करून त्याच्या लष्करांतून ११४ तोफा व बहुत हत्ती हस्तगत केले. या लढाईंतून पळून गेल्यावर स्रुजा हा कांहीं दिवस पर्यंत बंगाल्यांत टिकाव धरून होता, व औरंगजेबाचा एक मुलगा थोडावेळ पर्यंत त्यास जाऊन मिळाला होता; परंतु पुढें तो शाहाजादा परत आपल्या बापाजवळ गेल्यावर स्रुजा यास आराकान प्रांताकडे पळून जाणें प्राप्त पडलें. तेथे तो व त्याच्या कुटुंबांतील माणसें हीं सर्व मारिलीं गेलीं. पुढें लौकरच त्याचा तिसरा भाऊ मुराद हा कैदेमध्यें असतां त्यावर कोणी हलक्या माणसानें फिर्याद केल्याचें निमित्त करून त्यास त्याणें ठार मारिलें, आणि मुराद याचा धाकटा मुलगा, आणि स्रुलेमान, व सफर, या नावाचे दारा याचे दोघे मुलगे ग्वालेरच्या किल्ल्यावर कैदेंत होते, त्यांस जीवदान देण्याचें औरंगजेबानें कबूल केलें असतां तेही थोडक्या दिवसांत नाहींसे जाहले.

२. नंतर औरंगजेब याणें बिकानीर एथील राजाचें पारिपत्य करून मीर जुमला यास फौजेसहित आसाम घेण्यास पाठविलें, परंतु तो हस्तगत जाहला नाहीं. तेथील राजानें खंडणी वगैरे देण्याचें मात्र कबूल केलें. त्या स्वारींतून परत आल्यावर तो मरण पावला. त्याच्या अधिकारावर औरंगजेबानें त्याचा मुलगा महंमद अमीन यास नेमलें.

३. यावेळेस मराठ्यांच्या राज्याचा मूळपुरुष शिवाजी हा १२५ कोश लांब कोंकण पट्टी व पुण्याचे उत्तरेपासून मिरजेपर्यंत मुलुक घेऊन ७००० स्वार व ५०००० पायदळ बाळगून होता, त्याचें पारिपत्य करण्याविषयीं विजापुरकरांचा उपाय थकला होता, आणि औरंगजेबानें दक्षिणेंतून दिल्लीस जाते वेळेस त्याजकडे जाहागिरी चालविण्या-

विषयीं वचन दिल्यासारखें केलें होतें.

४. पुढें शिवाजी व औरंगजेब यांमध्यें विरोध पडून बादशाहाच्या सुभेदार शाहिस्तखान औरंगाबादेस राहत होता तो व राजा जसवंतसिंग याउभयतांनीं येऊन पुणें घेतलें. त्यांवर रात्रीचे वेळेस शिवाजीनें आपल्या मावळे लोकांसहित सिंहगडाहून येऊन छापा घातला. पुढें शाहिस्तखानास बंगाल्याचें काम देऊन बादशाहानें आपला मुलगा मोअज्जीम यास दक्षि-
ई०स० १६६४ णेस पाठविलें. त्याचें कांहीं न चालतां शिवाजीनें सुरत लुटली. पुढें आपला बाप शाहाजी हा मेल्यावर, व त्याची जाहागीर तंजावर प्रांत हस्तगत झाल्यावर, त्याणें एक वेळ जाहाजांतून मलबारापर्यंत स्वारी करून बारसिलूर शहर लुटिलें. मक्केस जाणारीं यात्रेकऱ्यांचीं कित्येक जाहजें धरिलीं, आणि आपणास राजा ह्मणविण्याचा आरंभ करून आपल्या नावाचे शिक्के पाडिले. याप्रमाणें शिवाजीचा उत्कर्ष होत चाललेला पाहून औरंगजेबास क्रोध येऊन त्याणें जयसिंग व दिलीरखान, असे दोघे सरदार त्याच्या पारिपत्या करितां पाठविले. त्यांणीं त्याशीं सिंहगड वगैरे जागीं युद्ध केल्यावर शिवाजीनें थोड्या लोकांसहित जयसिंगाचे छावणींत जाऊन करार ठरविला, कीं कांहीं किल्ले शिवाय करून शिवाजीनें दरोबस्त मुलकाचा उपभोग करून बादशाहाची ताबेदारी कबूल करावी; बादशाहानें शिवाजीचा मुलगा संबाजी याच्या नावें पांच हजार स्वारांची सरदारी सांगावी; व बादशाहाच्यां प्रांतांतून जो वसूल येईल त्याची चौथाई द्यावी. असे करार त्याणें सांगून

पाठविले, ते सर्व चौथाई शिवाय बादशाहानें कबूल करून शिवाजीस पत्र पाठविलें. नंतर दोन हजार स्वार व आठ हजार पायदळ घेऊन त्याणें जयसिंगाबरोबर जाऊन विजापुरकरांशीं लढाई केली. पुढें औरंगजेबाचे मर्जीस्तव तो निवडक ५०० स्वार व १००० मावळे लोक बरोबर घेऊन दिल्लीस गेला, तेथे त्याचा बहुमान न करितां औरंगजेबानें त्यास प्रतिबंधांत ठेविल्याप्रमाणें केलें. तेणें करून त्यास वाईट वाटून तो युक्तीनें तेथून पळून आला. इकडे जयसिंग याणें कांहीं दिवस वि- ई०स० १६६६
जापुर घेण्याविषयीं यत्न केला, तो सिद्धीस न जातां तो जयसिंग मरण पावला. त्यानंतर औरंगजेबाकडून मोअज्जीम, व जसवंतसिंग, व दिलीरखान, हे तिघे दक्षिणेंतील कारभार करित असतां शिवाजीनें जसवंतसिंग यास अनुकूल करून घेऊन, त्याच्या द्वारें आणखी एकवेळ औरंगजेबाशीं स्नेह केला. तेवेळेस औरंगजेबानें शिवाजीचे सर्व अपराध क्षमा करून त्याचें जुनें राज्य त्याकडे चालवावें असें केलें, आणि त्यास आणखी ही कांहीं मुलुक दिला. १६६७

५. पुढें दोन वर्षें पर्यंत शिवाजीनें विजापुर व गोंवळकोंडें एथील संस्थानांकडून खंडणी घेण्याचा व आपल्या राज्याचा बंदोबस्त करण्याचा उद्योग केला. नंतर आपणास धरण्याविषयींची मसलत आहे, असें जाणून शिवाजीनें सिंहगड वगैरे किल्ले परत घेऊन सुरत शहर व खानदेश प्रांत लुटून मुलुकांतून चौथाई वसूल केली. हें पाहून औरंगजेबानें ४०,००० फौज देऊन मोहबतखान नामें सरदार पाठवि-

ला, त्याशीं शिवाजीनें युद्ध प्रसंग करून त्याचा केवळ पराजय
इ० स० १६७२ केला. नंतर या मुळें औरंगजेबानें मोहबतखान व मोअज्जी-
म ह्या उभयतांस परत बोलावून गुजराथच्या सुभेदार खा-
न जहां यास दक्षिणेंत पाठविला.

६. इतक्यांत काबुल एथे बंड होऊन तेथील सुभेदार या-
चा मोड जाहला. तिकडे औरंगजेबानें आपुला मुलगा सुल-
तान व दुसरे सरदार यांस पाठविलें, आणि तिकडे दोन व-
र्षें पर्यंत लढाई चालली; परंतु शेवटीं तेथील अफगाणलो-
कांचा बंदोबस्त पक्का नहोतां ती लढाई समाप्त करण्याचा
१६७५ प्रसंग आला.

७. पुढील वर्षीं सतनरामीनामें हिंदु बैराग्यानें दिल्ली-
जवळ मोठें बंड केलें, त्यांत त्याच्या किति एक हजार लोकां-
नीं निकरानें लढून बादशाही फौजेचा एकदोन वेळ मोड के-
ला. त्यामुळें त्याजवळ जादुगिरी आहे, असा लौकिक होऊ-
न बहुत जमीदार वगैरे लोक त्यास मिळाले. त्यापुढें बादशा-
ही फौज उभी राहीना, ह्मणून औरंगजेबानें कुराणांतील
वाक्यें कागदावर लिहून जरी पटक्यास बांधिलीं; आणि
त्याच्या किति एक सरदारांनीं लढण्याची पराकाष्ठा करून
१६७६ बंडवाल्यांचा मोड केला.

८. औरंगज़ेब याणें मुसलमान धर्माचा पक्ष धरून
आपल्ये हिंदु प्रजेस फार पीडा देण्याचें आरंभिलें होतें. हिं-
दूंच्या जत्रा भरूं नये. असा त्याणें हुकूम केला, व मुसलमा-
नांस ज़कात वगैरे माफ केली. ती मनाई हिंदु लोकांस के-

ली नाहीं. तसीच हिंदु लोकांस सरकार कामांत ठेवूं नये अशी स-
र्व कामदारांस आज्ञा पाठविली; आणि जजिया नामें शिर गणती-
चा कर त्यांजवर नवा बसविला. याणें करून सर्व प्रजा नाराज़ी
होत होती, इतक्यांत रजपुत संस्थानी लोकांस विषम वाटण्या-
स दुसरें एक कारण झालें.

९. तें असें कीं जोदपुरचा जसवंत सिंग हा काबुलास मर-
ण पावला. त्याची राणी व मुलें यांस बादशाहानें प्रतिबंधांत
ठेविलीं. तीं पुढें त्याच्या लोकांचा सरदार दुर्गादास याणें चो-
रून जोदपुरास पोंचतीं केलीं खरीं; परंतु बादशाहानें जोदपु-
रच्या संस्थानाशीं कपट केलें, व ज़जिया हा कर बसविला, या
कारणामुळें, उदेपुरचा राजा राजसिंग याणें जोदपुरचा प-
क्ष स्वीकारिला, आणि जजिया देण्याचें नाकबूल केलें. औरं-
गजेबानें स्वतः त्यांवर स्वारी करून त्याकडून जज्याच्या ऐव-
जीं पैका घेतला, आणि त्याणें जोदपुरचा अजित सिंग या-
स मदत करूं नये असा करार करून घेऊन आपण परत
दिल्लीस गेला. तो तेथें पोंचला नाहीं तों उदेपुरच्या राण्यानें
तह मोडला. असें वर्तमान समजून तो परत अजमीरास आ-
ला; आणि आपला मुलगा मोअज्जीम, यास दक्षिणेंतून व आ-
ज़िम, यास बंगाल्यांतून आणवून त्याणें उदेपुरच्या राण्यास
आपली राजधानी सोडण्याचें व पाहाडांत जाऊन राहण्याचें
प्राप्त केलें. नंतर त्यास दाणा पाणी मिळूं नये ह्मणून गांव जा-
ळावे, व झाडें तोडावीं, व रजपुतांचीं बायका मुलें धरून न्या-
वीं असा उद्योग त्याणीं आरंभिला; तेणें करून कांहीं वेळ

पर्यंत रजपुत नम्र जाहले खरे; परंतु अशा त्यांच्या कृत्यांमुळें, व औरंगजेबाच्या धर्माभिमानामुळें, त्यांची दिल्लीच्या दरबारावरून भक्ति जी उडाली ती पुनः कधीं बसली नाहीं. आणि पूर्वीप्रमाणें बादशाहास कुमक करावयाची सोडून त्यांणीं इतःपर द्वेष करण्याचें आरंभिलें.

१०. औरंगजेबाबरोबर ओदपुरचे २५००० राहटोर स्वार व पायदळ यांसहित रजपुत लोक लढून त्यास हैराण करीत असतां पूर्वी लिहिलेल्या दुर्गादासानें एकाएकीं त्याचा सर्वांहून लहान मुलगा अकबर यास फितूर करून त्यासच बादशाह असा किताब दिला, आणि पुढें कितिएक मोठे मोठे सरदार, व ७०,००० लष्कर जमवून बादशाहाशीं उघड लढाई करण्याचा उद्योग आरंभिला. परंतु तो सिद्धीस न जातां अकबराचा मुख्य सरदार तोहवरखान, व आणखी लष्करांतील कितिएक लोक फितूर होऊन औरंगजेबाकडेस गेले, व तोहवरखान, यास औरंगजेबानें ठार मारिलें. या दहशती मुळें सर्व लष्कराची फाटाफुट होऊन अकबर गुजराथच्या पाहाडामध्यें कितिएक दिवस लपून राहिला. शेवटीं दुर्गादास व त्याचे इमानी ५०० रजपुत यांसह वर्त्तमान कोंकणांतून जाऊन त्याणें शिवाजीचा आश्रय केला.

११. इकडे रजपुतांशीं लढाई चाललीच होती, तिजमध्यें मुसलमानांनीं फार क्रूर कर्मे करून रजपुतांस जेरीस आणिलें. तसेंच त्या द्वेषानें रजपुतांनींही मशीदी लुटल्या, कुराणें जाळलीं, आणि मुल्ले लोकांच्या अप्रतिष्ठा केल्या. शेवटीं

उभय पक्षीं लढाईचा कंटाळा येऊन तह जाहला. त्यांत जोदपुरचा अजितसिंग हा मोठा होईल त्यावेळीं त्याचा मुलुक त्यास परत द्यावा व उदेपुरच्या राण्यानें अकबरास मदत केली ह्मणून त्याणें आपल्या मुलुकापैकीं कांहीं मुलुक परत द्यावा असें ठरलें.

१२. या लढाईत औरंगजेब गुंतला असतां इकडे शिवाजीनें कोंकण पट्टी, व घांटमाथ्यावरील कृष्णे पर्यंत मुलुक हस्तगत केला; आपणास रायगड एथे राज्याभिषेक करून घेतला; व नर्मदे पलीकडे वराड प्रांतांत एकवेळ स्वारी करून मोगलांस भयप्रदर्शन केलें (इ. स. १६७५). नंतर गोंवळकोंड्याच्या बादशाहाशीं स्नेह करून त्याच्या मुलकांतून तीस हजार स्वार व चाळीस हजार पायदळासहित तो कर्नोल एथे कृष्णा उतरला (इ. स. १६७७). तेथून त्याणें कडप्याच्या वाटेनें कर्नाटकांत जाऊन जंजी, वेलूर, आर्णी, वगैरे किल्ले घेऊन त्या प्रांतांतील आपल्या बापाच्या वेळची सर्व जाहागीर परत घेतली, आणि तिचा उपभोग आपला धाकटा भाऊ वेंकाजी याणें करून, निमे वसूल आपणास द्यावा असा ठराव केला. तिकडून परत येतानां त्याणें बल्लारी, आद्वानी. हे प्रांत घेतले. ती स्वारी करून तो १८ महिन्यांनीं परत रायगडास आला (इ. स. १६७८). पुढें औरंगजेबाचा सरदार दिलीरखान याणें विजापुरास वेढा दिल्यामुळें तेथील कारभाऱ्यांनीं शिवाजीस कुमकेस बोलाविलें; परंतु शिवाजीचा मुलगा संभाजी हा दिलीरखानाच्या लष्करांत उठून गेल्यामुळें

शिवाजीस कांहीं वेळ पर्यंत काय करावें ह्मणून विचार पड-
ला. पुढें थोडक्याच वेळानें औरंगजेबाच्ये आज्ञेवरून सं-
बाजीस दिलीरखान याणें परत पाठविल्यावर शिवाजी-
नें विजापुरकरांस मदत करून दिलीरखानास उठवून ला-
विलें. याचाकरीबद्दल तुंगभद्रा व कृष्णा यांमधील मुलु-
इ. स. १६८० क त्यास मिळाला. पुढें लौकरच तो मरण पावला.

१३. शिवाजीच्यामागें त्याचा मुलगा संबाजी गादीवर ब-
सला. त्याणें कांहीं दिवस पर्यंत जंजिरा एथील शिद्दी याशीं
लढाईमध्यें गुंतून घांटावर मुलुकामध्यें अव्यवस्था होऊं
दिली; आणि पूर्वीच्या द्वेषावरून शिवाजीचे विश्वासु मस-
लत सांगणार व सरदार होते त्यांतून कितिएकांस ठार
मारिले. तसेंच कलुषानामें कोणी हिंदुस्थानी ब्राह्मणा-
च्या नादास लागून त्याणें व्यसना कडे बहुत पैका खर्च
केला.

१४. इतक्यांत औरंगजेब रजपुत राजांशीं तह करू-
१६८३ न दक्षिणेंतील संस्थानें घेण्याकरितां बऱ्हाणपुरास आला.
तेथून त्याणें आपला मुलगा अजीम यास फौज देऊन चांद-
वडाच्या डोंगरांनजीक मुलुक घेण्यास पाठविलें, आणि दु-
सरा मुलगा मोअज्जीम यास ४०,००० स्वार देऊन कोंक-
१६८४ णांत रवाना केलें. त्ये फौजेस संबाजीनें दाणा पाण्याचा
तोटा पाडल्यामुळें बहुत करून सर्व फौज खराब होऊन
शेवटीं मोअज्जीम थोड्या लोकांसहित कृष्णेच्या कांठीं
वाळवें एथे येऊन राहिला. तेथे कांहीं रोग उत्पन्न होऊन

त्याच्ये राहिलेल्ये फौजेचा फार नाश जाहला.

१५. पुढील वर्षी अजीम याणें विजापुरावर हल्ला केला, आ-
णि त्याच्ये कुमकेस मागून औरंगजेबही तिकडे गेला. मोअज्जी-
म याणें गोंवळकोंडें एथील बादशाह अबुलहसन यावर स्वा-
री केली. त्याचा सेनापति इब्राहिमखान हा फितूर होऊन त्या-
जकडे आल्यावर त्या संस्थानचा फडणीस मदनपंत हा शह-
रांत बखेडा होऊन मारला गेला. नंतर तो मोअज्जीम तीन दिव-
स पर्यंत हैदराबाद लुटून बादशाहाकडून पुष्कळ पैका घेऊन त्या-
शीं तह करून परत गेला. इकडे औरंगजेब विजापुरास वेढा
घालून आंतील लोकांस दाणा पाण्याचा तोटा पाडून लौकर-
च किल्ल्याचा तट फोडून आंत शिरला, आणि तेथील अल्प-
वयी बादशाह यास कैद करून त्या राज्याची समाप्ति करिता
झाला. गोंवळकोंड्याशीं जो पूर्वी तह जाहला होता तो ही नं-
तर लौकर मोडून यात्रेस जाण्याच्या मिषानें औरंगजेबानें फौजे-
सहित तिकडे स्वारी केली. प्रथम त्याणें त्या राजाकडून पुष्कळ
जवाहिर व द्रव्य घेऊन नंतर त्याचे कारभारी व फौज फितूर के-
ली. आणि तो काफर लोकांस आश्रय देतो असा जाहिरनामा
लावून शहरास वेढा दिला. तथापि अबुल हसन याणें सात म-
हिने पर्यंत टिकाव धरिला. शेवटीं फितुरानें गोंवळकोंडें हस्त-
गत होऊन तेथील राज्याची समाप्ति जाहली. नंतर थोडक्या-
च काळांत औरंगजेबानें मराठे व विजापुरकर व गोंवळकोंडे- इ० स०
कर यांचा तंजावर पर्यंत मुलुक घेतला. १६८८

१६. याच्या पूर्वी औरंगजेबाचा मुलगा अकबर संबाजी

जवळ येऊन राहिला होता, परंतु तो त्याची अव्यवस्था पाहून इरा-
णास निघून गेला. पुढें घांटावरील बहुत करून मुलुक मोगलां-
च्या स्वाधीन झाला. शेवटीं संबाजी कोंकणांत संगमेश्वर एथे
असतां औरंगजेबाच्या सरदार तुकारब खान याणें एका एकीं
त्यावर स्वारी करून त्यास धरून औरंगजेबाकडे पाठविलें. त्या-
स औरंगजेबानें मुसलमान होण्याविषयीं सांगीतलें तेव्हां
औरंगजेबास व त्याच्या पेगंबरास तो फार दुरुत्तरें बोलिला.
त्यावरून औरंगजेबानें त्याचे डोळे फोडून जीभ काढून त्या-
इ. स. १६८९ च्या मित्र कलुषा यासहवर्त्तमान त्याचा शिरछेद करविला.

१७. संबाजी मेल्यावर मोगलांनीं लौकरच फितुरानें रायगड
किल्ला घेतला. त्यांत त्याचा मुलगा शाहु मोगलांच्या हस्तगत
झाला. तेवेळीं त्याचा चुलता राजाराम याणें त्याच्या नावानें
कारभार करावा असें ठरवून त्याच्या जिवाचें संरक्षण होण्या
करितां त्यास कर्नाटकांत जंजी एथे पाठविलें. हें वर्त्तमान औ-
रंगजेबास समजल्यावर त्याणें तो किल्ला घेण्याकरितां झु-
ल्फिकार खान सैन्यासहित तिकडे रवाना केला, परंतु तो ते-
थे गेल्यावर किल्ल्यास घेरा देण्यापुरती फौज त्याजवळ न-
सल्यामुळें त्याचें कांहीं चाललें नाहीं. इकडे राजाराम या-
च्या हुकुमावरून त्याचे सरदार संताजी घोरपडे व धनाजी
आधव व सातारा एथील कारभारी रामचंद्र पंत व दुसरे म-
राठे सरदार. हे मुलुख लुटून चौथ व घांसदाणा यांबद्दल
१६९२ खंडण्या घेऊं लागले. त्यांणीं जिकडे तिकडे मुलकांत लूट
करून औरंगजेबाचा खजिना हिंदुस्थानांत जात असतां

तो त्यांणीं कित्तिएक वेळ हस्तगत केला. यामुळें औरंगजे-
बानें आपला मुलगा कामबक्ष हा विजापुरापलीकडे वाकिन
खेड किल्ला घेण्याच्या उद्योगांत होता, तेथून त्यास जंजीवर
रवाना केला. त्याच्या बरोबर झुल्फिकार खान याचा बाप अ- इ. स. १६९२
सदखान नामें सरदारास दिला. तो झुल्फिकार खान व का- १६९४
मबक्ष या उभयतांमध्यें कांहीं वैमनस्य पडलें. इतक्यांत
संताजी घोरपडा व धनाजी जाधव या उभयतांनीं निवड-
क वीस हजार मराठे स्वारांसहित कर्नाटकांत जाऊन मो-
गलांच्या लष्करास दाणा पाण्याचा तोटा पाडून, औरंगजे-
ब मेल्याचें वर्त्तमान उठविलें, आणि कामबक्ष याशीं कां- १६९७
हीं स्नेहाचें बोलणें लाविलें. तें झुल्फिकार खानास कळ-
ल्यावर, त्याणें कामबक्ष यास प्रतिबंधांत ठेविलें. तें वर्त्त-
मान लष्करांत प्रसिद्ध होतांच लोकांनीं आपले मोर्चे सोडू-
न देऊन वेढा उठविला. नंतर मराठ्यांच्या लष्करानें उलटा
त्यांस घेरा घातला; आणि पुढें मोगलांच्या लष्करानें जंव-
ळ वंदिवाश नामें खेडें आहे तेथे औरंगजेबाचा हुकुम ये-
ई पर्यंत राहावें असा करार ठरला.

१८. औरंगजेब दक्षिणेकडेस आल्यावर प्रथम कांहीं
वेळ पर्यंत कृष्णेच्या कांठीं गलगल्यास होता. तेथून पंढ-
रपुराजवळ ब्रह्मपुरीस कायम छावणी घालून असतां
दक्षिणेंतील वर्त्तमान कळल्यावर त्याणें कामबक्ष व अस-
दखान यांस परत बोलाविलें. नंतर झुल्फिकार खानं या
णें कांहीं दिवस पर्यंत मराठ्या सरदारांशीं युद्ध करून शे-

वरीं जंजी किल्ला घेतला. परंतु आंतून त्याचा व राजारामाचा स्नेह होता, ह्मणून त्याणें राजारामास पूर्वीं सूचना केल्या (इ. स. १६९८) वरून तो किल्ला घेण्याच्या पूर्वीं तेथून निघून गेला होता.

१९. राजारामानें कर्नाटकांतून आल्यावर सातारा एथे आपली राजधानी करून आपण स्वतां गोदावरी पलीकडे जालने पर्यंत चौथाईचा वसूल घेतला. त्यावेळीं औरंगजेबानें ब्रह्मपुरीहून निघून किल्ले घेण्यास आरंभ केला. त्यांत परळी, सातारा, केळणा, इत्यादि किल्ल्यांवरच्या लोकांनीं फार वेळ टिकाव धरून मोठ्या कौशल्यानें त्यांचें संरक्षण केलें. त्यामुळें औरंगज़ेबास जागोजागीं फार मेहेनत पडली. इतक्यांत राजाराम मरण पावला. त्याच्ये जागीं त्याचा मुलगा शिवाजी यास गादीवर बसवून त्याची बायको ताराबाई कारभार करूं लागली. तिच्ये वेळेस मराठे सरदारानीं किति एक किल्ले मोंगलांपासून परत घेतले, आणि औरंगजेबास जाट व रजपुत या लोकांचें पारिपत्य करण्याकरितां कांहीं फौज तिकडे पाठवावी लागली. त्यामुळें जसजसी त्याची फौज कमी होत चालली तसतसें मराठ्यांचें सैन्य अधिक जमत चाललें. मोगलांच्या सैन्याची हिंमत खचली; मुलुक ओसाड पडल्यामुळें ओझ्याचीं जनावरें मिळेनात; दाणावैरणीचा तोटा पडूं लागला; व हिंदुस्थानांतून खजिना बहुत येत असतां द्रव्याचा तोटा पडून लष्कराची तलब चढून शिपायी अडून बसूं लागले. त्यामुळें पुढें काय करावें,

तें बादषाहास सूचेनासें जाहलें. इकडे मराठ्यांनीं छावणी लुटण्याचें व गुरें वळून नेण्याचें आरंभिलें. त्यांवर फौजेंतील सुमाराची टोळी गेली असतां तिला मारून पराजय करावा, मोठें लष्कर आलें असतां आपण नाहींसें होऊन दूरचा एकादा गांव लुटावा; तिकडे मोगलांनीं जावें तों आपण दुसरेच कडे उमटावें; असा क्रम त्यांणीं आरंभिला; आणि ते औरंगजेबाची कांहीं खातर बाळगीनात असे जाहले. त्यास औरंगजेबाच्या लष्करांतील लोकही जाऊन मिळूं लागले. अश्या प्रसंगीं औरंगजेबानें मराठ्यांशीं तहाचें बोलणें लाविलें. तें जर ते ऐकते तर त्याणें शाहूस सोडून चौथाई वगैरे कबूल केली असती; परंतु त्यांचें मागणें फार पाहून औरंगजेब आंपल्या लष्करासहित निघून मराठ्यांचें सैन्य मागून पाठलाग करित व फौजेचा संहार करित असतां अहंमदनगरास पोंचला. पुढें कांहीं दिवसीं तो मरण पावला. तेवेळीं त्याच्या वयास ८९ वर्षें होतीं (इ. स. १७०७ फेब्रुआरी ता॥ ३१).

२०. औरंगजेबामध्यें शौर्य, व युद्धकौशल्य, आणि श्रमसहन करण्याचें सामर्थ्य हीं पराकाष्ठेचीं होतीं. कसाही प्रसंग आला तथापि तो धैर्य सोडीत नसे. त्याचा उद्योगही अतिशय होता. इकडे एका प्रांतांत युद्ध चाललें असतां दूरदूरच्या प्रदेशांतील बंडांचा बंदोबस्त करण्याविषयीं, अथवा तेथील कारभाराची व्यवस्था राखण्याविषयीं तो हुकूम लिहिण्यास अवकाश लावित नसे; व लहान मोठे सर्व कामदार आपण नेमून त्यांच्या करण्याची चौकशी राखित असे; परंतु अशी फार

चौकशी राखण्यामुळें व सरदारांजवळ चोरखातमीदार वगैरे ठेवून त्यांचा सर्वकाळ अविश्वास धरल्यामुळें ते कामदार मनापासून त्याची चाकरी करीत नसत. त्याणें हिंदु धर्मास फार उपद्रव केल्यामुळें प्रजांची प्रीति त्यावर नसे. त्यास आपल्या धर्माचा अभिमान होता, आणि त्यामुळें त्यावर ईश्वराची कृपा होती असें मुसलमान मानित खरे; परंतु त्याचा स्वभाव कपटी फार ह्मणून आपला मतलब साध्य होण्याचा समय आला असतां तो विश्वास घात करण्याविषयीं अनमान करित नसे, याचीं उदाहरणें पूर्वीं लिहिण्यांत आलींच आहेत; ह्मणून तो कशींही संकटें आलीं तरी त्यांतून निभावत असे.

२९. त्यास कोणी युरोपियनानें ७८ व्या वर्षीं पाहिला, त्याणें लिहिलें आहे कीं त्याची आकृति लंहान सड पातळ होती; व त्याचें नाक लांब व दाढी पिकलेली होती. तो पांढरा मलमलीच्या पोषाक घालून, उमराव लोकांमध्यें काठी टेंकून उभा राही, लोकांच्या अर्ज्या घेऊन उपनेत्रावांचून वाची, त्यांवर आपल्या हातानें शेरे लिही; आणि नेहेमी हंसत मुख असे.

प्रकरण १३.

बाहादुर शाह आणि फरुखशीर.

सन १७०८ पासून सन १७२० पर्यंत.

१. औरंगजेब मेल्यावर त्याच्या उंशाखालीं एक व्यवस्था पत्र सांपडलें त्यांत असें लिहिलें होतें कीं राज्यांतील पूर्वेकडचे, व उत्तरेकडचे, प्रांत मोअज्जीम याणें घेऊन दिल्ली एथे राज्य करावें; आणि दक्षिणेकडील, व नैर्ऋत्येकडील, मुलुक आजीम याणें घेऊन आग्रा एथे राज्य करावें; व दक्षिणेंतील विजापुर वगैरे प्रांत कामबक्स याणें घ्यावे. अशी व्यवस्था औरंगजेब यांणें लिहून ठेविली असतां, ती एकीकडे ठेवून, तो मेल्यावर आजीम आपणास सर्व हिंदुस्थानचा बादशाह ह्मणवूं लागला. परंतु मोअज्जीम याणें प्रथम काबुल एथील गादीवर बसून पुढें थोड्या वेळानें पुष्कळ फोज जमवून आजीम यावर स्वारी केली. त्या वेळीं त्या उभयतांचें मोठें युद्ध होऊन आजीम याच्या सैन्याचा पराजय जाहला; आणि तोव त्याचे दोघे प्रौढ मुलगे हे मारिले गेले. नंतर मोअज्जीम बाहादुरषाह हा किताब धारण करून गादीवर बसला; आणि असदखान, व त्याचा मुलगा झुल्फिकारखान तसेच आजीम याचे जे कोणी इष्ट सरदार होते, त्यांस मोठे मोठे अधिकार देता जाहला. याणें मनीमखान नामें सरदार आपला वजीर केला.

२. औरंगजेब याचा तिसरा मुलगा कामबक्स यास द-

क्षिणेंतील अधिकार प्राप्त जाहला होता. तो बाहादुरषाह या-
चें स्वामित्व कबूल करीना, ह्मणून बादषाहानें त्याजवर स्वारी
करून त्याउभयतांचें हैदराबादेजवळ युद्ध जाहलें. त्यामध्यें
कामबक्ष याचा पराभव होऊन त्यास जखमा लागल्या, त्यां-
इ.स. १७०९ हींकरून तो त्याच दिवसीं मरण पावला (फेब्रुआरी).

३. आजीम याणें आपल्या भावावर स्वारी करावया-
च्या पूर्वीं शाहूस दक्षिणेंत पाठविला होता. त्याचा आणि
ताराबाईच्या पक्षाच्या सरदारांचा कांहींवेळ कलह होऊन
शेवटीं मराठ्यांच्या राज्याची गादी शाहूस प्राप्त जाहली. द-
क्षिणेंतील सुभेदार झुल्फिकारखान याचा मुतालिक दा-
उदखान पन्नी याणें मोगलांचे तर्फेनें शाहूचा चौथाईचा
हक्क कबूल केला; आणि तो आपल्या कामदारांनीं वसूल
करून शाहूस द्यावा, असें ठरविलें.

४. बाहादुरषाह याणें परत हिंदुस्थानांत जातेवेळेस
रजपुत संस्थानांशीं तह ठरविला. त्यांतील मुख्य कलमें
अशीकीं मोगलांनीं घेतलेला मुलुक परत द्यावा, त्यांच्या
पतकानिशीं चाकरी करण्याचें माफ करावें, व धर्मसंबंधें
सर्व वहिवाट अकबराच्ये कारकिर्दीप्रमाणें असावी. या
करारा प्रमाणें उदेपुरचा राणा व ओदपुरचा अजितसिं-
ग, व जयपुरचा जयसिंग, हे मोगलांचे ताबेदार इतकें
नाव मात्र बाळगून सर्व स्वतंत्रपणानें वागूं लागले.

५. याप्रमाणें रजपुतराजांशीं तह करण्याचें बादषा-
हास अगत्य पडण्याचें कारण असें कीं, शीक लोकांचा

धर्मप्रवर्तक नानक यापासून दाहावा गुरु हरगोविंद, याचा नातू
गुरुगोविंद याणें कितिएक किल्ले घेऊन आपलें संस्थान प्रबळ
करण्याचा उद्योग आरंभिला. (इ.स. १६७५). त्यावेळीं मुसल
मानास तें असाध्य होऊन त्याचे किल्ले त्यांणीं परत घेतले. आणि
त्याची आई व मुलें यांस ठार मारून त्याच्या लोकांस चोहोंकडे
पळविलें. नंतर तो दक्षिणेमध्यें हिंडत असतां नांदेड एथे मारिला
गेला. त्यानंतर बंधु नामें कोणी गुरु जाहला. त्याणें मुसलमा-
नांच्या धर्माचा व राज्याचा मोड करण्याचे मसलतीनें मशीदी
फोडिल्या; मुल्ले लोक मारले; व लहान, मोठा, स्त्री, किंवा बाल,
हें नपाहतां सर्व मुसलमानांचा संहार करून सतलज, व यमु-
ना, यांच्या कांठच्या प्रदेशांत आपला अंमल बसविला. दुस-
ऱ्ये स्वारींत एकीकडे लाहोर व एकीकडे दिल्ली पर्यंत मुलुक उ-
द्ध्वस्त केला. त्यांच्या पारिपत्यास आण्याकरितां बाहादुरषाह
याणें रजपुत लोकांशीं तह केला. नंतर त्यावर स्वारी करून शि-
कांस प्रथम आपल्ये हद्दींतून पिटून लाविलें, आणि पुढें बंधु या-
स एका किल्ल्यांत घेरून दाणा पाण्याचा तोटा पाडिला. तेवेळीं
किल्लेकरी लोक जिवावर उदार होऊन बाहेर पडले, त्यांतून बहु-
त मारिले गेले. ते गर्दींत बंधु पळाला; आणि त्याच्यासारिखा
कोणी शीक जाहलेला हिंदु मोगलांच्या हातीं सांपडला. तें कृ-
त्रिम त्यांस समजल्यावर त्याला लोखंडाच्या सांपळ्यांत घा-
लून दिल्लीस पाठविलें.

६. हा जय जाहल्यानंतर बाहादुरषाह लाहोरास निघून
गेला. तथे तो कांहीं वेळानें मरण पावला. ते वेळेस त्याच्या इ.स. १७१२

वयास ७१ वर्षें होतीं.

७. त्याच्या मुलांत परस्पर कलह होऊन दोघेही मेल्यावर
जहांदार बादषाह गादीवर बसला. त्याणें झुल्फिकार खान
यास वजीर करून आठमहिने पर्यंत राज्य केलें. तितक्यांत दु-
राचरणें करून आपली अप्रतिष्ठा करून घेतली. शेवटीं त्या-
चा पुतण्या फरुकशीर नामें बंगाल्यांत होता, त्याणें बंड करू-
न बादषाहाचे सत्तर हजार फौजेचा आग्र्याजवळ पराभव
केला. तो तेथून दिल्लीस पळून गेल्यावर झुल्फिकार खानव
त्याचा बाप असदखान या उभयतांनीं विश्वासघात करून
त्यास कैद केलें, आणि फरुकशीर हा येतांच तो त्याच्या स्वाधीन
केला. फरुकशीरानें असदखान यास जीवदान दिलें. परंतु
झुल्फिकार खान याच्या विश्वासघाताचें त्यास देहांत पारि-
इ.स. १७१३ पत्य करून पुढें जहांदार षाह यासही ठार मारिलें.

८. फरुकशीर, यास तक्त प्राप्त होण्याविषयीं हुसेन अ-
ल्ली, व अबदुल्लाखान नामें दोघां सरदारांनीं फार साहित्य
केलें होतें. त्यांणींच, हा बादषाह सात वर्षें पर्यंत राज्य करी-
त असतां सर्व कारभार केला. शेवटीं बादषाहाची कृपा रु-
कनुद्दौला नामें कोणी सरदारावर झालेली पाहून हुसेनअ-
ल्ली याणें दक्षिणेंतून बाळाजी विश्वनाथ, याचे दाहा हजार
मराठे लोक आणिले, व त्यांचे मदतीनें फरुकशीर यास प-
१७१९ दस्तुत करून त्याचा प्राण घेतला. (फेब्रुआरी).

९. हे दोघे बंधु, सय्यद, या नामानें प्रसिद्ध आहेत.

१०. या राज्याच्या आरंभीं हुसेन अल्ली याणें जाऊन, मा-

रवाडचा राजा अजित सिंग, याशीं तह केला; व त्याणें आप-
ला मुलगा दिल्लीस पाठवावा, आणि आपली मुलगी बादषा-
हास द्यावी, याप्रमाणें करार ठरविला. या राज्यांतच शिकां-
चा सरदार बंधु यास कैद करून, त्यांचा ७४० लोकांसह व-
र्तमान त्यास दिल्लीमध्यें फार अप्रतिष्ठा करून ठार मारि-
लें. त्या लोकांचे शिरच्छेद सात दिवस पर्यंत चालले हो-
ते. दक्षिणेच्या बंदोबस्ताकरितां हुसेन अल्ली याणें येऊन
दाउदखान पन्नी याचा पराजय केला. तो युद्धांत पडला.
नंतर चिन किलिच खान, ह्मणजे ज्यास पुढें निजामुल्मुलु-
क ह्मणूं लागले, व जो हैदराबादच्या नबाबांचा मूळ पुरुष,
तो सरदार कांहीं दिवस पर्यंत दक्षिणेच्या अधिकारावर
होता. नंतर हुसेन अल्ली हा दक्षिणेंत आल्यावर, त्याणें कां-
हीं दिवस पर्यंत लढाई चालवून शेवटीं शाहूशीं तह केला.
तो असा कीं मराठ्यांनीं जितका मुलुक जिंकून घेतला होता
तितका मुलुक व किल्ले त्यांणीं घ्यावे; व चौथाई आणि शिवा-
य दुसरी सरदेशमुखी नामें बाब ह्मणजे ऐन वसूलाचा द-
शांश त्यांस द्यावा; व याबद्दल शाहूनें पंधरा लाख रुपये
सालीना खंडणी देऊन १५००० स्वारांसहित चाकरी क-
रावी, आणि कोठूनही चोरावें झाल्यास त्याचा जाब क-
रावा.

प्रकरण १४.

महंमदषाह.

सन १७१९ पासून सन १७३९ पर्यंत.

१. फरुकशीर मेल्यानंतर सय्यद यांणीं एका मुलास र-
फिउद्दर्जात हा किताब देऊन गादीवर बसविलें; आणि तो क्ष-
य होऊन मेल्यावर रफिउद्दवला या नावानें दुसऱ्या एका अ-
ज्ञान मुलास बादषाह पद दिलें. तोही थोड्याच महिन्यांत
मरण पावला. शेवटीं रोशन अख्तर यास महंमदषाह अ-
इ. स. १७१९ सा किताब देऊन राज्याचा अधिकार दिला. (सप्तेंबर).

२. महंमद षाह गादीवर बसल्यांपासून दोन महिन्यां-
च्या आंत उभयतां सय्यद मारिले गेले. नंतर बादषाहानें
महंमद अमीन नामें प्रधान नेमिला, तो लौकरच मेल्या-
वर असोफजा ह्मणजे चिन किलिचखान यास तो अधिका-
र दिला. परंतु त्याला बादषाहाचा स्वभाव न आवडून तो तें
१७२२ काम सोडून दक्षिणेच्या सुभ्यास निघून गेला.

३. ते वेळे पासून सुमारें पंधरा वर्षे पर्यंत मराठे आ-
णि असोफजा यांच्या परस्परांस बुडवावयाच्या मसलती
चालल्या होत्या. त्या उभयतांनीं परस्परांशीं कलह करून
निर्बळ व्हावें ही बादषाहाची इच्छा होती खरी; तथापि त्यां-
चा मोड करण्यास प्रयत्न करण्या विषयीं त्यास विशेष
सामर्थ्य नव्हतें, आणि त्याचें चित्त ऐष आरामांत फार
होतें, या मुळें मराठे व असोफजा यांच्या कृति तो स्वस्थ-

पणीं पाहत होता. बाळाजी विश्वनाथ पेशवा याचा मुलगा बा-
जीराव हा युद्धाच्या कामांत व मसलतींत फार प्रवीण होता.
त्याचा प्रतिस्पर्धी जो असोफजा याणें प्रतिनिधि व शाहु यां-
स अनुकूळ करून घेण्या विषयीं प्रयत्न केला. नंतर त्याणें
शाहु आणि संबाजी या उभयतां बंधूंमध्यें मत्सर उत्पन्न कर-
ण्याची खटपट करून पाहिली, व खंडेराव दाभाडा पेशव्या-
च्या पारिपत्या करितां उठविला; परंतु बाजीराव याणें या मस-
लती चालूं न देतां दाभाडा याचा गुजराथेंत पराजय केला. त्या
लढाईंत दाभाडा मारला गेला. बाजीराव याणें गायकवाड, इ. स. १७३१
शिंदे, व पंवार, या तीन कुळांचे मूळ पुरुष जे पिलाजी, राणो-
जी, आणि उधवजी यांचे मदतीनें गुजराथ व माळवा या
प्रांतांतून चौथ, सरदेशमुखी, व खंडणी घेतली; गुजराथ-
चा सुभेदार अभिसिंग यास तेथून काढून देऊन त्या प्रांतांत
पिलाजी गायकवाड सत्ता करूं लागला; विद्या आणि शास्त्रें
यांचें फार व्यसन बाळगणारा जो जयसिंग तो माळव्याचा
सुभेदार असतां, त्याणें तो प्रांत मराठ्यांच्या स्वाधीन केला.
या प्रमाणेंच बुंदेलखंड प्रांतही तेथील राजानें मराठ्यांस दि-
ला. १७३४

४. बाजीरावाची मसलत अशी होती कीं मुसलमानांचें मू-
ळच उपटून टाकावें, ह्मणजे फांद्या आपोआप गळतील. अ-
शा विचारानें माळवा प्रांत आणि चंबळा नदीचे दक्षिणेकडील
सर्व प्रांत हे आपणास जाहागीर द्यावे व मथुरा, प्रयाग, आ-
णि काशी हीं क्षेत्रें आपल्या स्वाधीन करावीं, हें बोलणें बोल-

ण्याकरितां त्याणें दिल्लीवर स्वारी केली. त्यावर असोफजा व अयोध्येच्या नवाबांच्या वंशाचा मूळ पुरुष सादतखान हे मोठी सेना घेऊन आले. त्यावर्षी बाजीराव दक्षिणेंत परत आला, परंतु पर्जन्यकाळानंतर ८०,००० फौजेसहित पुनः तो हिंदुस्थानांत जात असतां भूपाळ शहराजवळ तो व असोफजा यांच्या लढायां+ होऊन असोफजा याचा मराठ्यांपुढें निरुपाय झाला. त्यामुळें नर्मदा व चंबळा या नद्यांच्या मधला मुलुक व शिवाय पन्नास लक्ष रुपये बादशाहाकडून देववितों असा करार करून असोफजा हा दिल्लीस गेला. तो करार कायम होण्याच्या पूर्वीं दिल्लींत एक मोठा अनर्थ घडला तें व-
इ.स. १७३८ र्तमान असें.

५. इराणचा सफी वंशाचा बादशाह हुसेन यास पदच्युत करून महमूद नामें कोणी घिलजी सरदार इस्पाहान एथें गादीवर बसला. तो मेल्यावर त्याचा पुतण्या अशरिफ राज्य करीत असतां हुसेन याचा पुत्र तहमस्प यास नादिर कुली खान नामें सरदार मदतीस मिळाला. त्याणें इराणी लोकांस उमेद व धीर देऊन घिलजी व अबदल्ली यांचा पराजय केला, आणि तहमस्प यास गादीवर बसविलें. परंतु पुढें लौकरच त्यास रयत राजी नाहीं या निमित्तानें त्याणें गादीवरून काढून त्याचा अज्ञान मुलगा राजा केला. नंतर तुर्क व रशिअन यांणीं इराणचें राज्य वांटून घेण्याच्या हेतूनें त्यांतून

+ यालढायांची व मराठ्यांच्या लढायांचीं वर्तमानें मराठ्यांच्या बखरींत बाराव्यापासून पंधराव्या भागापर्यंत सविस्तर लिहिलीं आहेत, ह्मणोन एथें त्यांचा तपशील लिहिला नाहीं.

जो कांहीं मुलुक घेतला होता तो सर्व त्याणें परत हस्तगत केला. त्यावेळेस त्याणें राज्यांतील मोठ मोठे मानकरी, व सरदार, अधिकारी, सुमारें १००,००० लोक जमविले. त्या सभेंत राज्याभिषेक कोणास करावा हा विचार होऊन सर्व संमतानें नादिर याच्या मस्तकीं मुकुट घालण्याचें ठरलें. तें बोलणें नादिर याणें बाहेरून अनमान दाखवून कबूल केलें, आणि शिआ हें मत सोडून सूनी मत चालू करण्याचा लोकांकडून करार करविला.

६. हें वर्तमान १७३६ त घडलें. नंतर त्याणें घिलजी व अबदल्ली लोकांचा पराजय करून कंदहार परत घेण्याकरितां ८०,००० फौजेसहित अफगाणस्थानावर स्वारी केली. तेथील लोकांनीं त्याशीं सुमारें एक वर्ष पर्यंत युद्धें केलीं, आणि किति एक वेळां त्यास मागारें हटविलें. शेवटीं इ० स० १७३८ च्या मार्च महिन्यांत कंदहार शहर त्याच्या स्वाधीन झालें. तेथील लोकांविषयीं नादिरषाह याणें निर्दयपणा विशेष न करितां त्यांतून बहुतेकांस लष्करांत चाकरीस ठेविलें; किति एकांस त्या प्रांतांतून काढून खुरासानास पाठविलें.

७. या रीतीनें नादिरषाह हिंदुस्थानाच्या सरहद्दीवर येऊन पोंचला; आणि दिल्ली एथील दरबार निर्बळ आहे हें त्याच्या ऐकण्यांत आल्यामुळें तेथील संपत्ति लुटून आपला खजिना भरावा ही त्यास इच्छा उत्पन्न झाली. तसें करण्यास त्यास निमित्तही लवकरच सांपडलें. तें हें कीं गजनी

अवळून किति एकबंडवाले अफगाण पळून दिल्लीस गेले
होते, त्यांस स्वाधीन करावें ह्मणोन नादिर षाह याणें दिल्ली-
च्या दरबारास निरोप पाठविला. त्याचें उत्तर आलें नाहीं
ह्मणोन त्याणें दुसरा वकील रवाना केला, त्यास अफगाण
यांणीं मारिलें. हें वर्त्तमान समजल्यानंतर त्याणें काबुला-
इ· स· १७३८. हून लागलीच हिंदुस्थानावर स्वारी केली. (अक्टोबर).

८. नादिर षाह यास प्रतिबंध करण्याचा लाहोर ए-
थील सूभेदारानें कांहीं आकार दाखविला; परंतु त्यापा-
सून फळ नहोतां नादिर याणें पुढें चाल केली. त्याची आ-
णि महंमद याच्या लष्कराची कर्नाळा जवळ गांठ पडली.
तेच वेळेस सादतखान हा बादषाहाचे कुमकेस घेऊन पों-
चला. आणि दोहों लष्करामध्यें कांहीं कलागत झाल्या पु-
ढें लढाईस आरंभ झाला. ती मध्यें बळकट, आणि लढा-
या अनुभविलेले, जे इराणी लोक, त्यांपुढें हिंदुस्थान्यांचें
कांहीं नचालतां ते पळून गेले; त्यांचा सरदार खान दौरा-
न हा मारिला गेला; आणि सादतखान हा नादिरषाहया-
च्या लोकांच्या हातीं सांपडला. असोफजा हा या युद्धांत न-
जातां दूर राहिला होता, त्यास दुसऱ्या दिवसीं महंमदया-
णें नादिर षाह याजकडे ताबेदारीचा निरोप सांगण्यास
पाठविलें. तो त्याजपासून परत आल्यावर महंमदही
नादिर षाह याच्या सांगण्यावरून त्याच्या लष्करांत जा-
इ· स· १७३९ ऊन ते दोघे बादषाह दिल्लीस गेले. (मार्च).

९. तेथे ते उभयतां राजवाड्यांत राहिले. प्रथम ना-

दिर षाह याणें आपले फौजेच्या टोळ्या करून शहराचे रखवा-
लीकरितां जागोजागीं ठेविल्या; आणि कोणी आगळीक करूं
नये, किंवा लोकांस उपद्रव करूं नये, असा बंदोबस्त केला. प-
रंतु दुसऱ्या दिवसीं नादिर षाह मेला असें वर्त्तमान शहरांत
उठल्यावरून सर्व शहरकरी इराणी लोकांवर उठले; आ-
णि ते बेसावध आणि फाटाफुट झालेले होते ह्मणून त्यांतू-
न बरेच मारिले गेले. या बखेड्याचा बंदोबस्त होण्याकरि-
तां नादिर याणें प्रयत्न केला; परंतु त्या दिवसीं अस्तमान पर्यं-
त तो मोडला नाहीं, आणि रात्रींहीं तसाच चालला, ह्मणोन
नादिर सकाळीं उठतांच घोड्यावर बसून शहरांत फिरावया-
स निघाला. तंव आपल्या लोकांचीं प्रेतें त्याचे दृष्टीस प्रथ-
म पडलीं; आणि तो पुढें जातो इतक्यांत घरांच्या आंतून त्या-
वर दगड, तीर, व गोळ्या येऊन त्यांहीं करून त्याचे बाजूचा
एक सरदार मरून पडला. त्याणें करून नादिर यास राग
आवरेना असा होऊन जो हिंदुस्थानी भेटेल त्यास बेषक मा-
रावा असा त्याणें फौजेस हुकुम दिला. त्यावरून वीस ह-
जार हत्यारबंद लोक कांहीं एक तास पर्यंत जो दृष्टीस प-
डेल त्यास मारित होते. शेवटीं महंमद याणें प्रार्थना के-
ली, आणि रक्ताचे पूर पाहून नादिर यासही कळवळा आ-
ला, तेव्हां त्याणें ती कत्तल बंद करण्यास हुकुम केला. तो
होतांच क्षणमात्रामध्यें सर्वत्र शांतता झाली. या प्रसंगीं
फार थोडा लुटला तथापि ३०,००० लोकांचा संहार झाला.

१०. नादिर षाह याचा स्वारी करण्याचा मतलब द्रव्य

मिळवावें हा मुख्यत्वें होता, ह्मणोन त्याणें पैक्याचे खंडणीचें बोलणें ठरवून बादशाही खजिना, जवाहीर, व मयूरासनहीं लुटण्या पासून त्या कार्यास आरंभ केला. नंतर मोठे उमराव व सरदार यांचें सर्वस्व हरण केलें. पुढें तो साधारण लोकांचे पाठीस लागला, व जो देईना त्यास मारून आणि त्याचे हाल करून कबूल करवावें असें त्याचे लोक करूं लागले. ते गर्दींत बहुत मेले गेले, व बहुतांनीं भयानें जीव दिले. कोणी ग्रंथकारानें लिहिलें आहे कीं निद्रा आणि विश्रांति यांणीं त्याकाळीं शहराचा निरोप घेतला. प्रति घरांत व खोलींत जिकडे पाहावें तिकडे एकच आकांत आहला.

११. या प्रमाणें दिल्ली लुटून व प्रांतांतील सुभेदारांकडून खंडण्या घेऊन नादिर याणें सुमारें आठ नऊ कोटि रुपये जमा केल्यावर आतां देशांत कांहीं शेष राहिलें नाहीं अशी त्याची खातरी झाली. मग तो महंमद षाह यास पुनः गादीवर बसवून आपल्या हातानें त्याच्या आंगावर राजभूषणें घालून आणि आपल्या मुलाशीं व दिल्लीचे एके राजकन्येशीं लग्न करून देऊन दिल्लीहून परत गेला. त्यावेळीं त्याणें वर सांगीतलेल्या द्रव्या शिवाय पुष्कळ हत्ती, घोडे, उंट, आणि किति एकशें कारागीर बरोबर नेले.

१२. हा नादिर षाह इराणास परत गेल्यावर जयाच्या व वैभवाच्या मदें करून उन्मत्त होऊन त्याची वृत्ति पूर्वीपेक्षांही अधिक तापट आणि अविचारी झाली. त्याणें आपल्या मुलाचे डोळे काढिले, व आणखी बहुत अविचार केले.

त्यामुळें त्याची फौज त्याजवर उठून त्यांतून किति एकांनीं रात्रीं त्याच्या डेऱ्यांत जाऊन त्यास ठार मारिलें; आणि त्याच्या वंशाची त्या बरोबरच समाप्ति आहली.

प्रकरण १५.

महंमदषाह.

सन १७३९ पासून १७४८ पर्यंत.

१. नादिरषाह गेल्यानंतर कांहीं वेळ पर्यंत दिल्लींतील लोक जसे काय निश्चेष्ट होते. त्यांचीं घरें पडलीं होतीं, व रस्त्यांत प्रेतें पुरल्यावांचून जशाचीं तशींच होतीं. राजधानी प्रमाणें साऱ्या राज्याचीही अव्यवस्था झाली होती. इकडे लष्कराची फाटाफुट व खजीनारिकामा; तिकडे दक्षिणेस मराठे लुटीतच आहेत; आणि त्यांच्या उपद्रवापासून जे प्रांत सुटले होते त्यांचा विध्वंस नादिरषाह याचे फौजे पासून नुकताच झाला आहे; अशी स्थिति होती. त्यांत दरबारामध्यें वजीर कामरुद्दीन खान व असोफजा वगैरे तुराणी उमराव यांची एक फळी, व त्यांचें वर्चस्व नसावें असें इछिणारे जे त्यांची एक फळी, अश्या दोन फळ्या झाल्या होत्या. ह्मणून मराठे यांणीं दक्षिणेंतील कारभारांत न गुंतून जर पूर्वी प्रमाणें उत्तर हिंदुस्थानांत लढाई चालविली असती, तर दिल्लीच्या राजवंशाची लौकरच समाप्ति झाली आसती.

२. दक्षिणेंत मराठ्यांचे मुख्य शत्रु आंग्रे, शिद्दी व पोर्तुगीस हे तीन होते. यांतून पहिले दोन हे दर्यांत व प्रांतांत लुटीत असत त्यांचा बंदोबस्त बाजीराव याणें कांहींसा के-
इ. स. १७३९ ला, व पोर्तुगीस लोकांपासून युद्ध करून साष्टी, वसई व अवळची कोंकण पट्टी हीं घेतली. पुढें बाजीराव लौक-
१७४० रच मृत्यु पावला. (ता॥ २८ एप्रिल)

३. त्याचा वडील मुलगा बाळाजी अथवा नाना साहेब यास पेशव्याचा अधिकार प्राप्त न व्हावा याविषयीं सेनापति दाभाडे यांचा मुतालिक दमाजी गायकवाड, व असोफजा याचा मुलगा नाझरजंग, आणि नागपुरकर भोंसल्यांचा मूळ पुरुष परसोजी याचे आगेवर बसलेला त्याचा चुलत बंधु रघूजी, या तिघांचाही उद्योग चालला होता. या कार्याकरितां रघूजी भोंसला कर्नाटकांतून साताऱ्यास आला होता. परंतु नाना साहेब याच्ये मसलती पुढें त्यांचें कांहीं चाललें नाहीं, आणि त्यास बापाचा अधिकार प्राप्त झाला. नंतर रघूजी भोंसला चिचिना पट्टीस निघून गेला.

४. पुढें नाना साहेबानें आपल्या बापाचे वेळेचें कर्ज वारून व दक्षिणेंत व्यवस्था चांगल्ये रीतीची करून हिंदुस्थानांत स्वारी केली. त्याला दमाजी गायकवाड याच्या पारिपत्याकरितां एकदां परत यावें लागलें; परंतु तें कार्य करून तो असोफजा याणें पूर्वी केलेला करार बादशाह यापासून कायम करून घेण्याकरितां हिंदुस्था-

नांत गेला.

५. इतक्यांत रघूजी भोंसला याणें बंगाल्यावर स्वारी केली असें वर्तमान ऐकून त्या प्रांताचा सुभेदार अलिवर्दीखान याणें कुमक सांगितल्यावरून बादशाहानें अयोध्येचा नबाब सफदरजंग यास सैन्य देऊन तिकडे पाठविलें; आणि माळवा प्रांत देण्यानें कबूल करून नाना साहेब हा त्याचे कुमकेस रवाना केला. त्याणें प्रयाग व बहार या मार्गें मुर्शिदाबादेस जाऊन तें शहर रघूजी याच्या हातीं लागूं दिलें नाहीं; आणि पुढें त्याचा पराजय करून त्यास मागारां हटविलें. नंतर बाळाजी माळवा प्रांतांतून
परत साताऱ्यास आला. इ. स. १७४३

६. गायकवाड व रघूजी भोंसला व प्रतिनिधीचा मुतालिक हे तिघे आपल्या नाशाकरितां एके मसलतीनें वागतात. असें पाहून त्यांतून बलिष्ठ जो भोंसला त्याशीं सख्य करण्याकरितां बंगाल व बहार या प्रांतांत चौथाई वसूल करण्याचा आपला अधिकार बाजीरावानें त्यास दिला. तेणेंकरून तो संतुष्ट होऊन तेव्हांपासून तिकडे आपला अंमल बसविण्याच्या कामास लागला; आणि शेवटीं अलिवर्दीखाना कडून त्यास सारा कटक प्रांत आणि बंगाल्याचे चौथाई बद्दल १२००,००० रुपये प्राप्त झाले. (इ. स. १७५१)

७. भोंसला हा फुटल्या मुळें पेशव्याचे बाकीचे शत्रु निर्बळ झाले, आणि असोफजा हा आपल्या मुलांनीं केलेल्या बंडांच्या बंदोबस्तांत व कर्नाटकांतील लढायांत गुंतून शेवटीं
७७ वर्षांच्या वयांत मृत्यु पावला. पुढें लौकरच शाहु याचा १७४९

ने रूपेंतील जवीद नामें कोणी खोजा मारिला, यामुळें बाद-
शाहाची त्यावर गैरमर्जी झाली. त्याणें असोफजा याच्या वडी-
ल मुलाचा पुत्र ग्यासुद्दीन याचा व त्या सफदरजंगाचा क-
ज्जा लाऊन दिला, आणि त्या उभयतांच्या फौजांच्या लढाया
कांहीं दिवस पर्यंत दिल्लीच्या रस्त्यांत होऊं लागल्या. शेव-
टीं आपणास बळहीन पाहून सफदरजंग याणें अयोध्याव
प्रयाग प्रांत घेण्याचें कबूल करून सल्ला केला. नंतर ग्या-
सुद्दीन याणें जाटांवर स्वारी केली. ते स्वारींत तो भरतपु-
रास वेढा घालून होता, इतक्यांत बादशाह त्याच्या दांडगेप-
णास आणि आग्रही स्वभावास कंटाळून स्वतः त्यावर फौ-
ज घेऊन गेला. परंतु ग्यासुद्दीनाचे हितकर्ते जे मराठे त्यांणीं
त्याचा पराजय केला, आणि पुढें लौकरच ग्यासुद्दीनानें त्या-
ला गादीवरून काढून त्याचे डोळे फोडले; व दुसरा एक शा-
इ.स. १७५४ हाजादा आलमगीर असा किताब देऊन सिंहासनावर
बसविला. (जुलै)

३. त्यानंतर लौकरच सफदरजंग मरण पावला, आ-
णि ग्यासुद्दीन यास वजीराचें पद प्राप्त जाहलें. हा ग्यासु-
द्दीन वयानें लहान आणि स्वभावानें चपळ होता, त्यामुळें
अविचारानें व उतावळीनें वागत असे. याकारणास्तव तो
पंजाबेंत जात असतां फौजेनें त्यावर फिरून भर रस्त्यांत
त्याची फार अप्रतिष्ठा केली. पुढें तो पंजाबेंत गेल्यावर त्या-
णें तेथील दुराणी बादशाहाचा सुभेदार मीर मनूचा मु-
लगा, तो लहान असतां त्याचे बहिणीशीं जबरीनें लग्न के-

लें; आणि त्याची आई कारभार करीत होती तिला कैद केलें. त्यामु-
ळें अहंमदशाह अबदल्ली यास क्रोध येऊन त्याणें हिंदुस्थानावर
तिसरी स्वारी केली. आणि ग्यासुद्दीन यास जरी त्याणें तो अप-
राध माफ केला, तथापि त्याणें दिल्लीस जाऊन नादिरशाहाप्रमा-
णें मारझोड लूट हे बहुतेक उपाय करून बरेंच द्रव्य संपादन
केलें. त्याणें अयोध्येचा नबाब सुजाउद्दवला याजपासून खंड-
णी घेण्यास फौज पाठविली, आणि आपण जाट लोकांवर जा-
ऊन त्यांचे एक दोन किल्ले घेऊन तेथील रखवालदार लोक मा-
रिले. तसेंच त्याच्या लोकांनीं एके यात्रेच्या समयीं मथुरेस
जाऊन तेथील निरपराधी शेंकडो यात्रेकरी निर्दयपणानें मा-
रिले, हा अहंमदशाह याणें आपले कीर्तीस मोठा डाग लावू-
न घेतला. आणखीही याप्रमाणें इतर ठिकाणीं करण्याची
त्याची मसलत होती; परंतु गरमीचे दिवस आले, त्यामुळें
त्याणें परत जाण्याची मसलत केली. नंतर दिल्लीच्या दरबा-
रांतल्ये एके राजकन्येशीं त्याणें आपण लग्न केलें, आणि दु-
सरी एक आपला मुलगा तैमूर यास केली. पुढें नजीबुद्दवला
नामें कोणी शूर रोहिला सरदार यास बादशाहाजवळ सेना- इ.स. १७५७
पति करून ठेवून आपण परत काबुलास गेला.

४. परंतु हा बंदोबस्त वजिरानें चालूं दिला नाहीं. त्याणें
रघुनाथराव पेशवा याच्ये मदतीनें दिल्लीवर स्वारी करून
त्या शहरास वेढा घातला, त्यांतून युक्तीनें नजीबउद्दवला
पळून आपला प्रांत शाहरणपूर एथे गेल्यावर दिल्ली शह-
र वजीर याच्या हस्तगत झालें. नंतर त्याच्या सांगण्यावरू-

न रघुनाथ रावानें पंजाब प्रांत घेऊन दुराणी लोकांस सिंधुन-
दीच्चे पली कडेस पिटून ला विलें; आणि तेथील बंदोबस्ता-
चें काम अदीनाबेग नामें सरदारास सांगीतलें. आणि पुढें तो
मेल्यानंतर तेथील एक मराठा त्या अधिकारावर नेमिला; आ-
णि रघुनाथराव परत दक्षिणेंत निघून गेला.

५. या अविचारी कृत्याबद्दल वजीर व मराठे यांचें पारि-
पत्य करावें याहेतूनें अहंमदशाह अबदल्ली हिंदुस्थानांत या-
वयास निघाला. तो येऊन पोंचण्याच्या पूर्वी ग्यासुद्दीन या-
णें आलमगीर बादशाहास मारेकऱ्यांच्या हातानें मारवि-
इ. स. १७५९ लें. हें आणखी विरोध वाढण्यास मोठें कारण झालें. (न-
वेंबर.)

६. इकडे पेशव्यांस दक्षिणेंत कोणी शत्रु राहिला नव्हता,
व त्यांचा सर्व राज्याधिकार एकाच्या हातीं होता. हिंदुस्था-
नांत मल्हारराव होळकर, दत्तोजी शिंदा, व भोंसले या ति-
घांनीं बहुत मुलुक मिळविला, आणि रघुनाथराव याणें पं-
जाब घेतल्यामुळें एके बाजूस त्यांची सरहद्द हिमालयाप-
र्यंत पोंचली, आणि दुसरे बाजूस त्यांचे घोडे अटकेचें पाणी
पिऊं लागले. त्यांच्ये फौजेंत पूर्वीप्रमाणें लुटारू लोक नव्ह-
ते, परंतु पगारदार व सामान सरंजाम सहित स्वार होते;
व पूर्वींच्या पायदळापेक्षां ज्यांचा बंदोबस्त चांगला असे
१०,००० पायदळ, कांहींसें गोरे लोकांच्ये तऱ्हेचें त्यांणीं त-
यार केलेलें होतें. याप्रमाणें त्यांचा उत्कर्ष होत चालला,
आणि ते मुसलमानांच्ये सत्तेची समाप्ति करण्याची इच्छा

करूं लागले. त्यामुळें बहुतेक मुसलमान संस्थान्यांसही त्यां-
च्या नाशाची इच्छा उत्पन्न झाली. रोहिल्यांचा मुख्य नजीबउ-
द्दवला हा तर अहंमदशाह याची येण्याची वाट पाहत होता,
आणि अयोध्येचा नबाब सुजाउद्दवला हा बाहेरून गोडीदा-
खवून आंतून त्याच्याच पक्षास अनुकूळ होता. मराठ्यांस
जाटांचा राजा सूरजमल्ल हा सामील होता; परंतु रघुनाथ
राव परत आल्यावर सदाशिवराव भाऊ पेशवा हा हिंदुस्था-
नांत स्वारीस गेला, तो त्याची कांहीं मसलत न ऐकतां आप-
ल्या शौर्याच्या गर्वेंकरून मनास येईल तें करी. दिल्लीस आ-
ल्यावर त्याणें राजवाडे, कबरी, दर्गा, अशाजागा फार लुट-
ल्या; राजवाड्याचें रुप्याचें छत पाडून सतरा लक्ष रुपये
घडले; आणि सिंहासनावर आपला पुतण्या विश्वासरा-
व यास बसविण्यास तो उद्युक्त झाला. या कृत्यांमुळें सू-
रजमल्ल कंटाळून आपल्या देशास निघून गेला, आणि
पुढें जी कलागत होणार तींत मुसलमानांचा जय होतो
किंवा हिंदूंचा होतो हें पाहण्याकरितां सर्वांचे डोळे अहंम-
दशाह याच्या येण्याकडे लागले.

७. तो अहंमदशाह पर्जन्यकाळ संपला नाहीं आणि
यमुनेचें पाणी कमी झालें नाहीं तंव ती उतरून आली क-
डे आला. इकडेस मराठे पाणिपताजवळ खंदक खणून
छावणी करून राहिले होते, त्यास अन्नाचा तोटा पडून शे-
वटीं जिवावर उदार होऊन युद्ध करण्याचा प्रसंग आला.
त्या युद्धांत काय झालें त्याचा विस्तार मराठ्यांचे बखरींत

आहेच. सारांश मराठ्यांचे सुमारें साठ सत्तर हजार स्वार आणि १५००० पायदळ इतकें लष्कर होतें, त्यांतून थोडे लोक परत आले. विश्वासराव भाऊ वगैरे बहुतेक मोठे मोठे सरदार पडले; महादजी शिंदा जन्माचा लंगडा जाहला; आणि पुढें मोठेपणास पावलेला जो नाना फडणवीस त्याच्या मनांत सतत एक दुःख राहावयाजोगें झालें. इब्राहिम खान गार्दी ह्मणोन कवायती लष्कराचा सरदार होता तो शत्रूंच्या हातीं सांपडला, तो त्यांणीं ठार मारिला. एक मल्हारराव होळकर हा लढाईतून लौकर निघून गेला. तो व दिल्लीस लष्कराबरोबर कांहीं सरदार होते ते मात्र वांचले.

८. या पराजयाचें वर्त्तमान दक्षिणेंत येतांच मराठ्यांच्या अवघ्या राज्यांत हाहाकार झाला. बहुतेकांचे इष्ट मित्र मारिले गेले, आणि मराठ्यांची अप्रतिष्ठा झाल्यामुळें सर्व हळहळूं लागले. परंतु ते लढाईपासून कांहीं थोडा वेळ पर्यंत शोक मात्र झाला असें नाहीं. तो जो धक्का बसला त्यापासून मराठे पूर्वीप्रमाणें कधीं पुनः सांवरलेच नाहींत. त्यांची सेना शेष राहिली होती, ती पुढें नर्मदा उतरून परत आली, व हिंदुस्थानांतील बहुतेक प्रांत पेशवा यास सोडून द्यावा लागला. नंतर लौकरच नानासाहेब ही मरण पावला. पुढें शिंदे, होळकर, वगैरे सरदारांनीं युरोपियन फौजेच्या मदतीनें पूर्वींचे बहुतेक प्रांत घेतले खरे, परंतु मराठ्यांची एकहाती सत्ता ही पुनः कधीं झाली नाहीं.

९. इकडे मुसलमानांचा जूट झाला होता तो लढाई संपतांच फुटला. अहंमदशाह स्वदेशास निघून गेला, आणि त्याणें हिंदुस्थानांतील कारभारांत मन घालावयाचें सोडिलें. पुढें राज्यामध्यें लहान लहान संस्थानाचे विभाग जाहले; राजधानी ओस पडली, आणि साऱ्या हिंदुस्थानाचे बादशाह ह्मणविणारांचा जो वंशज त्यास परदेशचे लोक जें कृपा करून धर्मार्थ देतील तें खाऊन राहण्याचें प्राप्त झालें.

प्रकरण १७.

मुसलमानांच्या राज्या विषयीं साधारण विचार.

१. याप्रमाणें दिल्लीच्या मुसलमानी राज्याची समाप्ति झाली. ते मुसलमान प्रथम स्वाऱ्या करूं लागले, तेव्हां सर्वांचें एक मत असे, आणि ते एकाच्या हुकुमानें वागून अवघ्यांची दृष्टि एका कार्यावर असे. या कारणामुळें आणि ते लोक हिंदूंपेक्षां शरीरानेंही सुदृढ आणि बळकट ह्मणोन प्रथम ते थोडे असून हिंदूंच्या मोठमोठ्या सैन्यांचा पराजय करीत असत. इकडे पंजाब व दिल्ली प्रांतांत लहान लहान निर्बळ हिंदु संस्थानी फार होते, त्यांमध्यें परस्पर वैमनस्य व मत्सर होते; ह्मणोन एकावर संकटाचा प्रसंग आला असतां जवळचे शेजारी उदासीन असत, किंवा संतोष मानीत. अशा रीतीनें आरंभीं मुसलमानांचा आंत प्रवेश झाला.

२. परंतु तेवेळीं त्यांस देशाची माहितगारी फार नव्हती, ह्मणोन एक वेळ ज्याठिकाणीं अंमल बसला त्याचें रक्षण करण्याकडे ते खपत असत; आणि ते हिंदुस्थानांतील राज्याच्या बंदोबस्ताकडे लागले. ह्मणजे सिंधुनदी पलीकडील मुलुकांत बंडें होत. त्या मुलकाविषयीं त्यांस ममता अधिक असे, ह्मणोन तिकडेच त्यांचें लक्ष्य असे. परंतु गजनी वंश समाप्तीस गेल्यावर ज्याणें दिल्लीचें संस्थान घेऊन तें शहर आपली राजधानी केली, त्या कुतुबुद्दीनास पश्चिमेकडच्या राज्याची कांहीं काळजी नव्हती; आणि तो जात्या शूर होता; ह्मणोन त्याणें बंगाल पर्यंत मुलुक घेतला. हा कुतुबुद्दीन, व त्याच्यापुढें अल्तमष बादषाह झाला. या उभयतांप्रमाणें उद्योगी व चतुर असे आणखी कितिएक राजे जर एकापुढें एक झाले असते, तर तेव्हांच नर्मदे पर्यंत सारा मुलुक मुसलमानांच्या स्वाधीन झाला असता. परंतु मध्येंमध्यें हलके व विषयी असे कितिएक राजे झाले; त्यांचे वेळेस राज्यांत जी अव्यवस्था झाली, ती नासरुद्दीन व बुलबन या सारिखे चांगले बादषाह गादीवर आले ह्मणूनच शांत जाहली; आणि गुलाम वंशाचे कारकिर्दीच्या अखेरीस मुसलमानांची सत्ता कुतुबुद्दीनानें मिळविलेल्या बहुतेक राज्यावर राहिली.

३. खिलजी वंशाची कारकिर्द थोडी तर खरी, परंतु तीमध्यें मुसलमानांनीं नर्मदा उतरून दक्षिणेस प्रवेश केला ही गोष्ट मोठी घडली. जलालुद्दीन हा पराक्रमी आणि शाहणा असून फार सत्वस्थ होता. याचा विचार करून मनास संतो-

ष होतो. परंतु त्याच्या त्याच सत्वस्थपणामुळें मुलकांत बंदोबस्ताची कमती होऊन शेवटीं त्याच्ये कृपेंतील पुतण्या अल्लाउद्दीन याणें कपटानें त्याचा प्राण घेतला ही गोष्ट वाचून दया येती; आणि ज्या अल्लाउद्दीनानें असा कृतघ्नपणा केला, त्याचा पराक्रम आणि जय यांचें आश्चर्य करावें, किंवा त्याच्ये छांदिष्ट राजनीतीचा आणि त्याच्या क्रूर स्वभावाचा तिरस्कार करावा याविषयीं संशय उत्पन्न होतो.

४. राजवंशांचे मूळ पुरुष बहुधा शाहाणे, गुणी, आणि योग्य असतात. ग्यासुद्दीन तघलख याचेंही नाव या मुळें स्मरण ठेवण्या जोगें आहे. त्याचा मुलगा महंमद तघलख यास त्याच्या खेददायक मरणामुळें जितकें राज्य प्राप्त झालें, तितक्याचाच बंदोबस्त शाहाणपणानें करून तो जर स्वस्थ असता, आणि तें वाढविण्याच्या व पैका जमविण्याच्या वेड्या मसलती आणि दुसरे अविचार न करिता, तर भागीरथी आणि तुंगभद्रा यांच्यामधील साऱ्या हिंदुस्थानाचा राजा असा किताब त्यास मिळाला असता. परंतु अतिलोभ राज्याविषयीं होऊ, किंवा द्रव्याविषयीं होऊ, तो झाला असतां मोठे गुण आणि सामर्थ्य यांपासून कांहीं फळ नहोतां उलटा नाश होतो. या गोष्टीचा प्रत्यय महंमद तघलख यास आला, कारण तो मरावयाच्या पूर्वीं नर्मदेच्ये उत्तरेस आणि दक्षिणेस बंडें होऊन कितिएक राज्यें स्थापिलेलीं त्याच्ये दृष्टीस पडलीं; आणि त्यांचा स्वतंत्रपणा त्याच्या पुढील बादषाहास कबूल करावा लागला. पुढें लौकरच गु-

जराय व जयानपूर एथे राज्यें स्थापिलीं गेलीं; आणि शेवटीं इशवीसनाच्या चवदाव्या शेकड्याचे अखेरीस विजेच्या झपाट्याप्रमाणें तेमूरलंग याची स्वारी येऊन दिल्लीच्या आसपास धुमाळी झाली, तेणेंकरून दिल्लीच्या दरबारची चेतना बहुतकरून जाऊन धुगधुगी मात्र राहिली.

५. पुढें कांहीं वर्षेंपर्यंत या मूळ आगींच्या संस्थानाची समाप्ति होण्याचा वेळ आला होता; आणि ती मोडकीइमारत लोदी वंशाचे पराक्रमी परंतु धर्माभिमानी आणि क्रूर राजे यांच्या चातुर्यानें सरासरी सांवरून धरिली होती. अशे स्थितींत तिला बाबर याच्या बळकट बाहूंचा टेंका मिळाला.

६. या शेवटीं लिहिलेल्या मोगल राजांचें शौर्य, भलेपणा, आणि विद्येचें व्यसन, हे तीनही गुण स्तुति करायास सारखे योग्य आहेत. अशा बापास त्याच्या प्रमाणेंच गुणी, शूर आणि उदार मनाचा पुत्र हुमायूं हा झाला. त्याकडे कांहीं दोष दिसण्यांत येत नसतां त्यास प्रवास, विपत्ति, आणि दारिद्र्य इत्यादि संकटें भोगावीं लागलीं. याचा विचार केला असतां दैवगति केव्हां केव्हां अतर्क्य असती, हा निश्चय होतो; आणि मनुष्यानें उपायांची पराकाष्ठा केली तथापि त्याचे प्रयत्न फसावे, व त्याणें अहंकार सोडून आपण ह्मणजे काय पदार्थ हें वारंवार ध्यानांत आणावें, अशी विश्वाची व्यवस्था आणि निर्वाह यांची काळजी ठेवणारा जो परमेश्वर त्याची इच्छा अ-

सें अनुमान होतें.

७. इकडे अशीं संकटें प्राप्त होऊन व राज्याची पुरती घडामोड होऊन त्याच हुमायूं राजास जो पुत्र झाला त्याणें आपल्या प्रतापाच्या व बुद्धिकौशल्याच्या बळानें राज्य परत घेऊन पहिल्यापेक्षां त्याचा विस्तार अधिक केला. यांत ईश्वराचे इच्छेस येतें तेव्हां लहान कारणापासून मोठ्या उलटा पालटी कशा होतात, याचें उदाहरण पाहावें. अकबर हा गादीवर आला तेव्हां हिंदुस्थानाची स्थिति कशी होती, त्यास अडचणी किती होत्या, आणि त्या दूर करण्यास त्याजवळ साहित्याचा तोटा कोणत्या प्रकारचा होता, हें सर्व वर सविस्तर लिहिलेंच आहे; आणि इतक्या अडचणी दूर होऊन त्यास मोठें वैभव प्राप्त झालें, यास इतर साधनांपेक्षां मुख्यत्वें अकबराचे अंगचे गुण कारण होत. ती वेळ मोठी परीक्षेची होती. अशे वेळेस दर्प आणि मृदुपणा, गुणी लोकांची आवड, बहुतांची आपणावर प्रीति होण्याजोगें आर्जव, नवीं राज्यें घेण्याविषयीं सामर्थ्य, हस्तगत झालेल्यांचें प्रतिपालन करण्याकडे लक्ष्य, उन्मत्तांस दंड, शरणागतांवर दया, इत्यादि परस्पर विरुद्ध गुणाच्या योगेंकरून मोठें राज्य स्थापन करण्यास जे पुरुष पृथ्वीवर जन्मत असतात, त्यांतला अकबर असें ह्मणणें प्राप्त आहे.

८. अकबराच्या मुलामध्यें त्याच्या गुणांपैकीं भलेपणा वगैरे कांहीं थोडे होते; आणि त्यास बुद्धिवाद सांगण्यास अकबराचे वेळेचे प्रसिद्ध मंत्री खान खानाभ, इत्यादिक होते, यामुळें व्यवस्था बरीच चालली. त्याचा मुलगा भला आणि सुस्वभावा-

त्याचा जो शहाजहां त्याला अनुपकारी पुत्रांमुळें ह्मातारपणीं राज्यनाश आणि दुःख प्राप्त झालेलें पाहून सर्वांच्या हृदयास द्रव येईल.

९. चांगल्या राजांमध्यें मोठें पद संपादन करावयाजोगे बहुतेक गुण औरंगजेबामध्यें असून त्याणें सर्वकाळ हलक्या आणि कपटाच्या मसलती केल्या; आणि ज्या राज्यांचें रक्षण करून आपण फळ भोगून राजाधिराज ह्मणवावें, त्यांस समूळ उपटून टाकण्याचा प्रयत्न केला, आणि आपल्या असाधारण शौर्यउद्योग इत्यादि गुणांच्या योगें तो बराच सिद्धीस नेला. ह्मणोन पूर्वींच्या कोणत्याही राजाच्ये कारकिर्दीपेक्षां त्याचे वेळेस राज्य अधिक वाढलें; जीं संस्थानें अर्धीं हुकुमांत होतीं त्यांवर पुरा अंमल बसला; आणि जीं अगदीं स्वतंत्रपणानें वागत होतीं तीं ताबेखालीं आलीं असें वाटलें. परंतु दक्षिणेंतील मुसलमानांचीं राज्यें मोडल्यापासून असें झालें कीं त्या लोकांचा संचार देशांत झाल्यामुळें जें वैर शेंकडो वर्षांपासून धुमत होतें, आणि ज्यास औरंगजेब याच्या जुलमाचें व धर्माभिमानाचे कृतीचें सर्पण मिळालें होतें, तें वैर प्रदीप्त करून, शिवाजी आणि त्याचे वंशज जेव्हां मुसलमानांनीं केलेल्या कृति परत करूं लागले, तेव्हां दिल्लीच्या दरबारचे तर्फेनें तरवार उचलायास कोणी सामर्थ्यवान् राहिला नाहीं. हुजुरांतून मुलकाच्या बंदोबस्तास सुभेदार असत, आणि त्यांजवळ सैन्यही पुष्कळ असे हें खरें; परंतु हिंदुराज्य वाढूं द्यावयाचें नाहीं असा सर्व मुसलमान संस्थानांचा जूट असून

जी दहशत होती ती गेली, आणि हुजूरच्या मोठ्या कारभारामध्यें दक्षिणेंतील व्यवस्थे विषयीं दुर्लक्ष्य होऊं लागलें. यामुळें राज्याचे शत्रु जे बळावत चालले, ते शेवटीं अनिवार झाले.

१०. औरंगजेबाबरोबर मोगलांच्या राज्याची समाप्ति झाली. पुढें सुमार पन्नास वर्षें पर्यंत तें दिवसानुदिवस क्षीण होत चाललें होतें; बादशाहाचे गादीवर जे बसत त्यांस आपल्ये इच्छेनें कारभार करावयाचें सामर्थ्य नसे; लोभी आणि मतलबी पुरुष आपल्या स्वार्था करितां त्यांस सिंहासनावर बसवीत, आणि आपल्ये मर्जीप्रमाणें ते त्यांस बाहुल्यासारिखे नाचवून आपलें कार्य झालें ह्मणजे त्यांस अधिकारावरून काढित किंवा त्यांचा प्राण घेत. महंमदशाह याच्यामध्यें राजाचे कांहीं गुण होते, परंतु दक्षिणेचा सुभेदार असोफजा व अयोध्येचा सुभेदार यांचे स्वार्थसाधना करितां जे कलह चालले होते त्यांतच त्यांचा बहुतेक काळ गेला. तशे मोडकळेंत नादिरशाह याचें येणें झाल्यामुळें बादशाहाची प्रतिष्ठा लोकांच्ये दृष्टीनें फारच कमी झाली, आणि बाबर व अकबर यांचे वंशज ह्मणोन सर्व रयत व फौज यांची त्यांविषयीं जी प्रीति व बहुमान होता तो जाऊन सर्वांस ते तुच्छ वाटूं लागले, व त्यांचा तिरस्कार उत्पन्न झाला. अशांत अविचारी आणि उतावीळ जो ग्यासुद्दीन त्याणें पुढील परिणामाचा विचार न पाहतां, व दरबारांतील आपले प्रतिस्पर्धी यांचें पारिपत्य व्हावें इतक्याच हेतूनें, मुसलमा-

नांचे हाडवैरी जे मराठे त्यांस आमंत्रण देऊन बोलावून आणि-लें. त्यांस तर पूर्वी पांचशें वर्षांपासून जीं आपल्या लोकांनीं दुःखें भोगिलीं होतीं, व धर्मोच्छेद झाला होता, त्यासर्वांचा सूड उगवावयाचा होता; त्यामुळें त्यांणीं मुसलमानांची सत्ता बुडविण्याकरितां निकरानें कंमर बांधिलीच होती. ते मराठे, व त्यांचे शत्रु अहंमदशाह व त्याच्या पक्षाचे सरदार, ह्या उभयतांचे उद्योग दिल्लीची बादशाही मोडण्यास सारिखे अनुकूळ झाले. त्यांचा प्रतिबंध करण्यास महमूद वगैरे प्राचीन मुसलमान राजांच्या वेळचा उत्साह, शौर्य, आणि धर्मवृद्धीविषयींचा आग्रह; किंवा अकबराची मसलत, दीर्घदृष्टि, आणि लोकरंजन; किंवा औरंगजेबाचें युद्धकौशल्य व कपट, यांतून कांहींच साधन नाहीं असें झालें; ह्मणोन दिल्लीचें संस्थान असें जें नांव कांहीं वर्षांपासून शेष राहिलें होतें, तें पाणिपतच्या मैदानावर लयास गेलें.

११. तेव्हां राज्याकरितां कलह करणारे जे होते ते सर्व परस्परांस हीनबळ करून आपापल्या जागीं बसले. पुढें लोकरच सारा मुलुख नव्या कोणी एक लोकांच्या अमलाखालीं एकवटून दिल्लीच्या राज्यापेक्षां मोठें राज्य उत्पन्न व्हावें अशी ईश्वरेच्छा होती. या नव्या लोकांच्या चातुर्यापुढें आणि कौशल्यापुढें अकबर किंवा औरंगजेब हे जरी पुनः जीवंत होते तरी त्यांचें कांहीं चाललें नसतें.

अकबर बादशाहाच्या पूर्वी झालेल्या मांडलिक राजांचीं नावें.

१ ब्राह्मणी राजे.

	इ. स.	हि. स.		इ. स.	हि. स.
हुसेन गंगु उर्फ अल्लाउद्दीन मूळपुरुष	१३४७	७४८	अल्लाउद्दीन . . .	१४३५	८३८
महम्मद पहिला . .	१३५८	७५९	हुमायूं	१४५७	८६२
मुजाहिद	१३७५	७७६	निजाम	१४६१	८६५
दाउद	१३७८	७८०	महम्मद २ रा . .	१४६३	८६७
महमूद पहिला . . .	१३७८	७८०	महंमूद २ रा . .	१४८२	८८७
ग्यासुद्दीन	१३९७	७९९	अहम्मद दुसरा (नामधारी) . .	१५१८	९२४
शम्सुद्दीन	१३९७	७९९	अल्लाउद्दीन . . .	१५२०	९२७
फिरूझ	१३९७	८००	वाली	१५२२	९२९
अहंमद पहिला . .	१४२२	८२५	कलीम	१५२६	९३३

२ विजापुरचे राजे.

युसुफ आदिलशाह मूळपुरुष . . .	१४८९	८९५	इब्राहिम आदिलशाह	१५३५	९१४
इस्मायल आदिलशाह	१५१०	९१५	अली आदिलशाह	१५५७	९६५
मल्लू आदिलशाह . .	१५३४	९४१	इब्राहिम आदिलशाह २ रा . .	१५७९	९८७

३ अहंमदनगरचे राजे.

	इ.स.	हि.स.		इ.स.	हि.स.
अहंमदषाह मूळपुरुष....	१४९०	८९६	मीरानहुसेन...	१५८८	९९६
बुऱ्हाण.....	१५०८	९१४	इस्मायल....	१५८८	९९७
हुसेन......	१५५३	९६१	बुऱ्हाण २रा..	१५९०	९९९
मुर्तिजा......	१५६५	९७२	इब्राहिम....	१५९४	१००३
			अहंमद २रा...	१५९४	१००४
			बहादुर....	१५९५	१००४

४ गोंवळकोंड्याचे राजे.

सुल्तानकुतुब कूली मूळपुरुष	१५१२	९१८	सुभानकूली...	१५५०	९५७
जमशीद....	१५४३	९४०	इब्राहिम....	१५५०	९५७
			महंमदकूली..	१५८०	९८८

५ वऱ्हाडचे राजे.

फत्तेअल्लामूळपुरुष	१४८४	८९०	बुऱ्हाण....	१५६०	९६१
अल्लाउद्दीन...	१५०४	९१०	तुफाल....		
देरिआ.....	१५२९	९३६			

६ बेदरचे राजे.

कासिम....	१४९८	९०४	कासिम २रा..	१५६९	९९७
अमीर....	१५०४	९१०	मिर्झाअल्ली..	१५७२	१०००
अली.....	१५४९	९४५	अमीर २रा...		
इब्राहिम....	१५६५	९९०			

७ गुजराथचे राजे.

	इ.स.	हि.स.		इ.स.	हि.स.
मुजफरषाह...	१३९६	७९९	महंमूदषाह २रा.	१५२६	९३२
अहंमदषाह...	१४१२	८१५	बहादुरषाह..	१५२६	९३२
महंमदषाह...	१४४३	८४७	मीरानमहंमदषाह फरूखी...	१५३६	९४३
कुतुबषाह...	१४५१	८५५	महंमूदषाह ३रा.	१५५३	९६१
दाउदषाह एक आठवडा राज्य केलें			अहंमदषाह २रा.	१५६१	९६९
महमूदषाहबीगर	१४५९	८६३	मुजफरषाह ३रा.	१५६१	९६९
मुजफरषाह २रा.	१५११	९१७			
शिकंदरषाह...	१५२६	९३२			

८ माळव्याचे राजे.

दिलावरगोरी मूळपुरुष..	१४०१	८०४	महंमूदखिलजी	१४३५	८३९
हुसंग गोरी...	१४०५	८०८	ग्यासुद्दीनखिलजी	१४८२	८८७
महंमद गोरी..	१४३२	८३५	नासरुद्दीनखिलजी	१५००	९०६
			महंमूदखिलजी २रा	१५१२	९१६

९ बंगालचे राजे.

फकरुद्दीन...	१३३८	७३९	शामसुद्दीनदुसरा.	१३८३	७८५
अल्लाउद्दीन...	१३४०	७४१	राजाकस....	१३८६	७८८
हजीइलिआस उर्फशमसुद्दीन	१३४२	७४३	जेठमल्ल अथवा जलालुद्दीन..	१३९२	७९५
शिकंदर....	१३५७	७५९	अहंमद....	१४०९	८१२
ग्यासुद्दीन...	१३६७	७६९	नासरुद्दीन..	१४२६	८३०
सुल्तानोसुल्तान	१३७४	७७५	नासर....	१४२६	८३०

९ बंगालचे राजे.

	इ. स.	हि. स.		इ. स.	हि. स.
बार्बिक....	१४२८	८३२	महमूद....	१५३४	९४०
युस्रफ.....	१४४५	८४९	शीरषाह....	१५३७	९४५
फत्ते.......	१४६१	८६६	सिलीम......	१५४५	९५२
शाहजादा....	१४८१	८८६	आदिली....	१५४८	९५५
फिरूझ.....	१४८१	८८६	बहादूर....	१५५३	९६१
महंमूद.....	१४९३	८९९	जलालुद्दीन...	१५६०	९६८
सुजफर....	१४९४	९००	सुलेमानकिराणी	१५६३	९७१
अल्लाउद्दीन २रा.	१४९७	९०४	बायजीद....	१५७३	९८१
नसरत.....	१५२१	९२७	दाऊद.....	१५७३	९८१

१० जवानपुरचें राजे.

रवाजाजहां..	१३९४	७९६	महंमूद..	१४४०	८४४
मुबारिक...	१३९९	८०२	महम्मद....	१४५७	८६२
इब्राहिम...	१४०१	८०४	हुसेन.....	१४५७	८६२

समाप्त.